१५ ऑगस्ट विशेषांक | मूल्य साठ पैसे

# माणूस

धोंडी ! काय रे ही आपली 'स्वतंत्र' अवलाद




आमचा बळशाली निर्धार!
20 वर्षापूर्वी
स्वातंत्र्यासाठी...
आणि
आज
अन्नधान्य स्वयंपूर्णतेसाठी...
भरपूर धान्य पिकवून धन्य होऊ या !

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : अकरावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

**स. न.** **जुलै, २८**

'माणूस' ता. २९ जुलैच्या अंकात 'एक संध्याकाळ' हा श्री. ज. जोशी यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी बालगंधर्वांना भावनात्मक वृत्तीने श्रद्धांजली वाहिली आहे. त्या लेखात पान १६ वर खालून पाचव्या ओळीच्या आरंभी 'आठ तारखेला संध्याकाळी मी लक्ष्मी-रोडवरून सहज चाललो होतो...' इत्यादी मजकूर आहे. त्यात 'त्या वेळी नटसम्राट बालगंधर्व यांचे निधन' अशी एका दुकानावर पाटी होती असे म्हटले आहे. बालगंधर्व यांचा मृत्यू १५ जुलैला झाला. आठ तारखेला अशी पाटी दुकानावर लागली असणे शक्य नाही. बालगंधर्वांच्या मृत्यूनंतर बरोबर १५ दिवसांनी प्रसिद्ध होणाऱ्या 'माणूस'च्या अंकात असली चूक व्हावी हे अयोग्य आहे. श्री. ज. जोशी हे एक साक्षेपी लेखक आहेत; व संपादकही सहसा निष्काळजीपणा करीत नाहीत, अशी त्यांची ख्याती आहे. म्हणून ही चूक व्हावयास नको होती.

**प्रा. वि. बा. आंबेकर,** नासिक.

**ही चूक व्हावयास नको होती.** : संपादक.

**मूल्य ६० पैसे**
**४१९ नारायण**
**पुणे २.**
**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# राजे व्हा, राज्य करा

**अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी, स्वावलंबी भारतासाठी—**

एक अल्पसा, आपल्यापुरता प्रयत्न म्हणून गेल्या वर्षी, १५ ऑगस्ट अंकापासून ' माणूस प्रतिष्ठान 'ची योजना आम्ही वाचकांपुढे ठेवली.

विक्री झालेल्या ' माणूस ' अंकाच्या दर प्रतीमागे एक पैसा वेगळा काढणे, या निधीतून महाराष्ट्रातील एखाद्या सोयीस्कर पण दुष्काळग्रस्त गावात विहिरी खोदणे असे या ' प्रतिष्ठान योजने 'चे साधे स्वरूप होते.

यासाठी १ जून १९६१ ला ' मासिक ' म्हणून सुरू झालेला व मध्यंतरी दोन वर्षे ' पाक्षिक ' स्वरूपात प्रकाशित होणारा ' माणूस ' गेले वर्षभर साप्ताहिक स्वरूपात नित्यनेमाने वाचकांसमोर येऊ लागला.

राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक घडामोडी, क्रीडा, वगैरे सर्वसामान्य वाचकाच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व विषयांचा परामर्ष घेऊन, त्यासाठी उत्तमोउत्तम लेखकांचे सहकार्य मिळवून खऱ्याखुऱ्या अर्थाने एक ' समग्र ' साप्ताहिक होण्याचा ' माणूस ' ने सतत प्रयत्न चालविला आहे. थोडेफार यश आजवर दिसले, याचा अर्थ एवढाच, की प्रयत्नांची दिशा वाचकांना मानवते आहे. पण चाल तोकडी पडत आहे, अद्याप खूप मजल मारायची आहे हे आंतरिक सत्य निदान ' माणूस ' तरी दृष्टिआड करू शकत नाही.

' माणूस प्रतिष्ठान 'च्या कामालाही गेल्या दिवाळीतच सुरुवात झाली. पुण्यापासून चाळीस मैलांवर असलेल्या सुपे या गावी एका विहिरीचे काम जवळ जवळ पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या विहिरीसाठी जमवाजमव सुरू आहे. आगामी गांधीजन्मशताब्दीपर्यंत या पद्धतीने हे काम चालू ठेवण्याचा तूर्त इरादा आहे. पुढचे त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून !

मध्यंतरी ' माणूस प्रतिष्ठान 'चे नाव ' बिहार परिवाराशी 'ही निगडीत झाले होते परंतु निधी जमवणे, स्वयंसेवक बिहारला पाठवून अन्नकेंद्र चालवणे, तेथे विहिरीच्या कामांना थोडीफार चालना देणे ही सर्व जबाबदारी मुख्यत: ' यूथ ऑर्गनायझेशन 'च्या सदस्यांनीच उचलली व यशस्वीपणे पारही पाडून दाखवली. कौतुकच करायचे तर या संस्थेच्या सभासदांचे व कार्यकर्त्यांचे केले पाहिजे. त्यांचे हे श्रेय त्यांना दिले पाहिजे.

हे ' बिहार परिवारा 'चे काम आटोपत आले होते त्या सुमारासच—१० जुलैच्या आसपास-धुळे जिल्ह्यातील अक्राणी-अक्कलकुवा या गिरिजन विभागातील दुष्काळाच्या वार्ता वृत्तपत्रांतून येऊ लागल्या होत्या. गेल्या वर्षीही या भागात मोठा दुष्काळ पडला होता. काही भूकबळी पडल्याचेही सांगितले जात होते. गेली सात

वर्षे हा भाग सतत दुष्काळी आहे, सरकारचे या भागाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, 'सातपुडा सर्वोदय मंडळा'ने विहिरी काढणे, शेताची बांधबंदिस्ती करणे, स्वस्त धान्याची दुकाने चालविणे ही कामे तेथे उभी केली नसती तर तेथील दुष्काळाने बिहारसारखेच आक्राळविक्राळ स्वरूप धारण केले असते, अशीही माहीती वृत्तपत्रांतून पुढे येऊ लागली.

हे 'सातपुडा सर्वोदय मंडळा'चे काम पाहावे, विशेषत:, दुष्काळी भागात विहिरी खणण्याच्या कामात 'माणूस प्रतिष्ठान'ला आलेल्या अडचणींबाबत तेथील अनुभवी कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करावा या उद्देशाने जुलैच्या मध्याला 'महाराष्ट्र सर्वोदय मंडळा'चे एक पदाधिकारी श्री. गोविंदराव शिंदे यांच्याबरोबर या अक्राणी महालात—मध्यप्रदेश आणि गुजरात यांच्या सरहद्दी महाराष्ट्राला भिडतात त्या डोंगरी मुलखात—आठदहा दिवस हिंडून आलो.

**आणि तेथे नवल वर्तले**

मोराने पिसारा फुलवावा, मोहक हातांनी एखादा रंगीबेरंगी पंखा उघडला जावा तशी ही सातपुड्याची पर्वतराजी, त्या निळसर हिरव्या रांगा डोळ्यांना सुखावीत होत्या, शिणलेल्या शरीराला तकवा देत होत्या.

आम्हांला तीन रांगा ओलांडून चवथ्या व पाचवीच्या मध्ये असणाऱ्या धडगाव केंद्रावर व त्या आसपासच्या भागात जायचे होते.

प्रवास सगळा पायीच होता— कारण वर्षातून जवळ जवळ आठ महिने रस्ते वाहतुकीला निरुपयोगी असतात.

पाहा काय आश्चर्य ! दरवर्षी तोच तो एक मुख्य डोंगरी रस्ता दुरुस्त केला जातो व तो मात्र चारच महिने चालू राहील एवढीच त्याची दुरुस्ती होते. खर्च काही कमी नाही. पण एकदा काही तो कायमचा पक्का करून बारमाही वाहतूक सुरळीत चालू ठेवण्याचे शासनाच्या डोक्यात येत नाही.

*एक वाहतुक सुरळीत नाही म्हणून हा सर्व भाग किती मागासला राहून गेला आहे !*

येथे अजूनही जंगले खाजगी मालकीची आहेत. संस्थानिक गेले, त्यांचे तनवेही जाण्याच्या मार्गावर आहेत, पण येथे अजूनही 'जंगलचे संस्थानिक' (Chieften) कायम आहेत, त्यांचे विशेषाधिकार, सवलती सर्व काही अबाधित आहेत. जेथे सरकारी जंगले आहेत तेथे जंगलचे कायदे ब्रिटिश अमदानीपासून जसेच्या तसे चालत आलेले आहेत— ज्यांचा मुख्य उद्देश जंगलची संपत्ती बाहेर शोषून घ्यावी, याला कुठल्याही तऱ्हेची आडकाठी होऊ नये एवढाच आहे.

येथल्या जमिनी तशा बऱ्या आहेत पण उत्पादन पद्धती अगदीच प्राथमिक.

शेती उत्पादन थोडे, जंगलाची संपत्ती दुसऱ्याच्या मालकीची. मग किमान

गरजा भागविण्यासाठी 'चोरी' हा एकच उपाय शिल्लक राहतो. येथील जंगलांची भयानक चोरटी तूट सुरू साहे– सरकार याला काहीही प्रतिबंध करू शकत नाही.

कामोदला आमचा पहिला रात्रीचा मुक्काम पडला. डासांनी आणि चिलटांनी एक क्षण बसणे अशक्य करून टाकले होते. एक अर्धवट जळालेला ओंडका झोपडी-बाहेर पडला होता. हा पेटवून धूर करणे हीच या गिरिजनांची मच्छरदाणी. धुरा-मुळे चिलटांचा त्रास कमी होतो. आम्ही सारखी घाई करीत होतो– लवकर जाळ होऊ द्या, डास-मच्छरांपासून आमची सुटका करा. हा ओंडका, ही लाकडे अर्थातच चोरून आणलेली होती. असे हरघडी येथे लाकूड लागते, झाडपाला लागतो. याची दुसरी काही सोय केल्याशिवाय केवळ 'वनमहोत्सव' साजरे करून काय होणार आहे !

आम्ही मात्र ज्या गावी गेलो तेथे हा विचार सांगत होतो––

'सात वर्षे येथे लागोपाठ दुष्काळ पडतो आहे. तुमच्या झोपड्यांत जाऊन आम्ही तुमची रिकामी गाडगी-मडकी पाहिली. तुमची उपासमार होत आहे, हे सगळं खरं आहे. पण यावर उपाय काय ? तुम्ही जंगले तोडता म्हणून पाऊस नाहीसा होतो. हे असेच चालू राहिले तर तुमच्या मानगुटीवर बसलेले दुष्काळाचे भूत कधीच हलणार नाही. आज 'सातपुडा सर्वोदय मंडळ' आहे, 'भाऊ' आहेत, (मंडळाचे निष्ठावंत गांधीवादी कार्यकर्ते–श्री. दामोदारदास मुंदडा, वय साठीच्या पुढे) कुठून तरी बाहेरून, आपल्या मित्रमंडळींना येथील परिस्थितीची कल्पना देऊन ते पैसा उभा करू शकतात. तुम्हांला कामाच्या मोबदल्यात का होईना वाटतात, तोवर ठीक ! पण हे किती दिवस चालणार ! बाहेरचे लोकही दुष्काळाला मदत करून कंटाळले आहेत, शिवाय बाहेरची परिस्थितीही आता खराब होत चालली आहे. तुमची परिस्थितीही वीस वर्षांपूर्वी होती त्यापेक्षा आज अधिक खालावलेली आहे. तुमच्यापैकी प्रत्येकजण आज कर्जबाजारी आहे. कोणी 'विकासा'चा पैसा, कोणी 'सोसायटी'चा पैसा, कोणी 'सर्वोदया'चा पैसा उचलला आहे आणि कोणाला काहीही परत केलेलं नाही. उपासमार वाढतेच आहे, क्वचित एखाद्या झोपडीत बॅटरी चमकते किंवा रेडिओ वाजतो याला काही अर्थ नाही. ही काही प्रगती नव्हे, विकास नव्हे. वीस वर्षांपूर्वी तुम्ही आलेल्या पाहुण्याला गोडधोड जेवू घालू शकत होतात, शंभर वर्षांपूर्वी तुम्ही पाहुण्याच्या घोड्यालाही चारोळीची चंदी चारू शकत होतात––आज कुठे आहात ! त्या वेळी तुम्ही तुमचे राजे होतात, मालक होतात. आज सरकारचे नाहीतर सावकाराचे गुलाम आहात. हे सरकार आणि सावकारसुद्धा परक्या देशांचे गुलामच आहेत. गेली वीस वर्षे यांना भीक मागण्याची, हात पसरण्याची घाणेरडी सवय लागलेली आहे. यांचा स्वतःवर, आपल्या लोकांवर, लोकांच्या कर्तृत्वशक्तीवर विश्वासच नाही. तुम्ही या मोठ्या भिकाऱ्यां-कडून काय भीक मागता ! याने तुमची परिस्थिती सुधारणार आहे का ?

त्यातून तुमचा हा भाग ग्रामदानी गावांचा. खूप गाजावाजा झाला आहे बाहेर, की भारतातले पहिले प्रखंड दान इथे झाले. सारा अक्राणीमहाल तालुकाच विनोबाजींना दान दिला गेला. दान आणि भिक्षा यांत दोन ध्रुवांइतके अंतर आहे. ग्रामदान म्हणजे स्वावलंबनयुगाची पहाट–फक्त हे युग सहकार्याने, समजुतीने, स्वयंस्फूर्तीने आणणे एवढेच वैशिष्ट्य. ग्रामदानी गावातील विकासही सरकारी वा अन्य बाह्य मदतीवरच विसंबून असेल तर ही कसली आहे क्रांती ? इथे काहीतरी गफलत आहे. 'स्वयंपूर्ण ग्रामराज्य' हे या आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट आहे आणि प्रवास मात्र सुरू आहे उलटया दिशेने. तुम्ही तरी हा उलटा प्रवास थांबवा. इथे, आजच स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे ठरवा.'

"म्हणजे काय करा ?" कोणीतरी आपल्या पावरी बोलीत आम्हांला प्रश्न करी आणि मराठी तर्जुमा समजल्यावर आम्ही सांगत असू—

'ग्रामदान झालं आहे म्हणता. जमिनीचे न्याय्य वाटप केलं का ? शेती नीट करता का ? किती दगडधोंडे अजून शेतात पडले आहेत. उचलून तेच बाजूला लावा. बांध तयार होतील. साध्या शेणखताचा आणि सोनखताचा सांभाळ केलात तर तुमचे सारे कर्ज फिटून जाईल हे 'भाऊ' सांगताहेत यावर विचार करा. गरजेपुरती नवीन जंगले लावा. जुनी तोडू नका. कोणी तोडीत असतील तर प्रतिकार करा. यासाठी कायदा बदलून घ्यावा लागला तर त्यासाठी चळवळ करा. दारूपायी येथे किती पसा वाया जातो ? किती खून, किती मारामाऱ्या ? एका खुनाची चौकशी करून फौजदार चौकीवर परततो न परततो तोच दुसऱ्या खुनाची वर्दी त्याच्या टेबलावर पडलेली असते. हे तुमचे तुम्हीच कमी केले पाहिजे. पोलिस तुम्हांला कधीही सुधारू शकणार नाही, फॉरेस्टर नेहमीच तुम्हांला बाई, बाटली आणि कोंबडी मागणार. हे शोषणचक्र थांबवण्याचे तुम्ही एकदा नक्की ठरवा म्हणजे मार्ग हळूहळू सापडेल. स्वतःवर विश्वास मात्र हवा. तुम्हांला साहित्यात 'जंगलचे राजे' म्हणतात. आजतरी तुम्ही केवळ नामधारीच आहात. खरेखुरे राजे व्हा. राज्य करा.

*जमाना या गावी एक सभा खूपच रंगली. १५ ऑगस्टला एक परिषद बोलवावी व त्यात परिस्थितीचा एकत्रित बसून सर्वांनी विचार करावा, असे ठरले.*

*१५ ऑगस्टला ही परिषद धडगाव येथे भरत आहे.*

*पाहूया 'पवनाकाठच्या धोंडी'ची अवलाद या महाराष्ट्रात, या भारतात, या छत्रपतींच्या आणि टिळक-गांधींच्या देशात अद्याप जिवंत आहे का !* —श्री. ग. मा.



श्री. बाबासाहेब पुरंदरे

# एका हट्टी माणसाची कथा

मावळ खोऱ्यातल्या पवनाकाठच्या एका हट्टी माणसाला श्री. गो. नी. दांडेकर यांनी उजव्या हाताला धरून मराठी साहित्याच्या सदरेवर मोठ्या मानाने आणून बसवलं आणि त्याच क्षणी हजार हजार नजरा ह्या आसामीवर खिळल्या. अवघ्यांच्या माना झुकल्या. तुंगीगडाच्या या हवालदाराला कौतिकाची शेलापागोटी रसिकांनी बहाल केली. पवनपट्टा गाजला. पवनाकाठच्या धोंडी हवालदाराची कातीव व्यक्तिरेखा मराठी वाचकांच्या मनात न विसरण्यासारखी ठसली.

कादंबरी गाजली. नंतर श्री. गो. नी. दांडेकरांनी याच कादंबरीला नाटकाचा साज चढविला. या नाटकाचे धंदेवाईक प्रयोग झाले नाहीत. पण जे हौशी प्रयोग झाले, ते मात्र खरोखर उत्तम झाले. त्यांतही दिसून आलं की, पवनाकांठचा हा हट्टी माणूस रसिकांच्या काळजाचा कबजा घेतो.

आता ' श्रीमहालक्ष्मी चित्र ' संस्थेने धोंडी हवालदाराला रुपेरी पडद्यावर आणून रूजू केलं आहे. इथंही धोंडोचा दिमाख आणि हवालदारी पीळ कायम टिकला आहे. प्रेक्षकांना त्याने जिंकलं आहे. रसिक प्रेक्षक मनापासून धोंडीवर खूश आहेत. ' श्रीमहालक्ष्मी चित्र 'च्या तंत्रज्ञांनी आणि कलावंतांनी शिरावर घेतलेली ही अत्यंत अवघड कामगिरी चोख बजावली आहे. एक तोलदार चित्रपट पडद्यावर फारा दिवसांनी दाखल झाला आहे. वेताल, वकाल आणि अकुलीन हिंदी चित्रपट बघणाऱ्यांनी हा पवनाकांठचा खानदानी मराठा बघावाच.

' पवनाकांठचा धोंडी ' ही कादंबरी गाजली. पण ती पडद्यावर प्रभावीपण सादर करणं ही एक अत्यंत अवघड गोष्ट होती. कारण ह्या कादंबरीत ' कथा ' नाही. ' हकीकत ' आहे. नायक, नायिका, खलनायक, संकटे, गैरसमज, वादळे, मग सारे उलगडे आणि शेवटी रडारड किंवा आनंदीआनंद असा या कथानकाचा साचा नाही. प्राणापलीकडे आपल्या जीवनमूल्यांना जपू पाहणाऱ्या एका हट्टी पण अत्यंत सहृदय माणसाच्या जिवाची, आजच्या नादान, लबाड आणि भ्रष्ट जगांत कशी बेचैन अवस्था होते आहे, ही ' हकीकत ' या कथानकांत आहे. तुंगीगडाचा धोंडी हा पिढीजाद किल्लेदार. बापजाद्यांनी शिवाजीराजांच्या वक्ताला पराक्रम गाजवला. रक्त शिंपलं. राजांनी ढमाल्यांच्या घराण्याला दहा बिघ्यांची काळी जमीन इनाम दिली आणि गडाची किल्लेदारी बहाल केली. त्या कुळात धोंडी जन्मला. धोंडीच्या त्या भावाचं नाव कोंडी. वयात बरंच अंतर. धोंडीला जीव की प्राण वाटतोय तो तुंगीगड. काय उरलं होतं त्या गडावर ? तट कोसळले होते. बुरूज ढासळले होते. दरवाजाचं कुसू उखडलं होतं. रान माजलं होतं. निर्मनुष्य शुकशुकाट सर्वत्र ! पण अशा उजाड गडाचा धोंडी अभिमान धरतोय. किल्लेदारीचं पागोटं गावच्या जत्रेत माथी मिरवतोय. त्याचा हा अभिमान जबरदस्त आहे. पण तो तरीही डॉन क्यूझोट मात्र नाही. आपल्या शेतावर त्याचं अपार प्रेम आहे. बैलांच्या बरोबरीने तो त्यात राबतोय. आपल्या पत्नीवर, आपल्या धाकट्या भावावर, आपल्या गावकऱ्यांवर गुराढोरांवरही त्याचं अपरंपार प्रेम आहे. स्वार्थाच्या पार

## पवनाकांठचा धोंडी

पलीकडे जाऊन धोंडी आपल्या भक्तीच्या पवनमावळावर माया करतोय. आळंदी-पंढरीचा बुक्का आणि तालमीतली तांबडी माती त्याला सारखीच प्रिय आहे. त्याचं काळीज वारकऱ्याच्या आणि धारकऱ्याच्या रक्तामांसाचं आहे. ते आभाळासारखं विशाल आहे. त्याचं जगणं खानदानी आहे. तो अजूनही जगतोय खानदानी शिवकालात. आजच्य बाजारी, स्वार्थी, लबाड, अभिमानशून्य, संकुचित, नकली, बेजबाबदार, बेहिमती, अंगचुकार, दिवाळखोर, चैनी वागणुकीचा त्याला तिटकारा आहे. पण त्याचं दुर्दैव हेच आहे की, अशाच न पटणाऱ्या गोष्टीपुढं त्याला अगतिक होऊन माघार घ्यावीलागतेय. तो माघार घेतोय पण मान मात्र झुकवीत नाही. याचा पीळ असा आहे की, नांगर स्वतःच्या मानेवर धरून नांगरता नांगरता रक्त ओकून मरायची याची तयारी आहे. शिवाजीराजांनी दिलेल्या जमिनीत नांगराला जुंपायला बैल उरले नाहीत म्हणून तो गावापुढं भीक मागायला तयार नाही. हवालदार जमीन नांगरायला असमर्थ झाला, हे जगाला दिसू द्यायला त्याची तयारी नाही. भयंकर जिद्दीचं हे हाड आहे. आपलं कुळ, शिळ आणि परंपरा हवालदाराच्या रक्ताची आहे; आपण आणि आपल्या घरातल्या साऱ्या माणसांनी तसंच वागलं पाहिजे अशी त्याची मनापासून इच्छा आहे. अन् इथंच ह्या त्याच्या इच्छांचा, म्हणजेच त्याच्या सुखस्वप्नांचा पराभव होतोय. तो पराभव त्याच्या सुखस्वप्नांचा आहे. त्याच्या मनाचा व शरीराचा मात्र नव्हे. आपल्या देहाचा आणि मनाचा पराभव पत्करायची त्याची तयारी नाही. तो प्राण अर्पण करतोय. तो सतीसारखा निष्ठेने मरतोय. पण ' कमीपणाने ' जगणं झिडकारतोय.



धोंडी (चंद्रकांत), धोंडीची बायको (सौ. सुमतिबाई जोगळेकर), धोंडीचा धाकटा भाऊ कोंडी (सूर्यकांत) असा तिघांचाच संसार आहे. तिघांचंही एकमेकांवर अपार प्रेम आहे.धोंडीचं आपल्या भावावर जेवढं प्रेम आहे तेवढंच गावातल्या पोरांवरही आहे.

जत्रेतील बैलांची शर्यत न्हाव्याच्या पोरगा जिंकतो. पुढे तर कुस्तीत कोंडीला चितपट मारून तो न्हाव्याच्या पोरगा विजयी होतो. कोंडी चिडतो; पण धोंडीला मात्र न्हाव्याच्या पोराचं कौतुक वाटतं. तो त्याला आनंदाने उचलतो. धोंडी असा उमद्या मनाचा आहे.

म्हशी विकत घेऊन दुधाचा धंदा करण्याचं वेड कोंडीच्या मनात शिरतं. हे घोंडीला पटत नाही. हा धंदा हवालदाराच्या इभ्रतीला कमीपणा आणणारा आहे असं त्याला वाटतं. दुधात पाणी घालून मुला-लेकरांच्या शापाचा पैका आपल्यात नको अशी त्याची दानतशीर भूमिका असते. पण अखेर भावाच्या आणि पत्नीच्या मनासाठी आपलं मन मारून तो कोंडीला म्हशी आणून देतो. पण लगेच म्हणतो, "त्या दुधाचा थेंब माझ्या पानीत पडता कामा नये. त्या दुधाच्या पैशाला मी शिवणार नाही !" हवालदाराचा पोर खांद्यावर कावड घेऊन अन् नंतर लबाडीचा धंदा करून पैसा मिळवणार ही कल्पनाच घोंडीला सहन होत नाही.



असेच सारे संघर्ष घोंडीच्या जीवनात घडत आहेत. पुढे कोंडीच्या म्हशी मरतात. धंदा बसतो. गावकरी दोस्त (वसंत शिंदे) कोंडीला सल्ला देतात, जमीन गहाण टाकण्याचा ! हा सल्ला कोंडीला पटतो पण घोंडीला कसा पटणार ? म्हणून मित्रवर्य जादा सल्ला देतात की, जमिनीची वाटणी मागून घे ! हा तर घोंडीवर भयंकरच आघात ! घोंडी भडकतो. शिवाजीराजानं दिलेल्या जमिनीची अशी चिरफाड ? घोंडीचं काळीजच फाटतं. तादानादाने सिगारेटीपासून बाई आणि बाटलीपर्यंत पोहोचलेला कोंडी आपल्या दोस्ताच्या चिथावणीने, दारूच्या धुंदीत घोंडीला आडवाटेवर रात्री काठ्यांनी मारतो. तरीही घोंडीला त्या माराच्या यातना होत नाहीत. त्याला यातना होतात कोंडीच्या असल्या वागण्याच्या आणि तरीही अगतीक मनाने घोंडी माघार घेतो. साऱ्या जमिनीचेच बक्षीसपत्र तो कोंडीच्या नावाने करून देतो. दुधाच्या धंद्यासाठी स्वत: कर्ज आणून कोंडीला पैसे देतो. घोंडीचा पीळ इतका आहे की, कोंडीच्या लग्नासाठी तो कर्ज काढतो. त्याच्या दुधातल्या पाण्याच्या पैशाला तो शिवतही नाही. स्वत:ची बायको मरणाच्या दारात येऊन ठेपली; कोंडीने लोणावळ्याहून डॉक्टर आणला, तरीहि घोंडी अत्यंत व्यथित पण तेवढ्याच कठोर मनाने कोंडीला सांगतो, "नको ते विष —पापाच्या पैशातून आणलेलं विष तिच्या अंगात टोचून तिचा प्राण नको वाचवूस !" कारण अशा जगण्याला घोंडीच्या खानदानी हिशेबी किंमत शून्य आहे, घोंडीची बायको मरते !

[ पृष्ठ ९४ वर चालू ]

# वीस वर्षांच्या वाटचालीचे फलित !

प्रथम बीरेंद्रसिंग, नंतर चरणसिंग आणि आता गोविंदनारायण सिंग या 'सिंग-त्रिमूर्ती'नी गेल्या चार–पाच महिन्यांच्या काळात काँग्रेस पक्षाच्या पदरात नामुष्कीचे आणखी माप टाकले. अर्थात या तुंदिल–तनू पक्षाच्या घसरगुंडीला गेल्या सार्वत्रिक निवडणुकींपासून प्रारंभ झाला होता. बिहार, बंगाल, ओरिसा, पंजाब, मद्रास आणि केरळ या राज्यांतील मतदारांचे काँग्रेसेतर पक्षांच्या उमेदवारांना बहुसंख्येने निवडून आणून या सहा राज्यांमध्ये काँग्रेसविरोधी पक्षांची मंत्रिमंडळे सत्तारूढ केली. याच वेळेस राजस्थान हे राज्यही काँग्रेसच्या हातातून जाणार होते. परंतु मोहनलाल सुखाडिया यांच्यासारख्या चतुर राजकारणी कार्यकर्त्याने राष्ट्र-पतींच्या राजवटीची सवड साधून काँग्रेस पक्षातून बाहेर पडलेल्या सदस्यांना पुन्हा आपल्या कळपात आणण्याची कारवाई केली आणि त्यामुळे पश्चिम सीमेवरच्या या राज्यातील काँग्रेसची प्रतिष्ठा सावरली गेली. अर्थात महारावळ लक्ष्मणसिंग यांच्या-सारखा विरोधी पक्षाचा नेता स्वस्थ बसलेला नाही. सुखाडिया राजवटीविरुद्ध काही काँग्रेसपक्षीय सदस्य केव्हा बंडाचा झेंडा उभारतील, याचा नेम सांगता येत नाही.

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

परंतु या सात राज्यांपेक्षा उत्तर प्रदेश, हरियाना व मध्यप्रदेश या राज्यांत जे काही घडले त्याची पार्श्वभूमी वेगळी आहे. या तीन राज्यांत सार्वत्रिक निवडणुकीनंतर काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तारूढ झाल्यानंतर काही काँग्रेस सदस्यांनी आपण होऊन पक्षांतर केले आणि संयुक्त विधायक दलाशी संगनमत करून चंद्रभानु गुप्त, भागवत दयाल शर्मा आणि द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्यासारख्या सत्ताबाजीच्या डाव-पेचात निपुण असलेल्या मुख्यमंत्र्यांना दूर ढकलले. बीरेंद्रसिंग, चरणसिंग आणि गोविंदनारायण सिंग यांच्या या कर्तबगारीबद्दल त्या त्या विधानसभांमध्ये त्यांचा गट अल्पसंख्याक असून मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे चालत आले.

चंद्रभानु गुप्त काय, भगवत दयाल शर्मा काय किंवा नुकताच डच्चू मिळालेले द्वारकाप्रसाद मिश्रा काय, या तिघांच्या पदच्युतीबद्दल खेद वाटावा अशी मुळीच परिस्थिती नाही. हाती आलेल्या राज्ययंत्रणेवर दीर्घकाल आपली पकड कशी राहील व त्यायोगे आपले व आपल्या होयबांचे भले कसे होईल याच एका विचाराने या मुख्यमंत्र्यांची पावले पडत होती. त्यामुळे त्यांचा पराभव झाला यात वाईट असे काहीही घडलेले नाही. पण त्यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून जे बंडखोर काँग्रेस सदस्य आरूढ झाले आहेत, त्यांच्या या उठावामागेही या वैयक्तिक स्वार्थापेक्षा दुसरा कोणता हेतू होता हा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळावे हा चरणसिंग यांचा दावा काँग्रेस श्रेष्ठांनी अमान्य करून गुप्तजींच्या अंगावर मुख्यमंत्रिपदाची झूल चढविली. याच केवळ एका कारणापायी चरणसिंगांचा तडफडाट झाला नव्हता काय ? भगवत दयाल शर्मा यांनी बीरेंद्रसिंगांना मंत्रिमंडळात समाविष्ट करून त्यांच्याकडे एखादे महत्त्वाचे 'खाते' सोपविले असते तर त्यांनी 'शर्मा राजवट मुर्दाबाद'चा पुकार केला असता का ? किंवा द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्यासारख्या महाकोसलमधील कार्यकर्त्यापेक्षा विंध्य प्रदेशातील सदस्याची पक्षनेतेपदी निवड करण्याचे चातुर्य पक्ष–श्रेष्ठांनी दाखविले असते तर गोविंदनारायण सिंग यांनी राजमाता विजयाराजे यांच्याशी संगनमत करून मिश्राजींच्या खुर्चीखाली बाँबस्फोट केला असता काय, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

सत्तेच्या 'खिरापत-वाटपा'त आपल्यावर अन्याय झाला या एकाच संतापातून बंडखोरीचे हे पर्व सुरू झाले असल्यामुळे काँग्रेस-राजवट कोसळली याबद्दल सर्वसामान्य नागरिकाला आनंद वाटणे स्वाभाविक असले तरी नव्या राजवटीचे गुणगान गाताना त्याला ही राजवट कोणत्या उद्देशाने व कोणत्या रीतीने अधिकारा-

रूढ झाली आहे याचे भान विसरून चालणार नाही. फेरनिवडणुकांची मिश्रा यांनी केलेली मागणी स्वार्थी हेतूने केली असल्यामुळे व तेवढा खर्च सध्याच्या परिस्थितीत परवडणार नसल्यामुळे फेरनिवडणुकांचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवणे आवश्यक आहे; परंतु चरणसिंग, बीरेंद्रसिंग, गोविंदनारायण सिंग प्रभृतींनी ज्या पक्षाचा कार्यक्रम मतदारांपुढे ठेवून निवडणुका जिंकल्या त्यांना तो कार्यक्रम एका रात्रीत बाजूला ठेवून संयुक्त विधायक दलाच्या 'किमान कार्यक्रमाशी' सोयरिक जुळविण्याचा कोणता अधिकार आहे हा प्रश्न कोणीतरी त्यांना खडसावून विचारावयास नको का? काँग्रेसच्या सडलेल्या राजकारणाला कंटाळल्यामुळे तिच्यापासून दूर होऊन, नव्हे तिच्याविरुद्ध लढत देऊन, राज्ययंत्रणा ताब्यात घेणाऱ्या अजय मुकर्जी यांची राजवट समजू शकते. (नक्षलबारीच्या खडकावर त्या संमिश्र राजवटीलाही किती हादरे बसले ही गोष्ट वेगळी! कारण, त्यामुळे कम्युनिस्टांशी सत्तेची भागीदारी केली की, इतरांची काय गत होते या जुन्या अनुभवाची नवीन आवृत्ती दिसून आली एवढेच.) परंतु एकाच पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या मिश्रा यांना दूर ढकलून आणि विरोधकांशी संगनमत करून किमान कार्यक्रमाची घोषणा करणारे गोविंदनारायण सिंग आपल्या मूळ प्रतिज्ञेशी कितपत प्रामाणिक आहेत यासंबंधी शंका वाटते. कारण तसे असते तर फेरनिवडणुकांचे मिश्रा यांचे आव्हान स्वीकारण्याची गोविंदनारायण सिंगांनी तयारी दाखविली असती. लोकांना परवडणार नाही ही सबब पुढे आली नसती. निवडणुकीनंतरचे राजकारण हे अशाच मार्गाने चालणार असेल तर हा महागडा खर्च मतदारांना केव्हाच परवडणार नाही! परंतु आज तरी असले प्रश्न विचारण्याची कोणाची मन:स्थिती दिसत नाही. पण असा अवघड प्रश्न विचारला की, या सिंगांची किती त्रेधातिरपीट उडते याचा बीरेंद्रसिंगांनी पुरेपूर अनुभव घेतला आहे. आपले मूळचे अकरा सदस्यांचे मंत्रिमंडळ त्यांना दुपटीने फुगवावे लागले. याचे कारण, 'तुम्ही खुर्ची मिळविलीत. आमचे काय?' हा प्रश्न विचारणाऱ्याला 'तुलाही खुर्ची देतो हं' असे सांगण्यावाचून बीरेंद्रसिंगांजवळ दुसरे उत्तर नव्हते. याचा थोडक्यात अर्थ असा की, आपली खुर्ची सांभाळण्यासाठी आणखी अकरा खुर्च्यांचा खर्च नागरिकांच्या माथी मारावा लागला.

## नेहरू गेले आणि आता काँग्रेसही . . .

आता नऊ राज्यांमध्ये काँग्रेसविरोधी पक्षांची राजवट प्रस्थापित झालेली आहे. देशातल्या एकूण सतरा राज्यांपैकी नागाप्रदेश आणि काश्मीर या राज्यांचा दर्जा व तेथली परिस्थिती उर्वरित राज्यांपेक्षा वेगळी आहे. म्हणून या दोन राज्यांचा विचार बाजूला ठेवला तर उरलेल्या पंधरा राज्यांपैकी नऊ राज्यांतील म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी साठ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आता काँग्रेसच्या भ्रष्टाचारी राजवटीपासून दूर गेलेली आहे. गेल्या सहा महिन्यांत परिस्थितीने अनपेक्षितरीत्या किती वेगळे वळण घेतले! व्हिक्टोरिया राणीच्या काळात ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य

कधीच मावळत नाही असे म्हटले जात असे. तसेच नेहरूंच्या काळात काँग्रेसला सत्तेवरून कोणीच दूर करू शकत नाही असे म्हणण्यात येत असे. वस्तुस्थितीही तशीच होती. परंतु ही महान व्यक्ती निधन पावताच परक्यांच्या हातून सत्तास्वीकार करणाऱ्या या पक्षाची किती शोचनीय अवस्था झाली याचा विचार केला की, भारतीय राजकारणाचे मूलस्वरूप ध्यानी येते.

स्वातंत्र्य मिळवून आता वीस वर्षे होत आहेत. या अवधीत प्रारंभीची राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपण बळकट केली की दुबळी केली याचा या निमित्ताने विचार होणे आवश्यक आहे. संपूर्ण देशाचा विचार करून त्यानुसार पावले टाकण्याचा ध्येयवाद, काँग्रेसची गोष्ट तर सोडाच; पण इतर कोणत्या तरी पक्षात शिल्लक उरला आहे काय ? मध्यप्रदेशाचे राजकारण वेगळे, बंगालचे वेगळे, म्हैसूरचे वेगळे असा राज्यवार विचार बळावल्याचे दृश्य दिसत आहे. तसे नसते तर नक्षलबारी–प्रकरणाबाबत डाव्या कम्युनिस्टांवर टीकास्त्र उगारणारा संयुक्त समाजवादी पक्ष नंबुद्रिपादांच्या केरळमध्ये मूग गिळून बसला नसता किंवा पंजाबच्या राजकारणात जातीयवादाचा प्रभाव वाढविणाऱ्या अकाली दलाशी जनसंघाने सोयरीक केली नसती. प्रजासमाजवादी पक्ष हा तर स्वतःला खास सोवळा पक्ष समजतो. परंतु तोही मिश्रा यांना खाली खेचण्यासाठी ' राजमाता विजयाराजे की जय 'ची घोषणा करतो. आणि परत आमचा पक्ष हा राष्ट्रीय पक्ष आहे असा या प्रत्येक पक्षाचा दावा आहे. महाराष्ट्रामध्ये कम्युनिस्टांच्या वाऱ्याला उभे न राहणारे जनसंघ आणि प्रजासमाज-वादी पक्ष नर्मदा ओलांडली की निराळी भाषा बोलू लागतात. वीस वर्षांपूर्वीचा प्रखर आणि ज्वलंत ध्येयवाद पक्षाच्या जाहीरनाम्यापुरता मर्यादित ठेवून सर्वजण प्रवाहाच्या दिशेने उडी घेऊ लागले आहेत. या प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे मनोधैर्य कोणाच्याही अंगी उरलेले नाही हेच आमच्या गेल्या वीस वर्षांतील वाटचालीचे फलित आहे. ○


**सरदार गृह**

क्रॉफर्ड मार्केट शेजारी,
मुंबई २

**राहण्याची व भोजनाची मनपसंत व्यवस्था**

अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
टिळक हॉलमध्ये लग्न-मुंजी समारंभ व मेजवान्यांची
उत्कृष्ट सोय.

**फोन नं. ३८३३७**

# मुक्ताफळे



## □ कठिण समय येता !

अरब चले दर्यापर नसिब चले साथ
मोतनके लिये डुबकी मारी तो शंख लगे हाथ ॥

कळला का अर्थ ? एक अरब समुद्रसफरीला निघाला. पण नशीब त्याच्याबरोबर होतेच. त्याने मोती मिळविण्यासाठी समुद्रात बुडी मारली तो हातांत मात्र शंख लागला; कारण नशीब बरोबर होते ना ? आम्हांला तरी अरब–इस्रायल युद्धात अरबांचा पराभव होण्याचे हे एकच कारण दिसते. लढाईपूर्वी दहाच दिवस आधी नॅशनल असेम्ब्लीपुढे बोलताना भारताचे परम मित्र नासर म्हणाले होते—

" Our principal aim will be distruction of Esreal "—आपले प्रमुख उद्देश्य इस्रायलचा नायनाट करणे हे राहील. तीन वर्षांपूर्वी मला हे शक्य वाटत नव्हते व मी तसे म्हणण्यास तयार नव्हतो. आज १९५६ नंतर ११ वर्षांनी मी हे म्हणतो. कारण आपली लष्करी तयारी किती आहे याची मला खात्री आहे—"

केवढा हा आत्मविश्वास ! युद्धापूर्वी आठवडाभर छागलांचे हे बडे यार नासर म्हणाले—

" आमची संपूर्ण तयारी झाली आहे व इस्रायलशी सामना करायला आम्ही उत्सुक आहोत. "

युद्ध सुरू होण्यापूर्वी २४ तास हा स्वर्णसिंगांचा सखा नासर म्हणाला— " We are waiting impatiently for the battle—लढाईसाठी आम्ही अगदी आतुर झालो आहोत. "

नासर यांचे युद्धमंत्री शम्स बद्रन हे मॉस्कोला जातीने गेले होते व त्यांनी कोसिजनकडून निरोप आणला होता—

" सोविएट रशिया या युद्धात तुमच्या खांद्याला खांदा भिडवून उभा राहील. १९५६ च्या सरहद्दी पुनः प्रस्थापित करीपर्यंत, इतर कुठल्या मोठ्या राष्ट्राला या इस्रायल संहारात आम्ही पडू देणार नाही. "

एवढी जय्यत तयारी करून नासरने इस्रायलवर डोळे वटारले ... आणि त्या एकडोळ्या मोशे दायान याने अरबांचीच धूळधाण केली की हो ! नासर यांच्या दोन्ही डोळ्यांपुढे अंधारी आली. छापा घालायला गेलेल्या नासरखानाची- बोटे तुटली. बोटे तुटताच त्याने शस्त्र खाली ठेवले !

मोती काढण्यासाठी, अकाबाच्या आखातात डुबकी मारणाऱ्या अरबांच्या हातांत तूर्त शंख लागले आहेत. हा केवळ नशिबाचाच भाग होय. मंडळी, तूर्त हे सर्व शंख पृथक पृथक वाजत आहेत ! कठिण समय येता शंख कामास येतो......

## ☐ नकाशा कशाला ?

राजस्थानात सुखाडिया सुखाने राज्य करीत आहेत हे विरोधी पक्षांना पाहवत नाही. नाना खुसपटे काढून राजस्थानमधील मंत्रिमंडळाला बदनाम करण्याचे पवित्रे विरोधी पक्ष टाकीत असतो. हे चांगले का ? परवा राजस्थान असेम्ब्लीत श्री. गोएल या जनसंघ सदस्याने सुखाडियांचे शिक्षणमंत्री बरकत उल्लाखान यांना राज्यातील हिंदी पाठ्य पुस्तकांत भारताचा जो नकाशा छापला आहे, त्यात आसाम, मणिपूर व त्रिपुरा हे भाग दाखवलेलेच नाहीत याबद्दल सवाल केला. या राज्यातील आमच्या मंत्र्यांची नावेच कशी आहेत पाहा. मुख्यमंत्री सुखाडिया तर शिक्षणमंत्री बरकत उल्लाखान ! येथे सुखाला व बरकतीला काय तोटा ? अशा या राज्यातील हिंदी शैक्षणिक पाठ्य पुस्तकात एखाद्या नकाशात आसाम, मणिपूर, त्रिपुरा, ही राज्ये नसली दाखवली तर त्यात एवढे रागावण्यासारखे हो काय आहे? जनतेच्या सुखात किंवा उद्योगधंद्यांच्या बरकतीत असा काय विक्षेप यामुळे येत होता ? फाळणी झाल्यापासून भारताचा पूर्ण नकाशा काढणे किती कठीण झाले आहे याची विरोधी पक्षांना काय कल्पना येणार ! पहिल्यांदा शाळेतली पोरे भारताच्या नकाशात सिलोन, ब्रह्मदेश, तिबेटदेखील दाखवत असत. तिबेट गेले, काश्मीरचे अजून काही ठरत नाही, पाच वर्षांपूर्वी लोंगजू गेले, अक्साई चीन माओने पळवला, हाजीपीर आपले आहे– परंतु पाकिस्तानला दिलेले आहे; लाठीतिल्ला–दुमाबारी आपली आहेत तीं पाकिस्तानला दिलेली आहेत. कच्छचा काही भाग पाकिस्तानला दिलेला आहे. अशा परिस्थितीत भारताचा अधिकृत नकाशा छापायचा तरी हो कसा ? सरहद्दी असलेला आपला दुर्दैवी देश आहे ! सरहद्द ही कल्पनाच वस्तुतः आपल्या संस्कृतीला मंजूर नाही.

'अवघे विश्वचि माझे घर' ही आपली झेप आहे ! 'जय जगत' हा आपला नारा आहे !! नकाशा ही कल्पनाच आम्हांला त्याज्य वाटते. "भिंतीवरचा नकाशा वाऱ्याने फडफडला म्हणून देशात क्रांती होत नसते," असे नेपोलियन म्हणाला होता. आमचे म्हणणे नकाशात आसाम, मणिपूर, त्रिपुरा दाखविली तरी काय होणार ? आपल्या कल्पनेत 'अवघे विश्व आहे' तिथे या आसाम, त्रिपुराचे काय घेऊन

बसलात ? नकाशाला फारसा अर्थ नाही. जगाच्या नकाशातून भारत नष्ट झाला तरच 'अवघे विश्वचि माझे घर' ही कल्पना प्रत्यक्षात उतरणार आहे. एखादी गोष्ट घडण्यापूर्वी ती कल्पनेत जन्म घेते. पाकिस्तान प्रथम एक कल्पना होती. पुढे ते सत्य झाले. आसाम, मणिपूर व त्रिपुरा ही भारतातून फोडण्याचा प्रयत्न चालू आहे, ती फुटल्यानंतर भारत कसा दिसेल याचे चित्र ज्याने कल्पनेने काढले त्याचे आम्ही तरी कौतुक करू. नकाशाच नको अशी आमची भूमिका आहे. नकाशाच नसला की सरहद्दी नाहीत. सरहद्दी नसल्या की सरहद्दीवरच्या कटकटी नाहीत, सैन्य नको, अणुबाँब नको, काही नको. मग उरेल तो समाजवादी विश्वातला, खाली धरणी वर आकाश असलेला समाजवादी नवयुवक ! नकाशाच नसलेला व तोंडात 'जय जगत' चा घोष असलेला तो प्रचंड मानवसमूह आजच आमच्या डोळ्यांना दिसत आहे ! या उत्तुंग ध्येयाच्या दिशेने सुरू झालेली वाटचाल बंद करण्याचे काही एक कारण नाही.

## □ माओ मॅड नाही बरं !

भाई डांगे म्हणाले—" माओचे डोके फिरले आहे. " झाले ! हा खोकला साथी-सारखा पसरला. जो तो दुसऱ्याला सांगू लागला— " ऐकलं का ! माओ मॅड आहे."

मार्क्स, लेनिन आणि गांधी यांचा आजच्या घटकेचा सर्वांत थोर शिष्य आज कुणी असेल तर तो माओ आहे. मार्क्स-लेनिनचे अनुयायी म्हणणाऱ्या रशियातील भाई लोकांनी आपल्या देशात क्रांती करून सत्ता हाती घेताच जागतिक कामगार क्रांतीचे स्वप्न नजरेआड केले आहे.

रशियाच्या आजच्या पुढाऱ्यांना वाटते की अधिक चांगले काम करणाऱ्यांना अधिक अर्थलाभ करण्याची संधी असावी. यामुळे होईल काय तर काहीसे वरच्या दर्जाचे जीवनमान असणारा वर्ग देशात निर्माण होईल. परंतु आर्थिक सुबत्तेवर असा वर्ग देशात तयार झाला की त्याला क्रांती नकोशी होऊ लागते ! १९१७ साली लेनिनने म्हणून सत्तेवर येताच सांगून टाकले— " एखाद्याने कितीही मोठी जबाबदारीची जागा पटकवली तरी त्याचा पगार, उत्पादक—कामगाराइतकाच असला पाहिजे ! " आपल्या देशात लेनिन झाला नाही हे आपले भाग्य नव्हे काय ? नाहीतर आपल्याकडे मंत्री व्हायला इतकी झुंबड मग कुठून उडाली असती ! मंत्री म्हणजे काय घिसाडी, सुताराएवढाच पगार हो घेणार ?

माओला लेनिनच आवडतो. परंतु लेनिन जे म्हणत असे की सर्वांचेच जीवनमान सारखे वाढत गेले पाहिजे, ते मात्र माओला तूर्त शक्य वाटत नाही. म्हणून त्याने काय केले आहे, लोकांना गरीब ठेवले आहे. इकडे ॲटम बॉम्ब करतो पण लोकांना म्हणजे जनतेला हो— आपले दोन घास यथास्थित मिळतील इतकीच सोय त्याने केली आहे. जनता गरीब असली की दुर्गुणही फारसे वाढत नाहीत. साधी

राहणी उच्च विचारसरणी ! एवढ्या बाबतीत माओ गांधीजींचा अनुयायी आहे. जनता राहते तसाच तो राहतो. गांधीजी नाही का उघड्या जनतेचे प्रतिनिधी म्हणून पंचा नेसून गोलमेज परिषदेला गेले !

दुसऱ्या एका बाबतीत माओला लेनिन पसंत नाही. लेनिनने काय केले, सर्व जगातल्या राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. आणि पण प्रत्येक देशात कम्युनिस्ट पक्षांना खतपाणी घालणे सोडले नाही ! आंबा पिकला की जसा गळून पडतो (किंवा गळू पिकले म्हणजे जसे आंब्यासारखे दिसते !) तसा एखाद्या देशात कम्युनिस्ट पक्ष बलवान झाला की तो देशात सत्ताधारी होत जातो. भारतात डांगे, रणदिवे, मिरजकर मंडळी ही अशीच लेनिनची बाळे आहेत. माओ म्हणतो—'लेनिनला रशियाला भांडवलदारी राष्ट्रांपासून कसा वाचवायचा याची काळजी होती ना, म्हणून लेनिनने तो गनिमी कावा केला होता ! मला अशी मुळीच धास्ती नाही. मी अमेरिकेचे तांदूळ घेत नाही, गहू घेत नाही. माझ्याजवळ अॅटमबॉम्ब आहे. ७०–८० कोटी माणसे आहेत. यंत्रापेक्षा अखेर माणूस महत्त्वाचा आहे ! माझ्या देशाचे आता कुणी काही वाकडे करू शकत नाही. मी कशाला गनिमी कावा करू ? मी उघड उघड शत्रुत्व पत्करणार. ज्यांची राज्यपद्धती मला नाहीशी करावयाची आहे, त्यांना 'ग्लासबरो'ला जाऊन मिठ्या मारायला माझी तयारी नाही. मी सतत जॉन्सनला ठणकावीत राहणार— 'व्हाईटनाममधून चालते व्हा ! तुम्ही आहात तोपर्यंत इथे शांतता राहणार नाही !'

डांगे यांना वाटते, लेनिनचा गनिमी कावाच चांगला. आघाड्यांचे राजकारण करावे. देशातल्या मोठ्या पक्षांत मेननगिरी चालू करून त्यांत फाटाफूट करावी, कधी लोहियांची पाठ थोपटावी, कधी एस. एम्.ना जवळ घ्यावे. इथे 'सोविएट देश' फुकट वाटावा. कुणाला 'लेनिन प्राईज' द्यावे. कुणाला 'स्टॅलिन प्राईज' द्यावे. म्हणून डांगे म्हणाले—"माओ मॅड आहे !"

आम्हांला तसे मुळीच वाटत नाही ! माओ हा उघड उघड भूमिका घेऊन उभा आहे. डांगेच मॅड आहेत ! माओची एकेक करणी पाहिली की आपल्याला धक्का बसतो. बसायचाच ! कारण, आपल्याला लाभलेले राज्यकर्ते जनतेच्या नसलेल्या दाढीला हात लावून राज्यकारभार करतात ना ! ( दाढीवाल्यांच्या जास्तीच हात लावतात ! ) माओला समाज बदलायचा आहे. त्यासाठी लागणारी क्रूरता तो टाळू इच्छित नाही. गांधीजी जितके लेनिनला जवळ, त्याहून बुद्धाच्या अधिक जवळ बसल्याने, इथे भारतात सगळा घोटाळा झाला आहे.

( गांधी ) – ( माओ ) = लेनिन. हे समीकरण ग्यानबाने लक्षात ठेवले आहे डांगे यांचे म्हणणे मान्य केले तर हे समीकरण असे होते—

( गांधी ) — ( मॅडनेस ) = लेनिन. आम्हांला वाटते गांधीवादातला 'मॅडनेस' उणा केला तर कम्युनिस्टांचेच कुरण उरते, हे सांगण्यासाठी तर डांगे यांनी हा धूर्त पवित्रा टाकला नाही ना ?

**— ग्यानबा**

# एक युग
# एक पर्व



' युगास्त '

गेल्या पंधरा जुलैला मराठी रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाच्या दोन घटना घडल्या. तसा एकमेकींशी त्यांचा काही संबंध नव्हता. बाल गंधर्वांचा परलोकवास ही एक; विजया मेहता यांचे ब्रिटनला दीर्घ मुदतीसाठी प्रयाण ही दुसरी.

गंधर्वांविषयी खरे तर, न लिहिण्याचा संयम हीच त्यांच्या कर्तृत्वाला समर्पक आदरांजली ठरावी इतके त्यांच्याविषयी त्यांच्या निधनाआधी आणि नंतर लिहिले–बोलले गेले आहे. तरीही एक खरे की, मराठी रंगभूमीवरील प्रदीर्घ गंधर्वयुगाचा अपरिहार्य अस्त गंधर्वांच्या निधनाने जाहीर झाला. तसे पाहिले तर खुद्द गंधर्व रंगभूमीवरून अंतर्धान पावल्याला जवळपास सतरा वर्षे उलटली. त्याही आधी त्यांची वैभवशाली कारकीर्द वाढत्या वृद्धत्वामुळे आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे उताराला लागली होती. ती वर्षे यांत मिळवावी. म्हणजे जवळपास बत्तीस वर्षे व्यक्तिशः हा लोकोत्तर कीर्तीचा कलावंत रंगभूमीवरून अस्तमान असल्यासारखाच होता. तरीही गंधर्व युग संपले नव्हते. गंधर्वांचे गायन, गंधर्वांचा अभिनय, त्यांच्या स्त्री-भूमिकांची विविध प्रसाधने आणि पद्धती, यांचे अनुकरण मराठी रंगभूमीवर चालूच होते. गायनात गंधर्वांची पदे, गंधर्वांच्या लकबी टाळून रंगभूमीवर तर राहोच, पण एरवीही




## विजय तेंडुलकर

गाण्याची उत्तम गायक नट-नटींचीही तयारी आणि प्राज्ञा नव्हती. त्या पदांवर जणू गंधर्व-गायकीची 'मोनॉपली' होती. अभिनयात गंधर्वांच्या वा अन्य स्त्रीभूमिका उभ्या करणारे नट तर गंधर्वांच्या सहीसही अनुकरणातून सुटत नव्हतेच; परंतु गंधर्वांच्याच वा त्यांच्या नसलेल्या अगदी तत्कालीन आधुनिक नाटकांतील भूमिका करणाऱ्या नटीदेखील गंधर्वांची छाप आपल्या अभिनयातून, लकबीतून, संवादांच्या उच्चारणातून आणि गायनातून मोठ्या हुशारीने आणि आग्रहाने दाखवीत होत्या. कधी सवयीच्या फिल्मी अभिनयाची जोड देऊन तर कधी कालानुरूप नव्या नव्या फॅशन्स आणि लकबी जोडूनही अगदी नजीकच्या भूतकालापर्यंत मराठी रंगभूमीवरच्या प्रथितयश नटी गंधर्वांची छाया आपल्या कलानैपुण्यावर मोठ्या परिश्रमांनी आणि अभिनयाने ठसवीत आणि जतन करीत आल्या हे सत्य आहे.

या गंधर्व-छायेबाहेर संपूर्णपणे राहून मराठी रंगभूमीवर ज्या कोणी स्वतंत्र प्रज्ञेच्या मोजक्याच आधुनिक नटी वावरल्या आणि नावारूपास आल्या, त्यांचे प्रति-





निधित्व सहजपणेच जाते ते विजया मेहता—पूर्वाश्रमींच्या खोटे आणि त्याही आधीच्या जयवंत—यांच्याकडे. किंबहुना गंधर्व आणि तदनुषंगिक रंगभूमीविषयक कल्पनांतून मराठी रंगभूमीला प्रकर्षाने एक पूर्ण वेगळे वळण देण्याचे प्रयत्न गंधर्वयुगात आणि नंतर ज्यांनी म्हणून केले त्यांत अनेक नात्यांनी विजया मेहता यांना महत्त्वाचे स्थान आहे हे कोणी नाकारील असे वाटत नाही.

उदाहरणार्थ, निर्मात्या-दिग्दर्शिका म्हणून त्यांनी नाटकापासून संगीताची फारकत करण्याचे धोरण आरंभापासून सातत्याने ठेवले; इतके की 'मी जिंकलो ! मी हरलो !' यासारख्या संगीताला मर्यादित परंतु वाजवी वाव असलेल्या नाटकात-देखील एकाही वाद्याच्या साथीविना वसंतराव देशपांडे यांच्यासारख्या तयारीच्या गायक नटाला गाण्यास लावून, नाटकात संगीताचे स्थान कोणत्याही परिस्थितीत परिपूर्ण आणि प्रधान महत्त्वाचे होता कामा नये हा त्यांचा आग्रहच जणू त्यांनी व्यक्त केला. त्या उलट त्यांच्या 'रंगायन' या नाट्यसंस्थेतर्फे संगीताचे स्वतंत्र जलसे त्यांनी तितक्याच आग्रहाने घडवले.

नाटकाच्या निर्मितीला त्यांनी केवळ प्रत्यक्ष उपयुक्ततेपलीकडे किंवा दिपविणाऱ्या थाटापलीकडे सातत्याने एक अर्थ दिला. नेपथ्य, रंगमंचावरची वस्तू नि वस्तू, पात्रांच्या हालचाली, प्रकाशयोजना, यांना नाटकात एक भूमिका बजावावी लागते आणि या भूमिकांनीही नाटकाच्या एकूण कलात्मकतेत अप्रत्यक्षपणे मोलाची भर पडते हे पाश्चात्त्य रंगभूमीवरचे प्रस्थापित तत्त्व त्यांनी मराठी रंगभूमीवरील आपल्या नाट्यनिर्मितीत अत्यंत चोखंदळपणे राबवले.

पाश्चात्त्य रंगभूमीवरचे अत्यंत नवे प्रवाह त्यांनी एका हट्टाने आणि अप्रियता, कुचेष्टा पत्करूनही मराठी रंगभूमीवर आणून सोडले.

हे सर्व मान्य करूनही विद्यमान मराठी रंगभूमीचा अभ्यासक घसघशीतपणे बोलतो तो त्यांच्या भूमिकांविषयी आणि अभिनयाविषयीच. कारण नटी म्हणून मराठी रंगभूमीवर, त्यांनी काही नवे, वेगळे केले एवढेच नव्हे तर ते मराठी प्रेक्ष-कांच्या पचनी पाडले आणि चांगले नावदेखील कमावले. गेल्या तपातील प्रथम-श्रेणीच्या अभिनेत्रींची नामावली विजया मेहता या नावाशिवाय पुरी होऊ शकत नाही. आणि काहींच्या मते सुरूदेखील होऊ शकत नाही. याही पलीकडे त्यांच्या रंगभूमीवरील अनुपस्थितीत नाट्यगृहातून सर्रास ऐकण्यास मिळणारे अमूक तमूक नटीचे काम—बघणे—बोलणे-हसणे यांपैकी काही विजयाबाईंसारखे वाटते किंवा त्याला विजयाबाईंची सर नाही या प्रकारचे शेरे मराठी रंगभूमीवरील त्यांच्या लोकप्रियतेचेच दर्शक असतात. विजया मेहता यांचे नटी म्हणून असलेले हे स्थान, काल-परवापर्यंत आणि कदाचित आजही विनासायास दाद मिळवून देणाऱ्या गंधर्व-पठडीहून अगदी दूरचे आणि आपले असे स्वतंत्र गुणदोष वागविणारे होते. असेही म्हणता येईल की, आपलीच एक अभिनयाची वेगळी पठडी विजया मेहता यांनी

मराठी रंगभूमीवर अभिनेत्री म्हणून यशस्वीरीत्या निर्माण आणि प्रस्थापित केली.

ही वेगळी पठडी कशी होती ? यासाठी जुन्या, गाजलेल्या नाटकांतील त्यांच्या भूमिकांचीच थोडी चिकित्सा प्रथमतः करावी लागेल.

झुंझारराव, दुर्गा, संशयकल्लोळ आणि सवाई माधवराव यांचा मृत्यू, या चार जुन्या नाटकांत त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. पैकी 'संशयकल्लोळ'मधील कृत्तिकेच्या भूमिकेला त्या नाटकाच्या सातत्यामुळे आणि लोकप्रियतेमुळे एक मोठी पूर्वपरंपरा आणि परंपरेतून पक्की झालेली अपेक्षेची चौकट होती. ही कृत्तिका ढालगज, जरा जादाच ठसका दाखविणारी आणि म्हाताऱ्या नवऱ्याची तरुण बायको म्हणून फार संशयी, कजाग आणि आकस्ताळी होती. अशीच ही प्रेक्षकांच्या लोभाला एक हमखास हसविणारे पात्र म्हणून पात्र ठरलेली होती. विजया मेहता यांची कृत्तिका कर्कश न ठरावी इतपतच ढालगज, गंधर्व किंवा तत्कालीन स्त्रीपार्टी पद्धतीचा अथवा आधुनिक फिल्मी वळणाचा ज़ादा ठसका टाळून ठसकेबाज आणि हातून सुटू पाहणाऱ्या म्हाताऱ्याच नवऱ्याविषयीच्या एका अनावर ओढीपोटी संशयी आणि कजाग होती. हास्यनिर्मिती करूनही ही कृत्तिका एक लोभस स्त्री म्हणून जाणवली. कृत्तिकेच्या उलट 'सवाई माधवराव यांचा मृत्यू'मधील यशोदा—पेशवाईच्या राजघराण्यात अस्सल घरंदाज ब्राह्मणी मर्यादेत आणि संस्कारांत जगत—वागत आलेली ही शालीन स्त्री. विजया मेहता यांनी या भूमिकेत केलेला अभिनय खाडिलकरी तडफेच्या या काहीशा अप्रसिद्ध नाटकाच्या साहित्य संघाने केलेल्या मातबर, नाटकी प्रयोगात आपल्या समजुतीने वेगळा उमटून पडत असे. ही यशोदा केवळ शालीन, देखणी, पतिनिष्ठ बाहुली न वाटता आपल्या तलम शब्दांतून, स्वरांतून, मूक परंतु काहीतरी सतत सुचविणाऱ्या, व्यक्त करणाऱ्या आविर्भावातून एक जिवंत, विकसते व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या विविध प्रतिक्रियांची हळूवार स्पंदने दाखविणारी होती. 'झुंझारराव' हे तर बोलून चालून इंग्रजी 'ऑथेल्लो'चे मराठी रूपांतर. महाकवी शेक्सपिअरच्या डेस्डेमोनाचे कमालीचे नाजूक रंग, देवलांच्या मऱ्हाटी वळणाच्या ठसठशीत कमळजेत तसे कमीच उतरलेले. विजया मेहतांनी, साहित्य संघाने केलेल्या या नाटकाच्या प्रयोगात कमळजा रंगविली ती मूळ डेस्डेमोनाच मनात धरून. डेस्डेमोनाच्या निष्पाप व्यक्तिमत्त्वाच्या साऱ्या कोमल पाकळ्या त्यांनी कमळजेच्या या भूमिकेत आपल्या अभिनयाने मुलायमपणे व्यक्त केल्या—अगदी देवलांच्या गोळीबंद मराठी संवादांच्या इंग्रजी शैलीच्या लाडिक उच्चारणांचाही उपयोग त्यांनी यासाठी मराठी रंगभूमीवरील या आपल्या पहिल्याच महत्त्वाच्या भूमिकेत केला.

किंबहुना या चार आणि अन्य नव्या नाटकांमधीलदेखील त्यांच्या भूमिकांतून संवादोच्चारणाची एकच एक ढब कमजास्त फरकाने स्पष्ट झाली. शब्दोच्चारण शुद्ध आणि स्वच्छ ठेवूनही त्याला एक उपरा आणि अ-मऱ्हाटी तलमपणा त्या देतात; तसेच वाक्यांच्या फेकीत इंग्रजी वाक्योच्चारणाचे मुलायम हेलकावे त्या मराठी



वाक्यांसाठी सहजतेने वापरतात असे दिसले. त्याचप्रमाणे त्यांच्या आवाजाच्या मर्यादाही, भूमिकेच्या एका संयत, सौम्य, तलम तरीही स्वभावानुसार वेगवेगळ्या आविष्काराने त्या फार चांगल्या सांभाळतात असे दिसले. स्त्रीभूमिकांचा हा विजया मेहतानिर्मित बाज पारंपरिक पद्धतीहून अगदी वेगळा होता तरीही प्रेक्षकाला तो फारसा खटकला नाही. कारण, त्यामागे अभिजात असे अभिनयकौशल्य आणि कुशाग्र बुद्धी होती. या बुद्धीला आपल्या अभिनय गुणांच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादांची आणि शक्तिस्थानांची, तसेच त्या त्या नाट्यकृतीच्या प्रकृतीची आणि प्रेक्षकांची फार नेमकी आणि वस्तुनिष्ठ समज होती. कमळजा डेस्डेमोना होऊ शकत होती. परंतु यशोदा ही यशोदा आणि पेशवाईतली एक घरंदाज ब्राह्मणीच होती हे भान या अभिनयामागे नित्य आणि जागरूकतेने असत असे.

तीन जुन्या नाटकांतील या तीन प्रकृतीच्या भूमिकांत, विजया मेहता यांचे बाह्यतः सौम्य असे एकच मनस्वी आणि बुद्धिमान व्यक्तिमत्त्व, भडक वा अतिकृत्रिम नाटकीपणाचा आश्रय न घेता आणि संवादोच्चारणातील अ-मराठी, कायम कमीजास्त भासासह सारखेच यशस्वी ठरले, त्यामागे हे भान, ही समज आणि अंगचे अजोड अभिनय-कौशल्यच होते. या अभिनयात अंडर ॲक्टिंगचे—मिताभिनयाचे—प्रमाण फार मोठे होते. भावाभिव्यक्तीसाठी चेहरा आणि शरीर—मुख्यतः हात—यांच्या किमान, नेमक्या आणि बोलक्या हालचाली विजया मेहता यांच्या अभिनयात जाणवत. किंबहुना समर्थ मिताभिनयाचा वस्तुपाठच त्यांच्या भूमिकांत अभ्यासू नटांना आणि प्रेक्षकांना मिळे. या मिताभिनयामागे विचाराने आणि परिश्रमाने हुकमी बनलेला त्या त्या भूमिकेचा उत्स्फूर्त मानसिक विकास असे. ती भूमिका पाहताना ती दर क्षणी, शब्दाशब्दाने, निःशब्दतेने, प्रत्येक लहानसहान हालचालीने आपल्यासमोरच वाढते आहे, असे वाटे. हे विकासाचे साक्षात् दर्शन चैतन्याचा प्रत्यय अनेकदा घडवीत असे. भूमिकेतील, नाटचकृतीतील आणि खुद्द या नटीच्या व्यक्तिमत्त्वातीलदेखील अनेक उणिवांचा तात्पुरता विसर पाडण्याइतके हे दर्शन भारून टाकणारे असे.

## काही आव्हानात्मक भूमिका

जुन्या गाजलेल्या नाटकांतील, परंपरेची चौकट बसलेल्या भूमिकांपेक्षा नव्या नाटकांतील भूमिका यासाठी त्यांच्या सोयीच्या आणि त्यांचे नटी म्हणून नाव वाढविणाऱ्या ठरल्या. 'तुझे आहे तुजपाशी'मधील उषाची भूमिका यात अग्रभागी शोभते. वस्तुतः या गंभीरप्रकृती विचारप्रवण आणि अत्यंत संवेदनाक्षम भूमिकेला नाटकाच्या प्रकर्षाने विनोदप्रधान स्वरूपात, अपुरेपण, तुटकपण आले आहे. तिच्या मानसिक विकासाचे महत्त्वाचे भाग पुष्कळ अंशी गृहीत धरण्यात आले आहेत आणि काकाजी, श्याम, सतीश, वासूअण्णा अशा सरळ सरळ हशे पिकवणाऱ्या रेखीव भूमिकांच्या तुलनेने नाटकात तिला दुय्यम स्थान राहिले आहे. परंतु विजया मेहता यांची उषा या मातबर आणि रसरशीत भूमिकांबरोबरीने, काही क्षणी अधिकच परिणाम-

कारक ठरत असे. इतकी की ती त्यांनीच करावी अशी त्यांची हातखंडा भूमिका मानली जाऊ लागली. ' शितू ' नाटकातली मूळ अभिप्रेत शितूशी अत्यंत विसंगत इतकेच नव्हे तर विरोधी व्यक्तिमत्त्व वागवणारी विजया मेहता यांची शितू, त्या नाटकाच्या प्रयोगात उत्तरोत्तर फार मोठा परिणाम करून जाई. ' नवी कहाणी—स्मृती पुराणी ' या नाटकातील त्यांची मध्यमवयस्क मृदुलादेखील अत्यंत सरळमार्गी एकपदरी लेखनाचा केवळ साधन म्हणून आधार घेऊन एक जिवंत, संवेदनाक्षम, रसरशीत व्यक्तिमत्त्व म्हणून रंगमंचावर आपला ठसा उमटून जात असे. असेदेखील म्हणता येईल की, नाटक जेवढे दुबळे अथवा त्यातली त्यांची भूमिका जेवढी अपुरी, सदोष अथवा प्रसंगी स्वतःशी विजोड, परंतु मुळात सामर्थ्याची बीजे असलेली, तेवढे विजया मेहता यांच्या अभिनयाला ते आव्हान ठरत असे.

जेव्हा असे आव्हान स्वतःतील अभिनेत्रीसाठी उपलब्ध नसे, तेव्हा एका वेगळ्या प्रकारे आव्हान त्या पत्करीत. उदाहरणार्थ, ' यशोदा ' नाटकातली डोक्यावरील पदराची कोकणातली विकेशा बालविधवा; ' सुंदर मी होणार 'मधली अल्लड बेबी; ' चार दिवस ' एकांकिकेतील वेडी शकू; ' अजगर आणि गंधर्व ' एकांकिकेतली शरीर-मनाने उद्ध्वस्त होऊन जगणारी भयाण वेश्या; ' खुर्च्या ' या अनुवादित प्रतिनाट्यातील जख्ख म्हातारी— अशा भूमिकांतील वेगळ्या प्रकारचा अवघडपणा या नटीला एक आव्हान वाटे आणि या भूमिकांना अवश्य ती साधने, लकबी, अगदी शारीरिक व्यंगेसुद्धा अत्यंत कष्टपूर्वक आत्मसात करून त्या भूमिकेत आपली अशी एक छाप त्या निर्माण करीत. क्वचित मूळ नाट्यकृतीलाही विजया मेहतानिर्मित भूमिका जड ठरे, इतकी ती या जिद्दी आणि बुद्धिमान नटीने सर्वस्वाने झपाटून टाकलेली असे.


आणि याही प्रकारचे आव्हान भूमिकेत नसेल, तरीही ती करणे प्राप्त असेल तेव्हा ही समर्थ नटी त्या साध्या सरळ भूमिकेला जणू आपले असे एक पदरचेच आव्हान देऊन ते पत्करून दाखवते आहे असे वाटे. उदाहरणार्थ, ' मी जिंकलो ! मी हरलो ! ' मधली सामान्य गृहिणी, किंवा ' एक शून्य बाजीराव 'मधली धंदेवाईक नटी गौरी. या साध्या, सरळ आणि त्या मर्यादेत यशस्वी भूमिकांना विजया मेहता यांच्या अभिनयाने एक गुंतागुंतीचे स्वरूप येते असे वाटे. ' मादी ' एकांकिकेतली नायिका तशी एखाद्या अभिनयनिपुण नटीला आपले अभिनयनैपुण्य दाखविण्याला पुरेशी नाट्यपूर्ण; परंतु विजया मेहतांना जणू हे तिचे अंगचे नाट्य अपुरे पडून त्या तिला आपल्या बुद्धीने आणि कौशल्याने दर क्षणी अधिक गुंतागुंतीची, चतुर आणि फसवी बनवून त्या भूमिकेतील आपल्या अभिनयाने जाणत्यांनाही हमखास मारून टाकीत.

आणि त्यांच्या संपूर्ण अभिनयगुणांना, बुद्धीला, चतुराईला आणि व्यक्तिमत्त्वाला आव्हान ठरावी अशी एक विलक्षण भूमिका त्यांच्याकडे एकदा चालत आली. युगो

बेट्टी या इटालियन नाटककाराच्या 'द क्वीन अँड द रेबेल्स' या नाटकाच्या 'एक होती राणी' या मराठी रूपांतरातील 'राणी'ची ही भूमिका. कल्पिताहून अद्‌भुत, भयंकर, अतिशय उंच आणि तेवढेच अधःपतित, गलिच्छ असे या राणीचे अनुभवविश्व होते. एकाच वेळी जन्मजात राणी आणि यःकश्चित बाजारबसवी अशा दोन परस्पर-विरुद्ध पातळ्यांवर सफाईने फिरणारी अशी गहिरी भूमिका मराठी रंगभूमीवर दुसरी झाली नसेल. त्यात या भूमिकेची मूळची पाश्चात्त्य जडणघडणदेखील विजया मेहता यांच्या संवादोच्चारणाला आणि व्यक्तिमत्त्वाला फार सोयीची होती. एरवी सामान्य भूमिकेतही आव्हान शोधणारी ही असामान्य कुवतीची नटी या भूमिकेत 'गजब' करील अशी अपेक्षा करणे चूक नव्हते. परंतु आश्चर्य असे की, नेमक्या या भूमिकेत ती अयशस्वी ठरली, तिच्या अंगच्या साऱ्या कौशल्याचा, बुद्धीचा, परिश्रमांचा, जिद्दीचा, चतुराईचा, हिशेबीपणाचा प्रत्यय पदोपदी या भूमिकेत रंगमंचावर मिळूनही ही भूमिका अखेरपर्यंत निष्प्राणच राहिली. जाणवले ते विजया मेहता यांच्या प्रभावी अभिनयाचे स्पेअर पार्टस्.

असे घडते. आव्हान आणि यश यांची गाठ पडतेच असे नाही आणि कलेचा परिसर हा तर अशी अनेक संस्मरणीय अपयशे मोजक्याच संस्मरणीय यशांच्या जोडीस प्रत्यही निर्माण करणारा. विजया मेहता यांचे हे अपयशदेखील त्यांच्या उण्यापुऱ्या एक तपाच्या कारकीर्दीस भूषणावहच ठरेल.

गंधर्व-युग संपले आहे. गंधर्व-युगाचे हे मराठी रंगभूमीवरचे स्त्रीभूमिकांचे पूर्ण-तया नवे, वेगळे आणि विकसते पर्व मात्र इथे केवळ खंडित झाले आहे. विजया मेहता यानंतर दीर्घकाळ मराठी रंगभूमीवर पुन्हा दिसणार नसल्या तरी त्यांच्या अभिनयशैलीने प्रभावित झालेल्या तरुण उदयोन्मुख नटी मराठी रंगभूमीवर आजही वाटचाल करताना दिसत आहेत. □



फार पाऊस पडत असला म्हणजे घरी लौकर येऊन रेडिओचे एकेक स्टेशन फिरवीत जावे. एकेकदा अगदी मुंबई केंद्रावरदेखील एखादा चटकदार कार्यक्रम ऐकण्याला मिळतो !

गेल्या २५ जुलैला रात्री पावणेदहाला असा एक कार्यक्रम आकस्मिकपणे पद-रात पडला. मुंबई 'अ'वर तो चालू होता. निर्माते होते प्रसिद्ध पारशी-नाटय-दिग्दर्शक आदि मर्झबान. मुंबई 'अ'वरून अधूनमधून ते इंग्रजी आणि गुजराथी

# आदि मर्झबान

## यांचा

# ‘ दिलमा दर्द ’

कार्यक्रम रात्री सादर करतात. हा कार्यक्रम इंग्रजी आणि गुजराथी अशा दोन भाषांत-एका वेळी चालू होता. त्याचे शीर्षक होते ‘ दिलमा दर्द ’. हे नभोनाटय होते. प्लॅस्टिक सर्जरी करणारा एक डॉक्टर या नभोनाटयाचा निवेदक होता. हे डॉक्टर-निवेदकाचे काम स्वत: मर्झबान करीत होते. जोडीला त्यांचा पेटंट पारशी नटसंच होता.

‘ दिलमा दर्द ’मध्ये हा डॉक्टर, सामान्य माणसांच्या जीवनातदेखील केवढया शोकात्मिका आणि सुखात्मिका घडू शकतात त्याविषयीचे आपले अनुभव सांगत होता. गुजराथी आणि इंग्रजी अशा दोन भाषांतून सहजपणे फिरत, अत्यंत अकृत्रिम आणि जिव्हाळयाच्या स्वरांत आपल्याशी हितगुज केल्यासारखा बोलणारा मर्झबान यांचा भरदार आवाज रेडिओतून केव्हाही ऐकला तरी आपला ‘ कान ’ झट्‌दिशी वेधून घेतो.

कल्पना करा. तुम्ही रेडिओ ऐकताहात. ‘ डॉक्टर ’ आदि मर्झबान सांगताहेत तो प्रसंग मधून मधून संवादरूपाने, साक्षात् घडावा तसा ऐकवण्यात येतो आहे. एका अपघातात एका तरुण मुलीचा सुंदर चेहरा भाजून विद्रूप झाला. आईबरोबर ती या डॉक्टरांकडे आली. कोवळया, हृदयद्रावक स्वरांत डॉक्टरना एकसारखी ती विचारताना आपण ऐकतो, “ डॉक्टर, माझा चेहरा पुन्हा सुधारेल का ?” डॉक्टर म्हणतात, “ डिकरी, (गुजराथीत हे ‘ बेटी ’ किंवा ‘ पोरी ’) मी किंवा कुणीही कितीही प्रयत्न केले ना, तरी तुझा चेहरा पूर्वीसारखा आता होणार नाही. तू खरे तर जगायचीच नाहीस ती जगली आहेस. तेव्हा हीच देवाची कृपा समज आणि अशाच चेहऱ्यानिशी आता तुझे आयुष्य एखाद्या चांगल्या कारणी लाव. ” ती स्फुंदून स्फुंदून रडताना ऐकू येते. तिची आई मग तिची व्यथा डॉक्टरना सांगते. एका तरुण देखण्या इंजीनिअरच्या वेडयासारखी प्रेमात ती पोर आहे आणि त्याच्याशी तिचा वाङ्‌निश्चयदेखील झालेला आहे. नोकरीनिमित्ताने तो इंजीनिअर मुंबईपासून दूरच्या एका जंगल भागात गेलेला असून त्याला हे आपले विद्रूप तोंड दिसले तर तो आपल्याला अव्हेरील अशी तिला भयंकर धास्ती वाटते आहे. डॉक्टरना हे ऐकून वाईट वाटते. पण त्यांना काहीसुद्धा करणे शक्य नसते—कुणालाच नसते—इतकी चेहऱ्याला इजा पोचलेली असते. ती तरुण मुलगीच मग एका कृतनिश्चयी स्वरांत डॉक्टरना सांगते, “ डॉक्टर, मला कळले आता मी काय करायचे ते—मला कळले. मी त्याला

भेटणार नाही, त्याच्या दृष्टीलाही पडणार नाही, हे विद्रूप तोंड त्याच्या प्रेमळ दृष्टीला कधीही पडणार नाही—कधीही."

## चमकदार युक्ती

ती मुलगी आणि तिची आई निघून गेली—डॉक्टर सांगतात, तिची आई कधीमधी डॉक्टरना भेटे. तिच्याकडून डॉक्टरना कळे की तिचा तो प्रियकर मुंबईत आला आहे पण तिने आपली राहायची जागाच बदलली आहे. ती मुळीच घराबाहेर पडत नाही. कुणाला भेटू देत नाही. ती कुठे राहते हे त्याला आणि त्याच्या परिचयाच्या कुणालाही माहीत नाही. आणि असेच एक दिवशी डॉक्टर त्यांच्या नर्सिंग होममधल्या विश्राम-कक्षेत विसावले होते आणि त्यांचा नोकर आला. अदबीने तो म्हणाला, "कुणीतरी गृहस्थ तुमची भेट मागतात, मी त्यांना सांगितले की डॉक्टर अशा आड-वेळी भेटत नाहीत. पण ते मुळीच ऐकत नाहीत. मी त्यांना तुमच्या तपासण्याच्या खोलीत बसवले आहे." डॉक्टर जरा नाराजच झाले. नाराजीने त्या खोलीकडे आले. ते खोलीत शिरताच खोलीतल्या गृहस्थाने जणू उठूत विचारले,

"डॉक्टर, मला सांगा डॉक्टर, ती कुठे आहे?"

डॉक्टर पाहतात तर तो तिचा प्रियकर!

डॉक्टरांची उडवाउडवी, टाळाटाळ तो ऐकून घेत नाही. म्हणतो, "मला आहे ठाऊक, ती कुठे आहे ते तुम्हांला माहीत आहे! तुम्ही तिचे डॉक्टर आहात. मला तिच्याविना चैन पडत नाही डॉक्टर. मी तिचा असा कोणता गुन्हा केला आहे म्हणून तिने मला असे टाळावे?"

डॉक्टरना त्याची तडफड जाणवते आहे. अखेर मनाचा घडा करावा तसे ते म्हण-तात, "ऑल राइट. मी तुमची भेट घडवतो. माझ्याबरोबर चला." त्याला घेऊन ते मग थेट तिच्याकडे गेले. त्याला बाहेर उभा करून तिला गाठून म्हणाले,

"डिकरी, मी तुझ्या प्रियकराला तुझ्या भेटीसाठी घेऊन आलो आहे. या क्षणी तो बाहेर उभा आहे."

ती मनस्वी चिडते, तगमगते. शोकातिशयाने अंग अंग जशी उन्मळत राहते. कर्कशपणे विचारते, "का? का केलेत हे? तुम्हांला काळीज नाही? तुम्ही दुष्ट राक्षस आहात. डॉक्टर, त्याला का आणलेत तुम्ही? आता तो हे माझे जिवंत कले-वर, हे भयंकर विद्रूप पाहून केवढा त्रास करून घेईल, केवढा स्तंभित होईल! त्याला माझी घृणा येईल—आणि निघून जाईल तो—माझ्याविषयी घृणाच बाळगून! आयुष्यभर हे माझे विद्रूप तोंड त्याला आठवेल! इथल्या इथे या क्षणी मरत का नाही मी? का नाही?"

हे ऐकताना आपल्या काळजाचे पाणी पाणी होते. वाटते की हा डॉक्टर राक्षस नव्हे तरी कठोर आणि दुष्ट खराच! का त्या पोरीवर आणि त्या तिच्या प्रियकरा-वर तो हा असा भयंकर प्रसंग आणतो आहे?

आणि डॉक्टरांचा मृदू आवाज त्या मुलीला सांगताना आपण ऐकतो, " डिकरी, शांत हो. माझे ऐक. तू त्याला पूर्वीसारखीच भेट. हे तुझे कुरूप तोंड त्याला दिसणार नाही—भेटला तरी नाही. कारण डिकरी, जंगलात कामावर असताना बांधकामापैकी एक लोखंडी गर्डर त्याच्या डोक्यात पडला आणि त्या अपघाताने तो आता कायमचा आणि ठार आंधळा झाला आहे. त्याच्या लेखी, पोरी, तू यानंतर सुंदरच असशील, कारण हा तुझा चेहरा मुळी त्याला दिसणारच नाही. दिसणारच नाही. त्याच्या आंधळ्या दृष्टीपुढे तुझा तोच जुना मोहक, देखणा चेहरा असेल आता..."

ती पोर आवेगभराने फुटत राहते. खरेच सांगा, तिने घडले आहे त्याबद्दल शोक करावा की आनंद मानावा ?

एवढे खरे की नभोनाट्याच्या माध्यमात जे आपल्याला सांगितल्यावाचून दिसणे शक्य नाही त्याचीच—त्या पोरीच्या प्रियकराच्या अपघाती आंधळेपणाची—योजना, ऐन उत्कर्ष बिंदूशी मोठ्या कौशल्याने करून आदि मर्झबान मजकुरांनी मात्र या नभोनाट्याच्या माझ्यासारख्या श्रोत्याला घायाळ करून टाकले.

लेखकाचे नाव सांगण्यात आले नाही पण लेखन आदि मर्झबान यांचेच असावे. त्यांच्या बहुतेक कार्यक्रमांचे लेखक ते स्वतःच असतात. अनेक ठिकाणच्या नाट्यपूर्ण, चमकदार, अनपेक्षित कल्पना हेरून आणि जमवून त्यांचा उपयोग ते आपल्या कार्यक्रमात मोठ्या चातुर्याने करतात आणि आपल्या प्रेक्षकाला आणि श्रोत्याला घटकाभर खूष करून टाकतात. त्याहून अधिक मौलिक त्यांच्या कार्यक्रमात काही नसते आणि तसा त्यांचा दावाही नसतो. परंतु घटकाभराच्या हमखास मनोरंजनासाठी मराठी प्रेक्षकानेही खुशाल अधून मधून मुंबई 'अ' लावावे आणि आदि मर्झबान भेटल्यास त्यांच्या अस्तनीतल्या वरील प्रकारच्या एखाद्या नव्या चमकदार नाट्यपूर्ण युक्तीने स्तिमित आणि खूष होऊन जावे. मग भाषा कोठली का असेना ! ○


# सर्वांचे एकच मत

कोणत्याही तऱ्हेच्या टोप्या, गंजिफ्रॉक, सॉक्स वगैरे सर्व प्रकारची होजियरी व लहान मोठ्यांचे अद्ययावत तयार कपडे

# एन्. व्ही. गोखले

**यांचे दुकानातच घ्यावेत**

प्रार्थना समाजजवळ, गिरगाव, मुंबई ४

वाजवी किंमत व उत्कृष्ट माल हे वैशिष्टच.



# नानासाहेब 'शिव' शिल्पकार

लेखक : सदाशिव साठे

गेल्या जूनच्या १३ तारखेला दिल्लीहून मुंबईला गेल्या गेल्याच मी पद्मश्री वि. पां. ऊर्फ नानासाहेब करमरकर यांना फोन केला. तातडीने फोन करण्याचे कारण नानासाहेब फार आजारी असल्याचे मला दिल्लीहून निघतानाच समजले होते. आणि म्हणून मुंबईला गेल्यावर प्रथम त्यांच्या प्रकृतीची चौकशी करावयाची असे मनाशी योजले होते. परंतु मनाने एक योजले तरी दैवाची योजना दुसरीच होती. फोनवरून मला जे उत्तर आले ते नानासाहेबांचे त्याच सकाळी देहावसान झाल्याची दुःखद वार्ता सांगणारे. ती वार्ता ऐकून मन क्षणभर सुन्नच झाले. आणि माझ्या मनात गेल्या तीस वर्षांतील करमरकरांच्या नावाशी निगडीत असलेल्या माझ्या आयुष्यातील अनेक आठवणींनी गर्दी केली.

कै. नानासाहेबांच्यासंबंधी फार मोठे कुतूहल माझ्या मनात अगदी लहानपणापासून निर्माण झाले होते. मला शिल्पकलेतील काही समजावयास लागण्यापूर्वी त्यांच्या शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याची कीर्ती माझ्या कानांवर येत होती. त्या

काळात त्यांनी उभारलेला पुण्यातील छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा म्हणजे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच एक चर्चेचा विषय झालेला होता. पुतळयाच्या कला-गुणांपासून पुतळयाच्या भव्यतेपर्यंत अनेक गोष्टी लोक मोठया चवीने बोलत. आमचे काका हे एक हौशी चित्रकार. ते ह्या पुतळयासंबंधी अनेक हकीकती मोठ्या रसाळपणाने सांगत. मला आज नेमके आठवत नाही,पण मी १०–११ वर्षांचा असताना एकदा पुण्यास गेलो होतो. त्या वेळी माझ्या मनात त्या पुतळयासंबंधी एवढे कुतूहल निर्माण झाले होते की त्या मुक्कामात मी पुतळा पाहण्याची संधी साधून घेतली. शिल्प ह्या विषयाशी माझी झालेली ती पहिली ओळख. माझ्या बालसुलभ दृष्टीला ते दर्शन इतके अपूर्व होते की, त्या पुतळयाने अजाणताच माझ्या मनावर एक खोल ठसा कायमचा कोरून ठेवला. तो पहिलाच संस्कार इतका उत्कट होता की, त्या क्षणालाच माझे या कलेशी एक अतुट नाते जुळून गेले.

कै. वि. पां. ऊर्फ नानासाहेब करमरकरांनी तयार केलेला हा भव्य अश्वारूढ पुतळा हे महाराष्ट्राचे भूषण आहे. काही काही कलाकृतींचा प्रभावच असा असतो की, तेवढी एकच कलाकृती त्या कलावंताला अमर करून जाते. शिल्पकार फडके यांनी उभा केलेला चौपाटीवरील लोकमान्यांचा पुतळा काय किंवा कै. गणपतराव म्हात्रे यांचे 'To the temple' हे शिल्प काय, ह्या एकेका कलाकृतीसाठी लोकांनी त्यांना केव्हाही मानाचा मुजराच केला असता. करमरकरांच्या शिवाजी-पुतळयाचीही तीच गोष्ट. शिवाजी महाराज कसे होते हे आम्ही आतापर्यंत केवळ वर्णनावरूनच ऐकत होतो. पण त्या वर्णनाला साकार केलं ते पहिल्याप्रथम नानासाहेब करमरकरांनीच. शिवाजीसारख्यांचे व्यक्तित्व इतके भव्य असते की, सामान्य माणसाच्या मन:पटलावर ते मावूच शकत नाही. त्यांच्या बुद्धीला ती व्यक्ती म्हणजे अलौकिक, असामान्य अशीच दिसत असते. आणि बुद्धीला आकलन न होणाऱ्या गोष्टी शेवटी दैवी आणि म्हणून अमूर्त स्थितीतच जनसमजुतीत राहतात. त्याचाच परिणाम शिवाजीला आपण अवतारी पुरुष समजू लागलो. परंतु सामान्य जनांच्या तोकड्या कल्पनाशक्तीला जे व्यक्तित्व अगम्य वाटते ते नानासाहेबांनी सगुण साकार अवस्थेत लोकांपुढे उभे केले. आतापर्यंत मनुष्यकोटीच्या पलीकडे वाटणारी शक्ती ही तुमच्या-आमच्यासारखीच चालती बोलती व्यक्ती होती ह्याचा साक्षात्कार करमरकरांच्या पुतळयाने प्रथम आम्हांला झाला. आता शिवाजी म्हटला म्हणजे ह्याच एका विशिष्ट रंगारूपाची आणि चेहऱ्यामोहऱ्याची आकृती आपल्या डोळयांसमोर उभी राहते. ह्या आकृतीचा प्रभाव आमच्या मनावर इतका दांडगा आहे की त्या शिल्परूपाहून थोडा वेगळा शिवाजी कुणी घडवू लागला तर ते लोकांना सहजासहजी पटणारच नाही.

या पुतळयापासूनच नानासाहेबांनी खऱ्या अर्थाने आपल्या कला-व्यवसायाचा श्रीगणेशा केला, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अष्टागार म्हणून ओळ-

खल्या जाणाऱ्या अलिबाग तालुक्यातील सासोने या गावी नानासाहेबांचे बालपण गेले. शाळा सुटल्यावर फावल्या वेळात गावातील देवळांच्या भिंतींवर कोळशाच्या कांडीने चित्रे चितारणे हा या मुलाचा आवडता छंद ! तर तुटपुंज्या शेतीवाडीच्या जोडीला गणपतीच्या मातीच्या मूर्ती करणे हा याच्या वडिलांचा जोडव्यवसाय. नानासाहेबांच्या मनात पुढील भव्य स्वप्नांनी आकार घेतला असेल तो लहानपणी वडिलांच्या हाताखाली मातीला आकार देतानाच. खरे म्हणजे आमच्याकडील सर्वच शिल्पकार ह्या गणपतीच्या मातीतूनच निर्माण झाले आहेत. गणपतीचा आकार करता करताच अनेक कलावंतांच्या कला रंगारूपाला आल्या. देवळाच्या भिंतींवरील छोटया विनायकाची चित्रकला श्री. ओटो रोथफील्ड या गोऱ्या कलेक्टराच्या नजरेस पडली. आणि त्यांनी या पोराला त्याच्या वडिलांपासून उचलले. पुढे मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या संस्थेत दाखल करून त्यांनी त्याच्या शास्त्रोक्त शिक्षणाची सोय लावून दिली. छोटया विनायकाला हे फार मोठे उत्तेजन मिळाले आणि सासोन्याच्या चार भिंतींबाहेर पडून त्याची कला त्रिखंडात दिग्विजय करण्याच्या हिंमतीने उफाळून आली. मुंबई येथील शिक्षणक्रम अतिशय यशस्वी रीतीने पुरा करून नानासाहेब पुढील शिक्षणार्थ इंग्लंडला गेले. तेथील दोन वर्षांचा अभ्यासक्रम पुरा केल्यानंतर त्यांनी युरोपमधील अनेक देशांना भेटी दिल्या व त्या त्या देशांतील शिल्पकलेचे डोळसपणाने निरीक्षण केले. हिंदुस्थानात परत आल्यानंतर त्यांनी कलकत्ता येथे आपल्या व्यवसायाला प्रथम सुरुवात केली. परंतु कलकत्त्यातील परिस्थिती त्यांना फारशी मानवली नसावी असे दिसते.

## जबरदस्त धडाडी

कोणत्याही व्यवसायात सुरुवातीला अडचणींना तोंड हे द्यावेच लागते. आणि कला हे जीवनाचे साधन आणि साध्य मानणाऱ्यांपुढे तर फार मोठा संघर्ष उभा असतो. अशा परिस्थितीतच त्यांना पुणे येथे बसविण्यात येणाऱ्या शिव-पुतळयासाठी पाचारण करण्यात आले. ती सर्वच हकीकत मोठी नाटयमय आणि रोमहर्षक अशी आहे. वास्तविक, महाराष्ट्रातील त्या वेळच्या एका ज्येष्ठ कलाकाराकडे हे काम प्रथम सोपविण्यात आले होते. परंतु काही कारणाने पुतळा समितीने त्यांचेकडील दिलेले काम काढून घेऊन ते श्री. करमरकर ह्यांचेवर, त्यांनी ते एक वर्षाचे आत पुरे करून द्यावे ह्या अटीवर सोपविण्यात आले. वरील सर्व परिस्थितीत नानासाहेबांनी एका जिद्दीने ते काम स्वीकारले; परंतु काम पुरे करताना किती मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागले, याच्या हकीकती खुद्द नानासाहेबांच्या मुखातूनच ऐकण्यात खरी गंमत होती. पुतळा मुदतीत पुरा करण्याच्या दृष्टीने त्यांनी तो अखंड एकसंधी ओतण्याची धाडसी कल्पना आखली आणि एका जिद्दीने ती यशस्वी करून दाखविली. १४ फूट उंचीचा अश्वारूढ पुतळा एकसंधी ओतणे हे केवळ धाडसच नव्हे तर एक फार मोठा जुगारच होता. ही गोष्ट पुतळा ओतण्याचे तंत्र

ज्यांना माहीत आहे तेच समजू शकतील ! पण नानासाहेबांची घडाडी इतकी जबरदस्त की इतरांना अशक्य वाटणारी गोष्ट त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने पुरी करून दाखविली. हे ओतकाम जर अयशस्वी होते तर नानासाहेबांचे सारे कष्ट, वेळ, पैसा आणि त्याहीपेक्षा प्रतिष्ठा पहिल्या सलामीलाच मातीमोल झाली असती आणि मग कुणी सांगावे, कदाचित् पुढे सारी हयातभर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागले असते ! मी मी म्हणणाऱ्या तंत्रज्ञांनी व पुतळे ओतण्यात सारी हयातच गेलेल्या शिल्पकारांचीसुद्धा असे धाडसी ओतकाम करण्याची हिंमत होत नाही, तिथे करमरकरांनी पहिल्याच कामात आपले सारे कौशल्य व प्रतिष्ठा पणाला लावून हे काम अशा धाडसी योजनेने पुरे केले.

ही घडाडी खऱ्या शिल्पकाराच्या रक्तातच असावी लागते. धाडसी कल्पनेतूनच आतापर्यंत अनेक अजरामर कलाकृती निर्माण झाल्या. या कलेची प्रकृती कणखर व वृत्ती पुरुषी वैशिष्ट्याची. चित्रकलेप्रमाणे नाजूक नखरेलपणाने दिवाणखान्यातल्या गालिच्यावर ती फारशी कधीच विसावली नाही. तिचे सारे उन्मेष उफाळून आले ते उघड्या मैदानात. तिचे स्वरूपच आकाशाशी स्पर्धा करणारे. वेरूळच्या कड्याकपारीत, काळ्याकभिन्न फत्तराच्या छातीवर ती पाय रोवून उभी राहील. नाहीतर स्वातंत्र्यदेवीच्या (Statue of Liberty) रूपाने अंगावर लाटांचे प्रचंड तांडव खेळवीत समुद्रात ताठ मानेने उभी असलेली दिसेल. अशा भव्य कलाकृती निर्माण करताना शिल्पकाराला त्याच्या प्रतिभेबरोबरच लागणारे असामान्य निर्मिती-तंत्रही अवगत असावे लागते. नानासाहेबांची प्रतिभा जशी भव्य शिल्प-कल्पना रचण्यास समर्थ होती तशीच त्या भव्य कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याची हिंमत त्यांच्यामध्ये होती. मुंबई मार्गावर मुंब्र्याचा डोंगर आणि कातळाकडे बघून त्यांच्यातील प्रतिभा नेहमीच फुलून येत असे. त्यासंबंधी त्यांनी कितीतरी चांगल्या चांगल्या कल्पना आपल्या मनाशी योजल्या होत्या. अनेक जाणकार लोकांजवळ त्यांनी त्या बोलून दाखविल्या होत्या. पण आमचेजवळ त्या कल्पनांना पेलण्याचे राहोच, पण त्यांचे साधे कौतुक करण्याची रसिकता तरी कुठे आहे ! बारथोल्डी-सारखा एखादा प्रतिभावान शिल्पकार फ्रान्स देशातच जन्माला यावा लागतो. १५० फूट उंचीचा स्वातंत्र्यदेवीचा पुतळा करण्याची त्याची कल्पना डोक्यातच राहिली नाही तर त्या भव्य कल्पनेला साऱ्या राष्ट्रांनी दाद दिली. एवढेच नव्हे तर लोकांनी स्वतःच्या खर्चाने तो निर्माण करून अमेरिकेला भेट म्हणून बहाल केला. अशा भव्य कल्पना पेलण्यासाठी राज्यकर्त्यांचे मनदेखील तेवढेच उदार आणि रसिक असावे लागते. नानासाहेबांच्या दुसऱ्या अशाच एका अलौकिक कल्पनेची रसिकतेच्या अभावी अशीच वासलात लागली. ती कल्पना दिल्ली येथे राजघाटा-वर करावयाच्या गांधीस्मारकाची होती. या कल्पनेप्रमाणे १५० फूट उंचीचा महात्मा गांधींचा अर्धपुतळा वास्तुशिल्पाच्या रचनातंत्राने बांधावयाचा. पुतळ्याचे

आत अनेक मजले व दालने ठेवून, त्यांमध्ये गांधी-जीवनाशी निगडीत असलेल्या अनेक अंगोपांगांचे प्रदर्शन कायम स्वरूपात मांडावयाचे. पण ही कल्पनादेखील संबंधित अधिकाऱ्यांना मानवली नाही, आणि काळाच्या ओघात करमरकरांच्या-बरोबरच ती नाहीशी झाली. कल्पना किती उत्तम असल्या तरी शिल्पकलेची निर्मिती ही बऱ्याच वेळा परस्वाधीन असते. अशा प्रचंड कल्पना प्रत्यक्षात येतात त्या लोकाश्रयावर किंवा राजाश्रयावरच.

## कलेची प्रतिष्ठा

करमरकरांची आपली ऐन उमेदीची सारी हयात परतंत्र भारतात गेली. जुन्या संस्थानिकांचा मोठा उदार आश्रय त्यांच्या कलेला लाभला. अनेक लहानमोठ्या संस्थानांतून आजही त्यांच्या शेकडो कलाकृती त्या त्या स्थानांचे सौंदर्य वाढवीत उभ्या आहेत. देश स्वतंत्र झाल्यानंतर अनेक पातळ्यांवरून कलेच्या विकासासाठी प्रयत्न सुरू झाले. अनेक कलावंतांना राजाश्रय मिळाला आणि शेकडो पुतळ्यांची निर्मिती झाली. पण नानासाहेबांसारख्या श्रेष्ठतम कलाकाराच्या कलेचा सन्मान व्हावा तसा झाला नाही. त्यांच्या गांधीस्मारकासारख्या एखाद्या अलौकिक कल्पनेला आम्हांला मूर्त स्वरूप देता आले नाही. पुतळे सगळेच शिल्पकार करतात व सगळ्याच व्यक्तींचे होऊ शकतात. त्यातला बराचसा भाग अपरिहार्य म्हणून शिल्पकाराला करावा लागतो; पण शिवाजी, विवेकानंद किंवा महात्मा गांधी ह्या पुरुषांचे व्यक्तिमत्त्व आणि अस्तित्व त्यांच्या साडेतीन हात देहाच्या पलीकडे असते. त्यांची होणारी स्मारके ही त्यांचे असामान्यत्व प्रतीकरूपाने अजरामर करणारी असायला हवीत. ह्या व्यक्तींचे अलौकिकत्व हेच मुळी सौंदर्याचा साक्षात्कार घडवायला पुरेसे असते. श्रेष्ठ कलानिर्मितीचे म्हणूनच ते विषय ठरतात, पण आमचेकडे आज पुतळे उभारले जातात ते कलेपेक्षा राजकारणासाठी. कोणतीही स्मारक-योजना घ्या. काहीतरी राजकीय वा वैयक्तिक हेतू त्यामागे हटकून सापडतोच. स्मारक शिवाजीचे म्हणायचे, पण अभिलाषा स्वतःच्या नावाची, स्मारकाची. नाहीतर पुतळ्याखाली नावे कुणाकुणाची घालायची यासाठी वाद कशाला निर्माण झाले असते ? ह्या वादात, बिचारा शिल्पकार, त्याच्या नावाची आठवण कुणाला राहणार ! पण आम्हांला सर्वच गोष्टी रुपये आणे पै यांमध्येच मोजण्याची सवय लागली आहे. वास्तविक कलेचे मोल पैशाच्या तागडीत कधीच ठरणारे नाही. अशा तऱ्हेच्या कलेला दुय्यम लेखणाऱ्या मनोवृत्तीची करमरकरांना अतिशय चीड येई. ते स्वतः अतिशय स्वाभिमानी आणि कलावंतांच्या प्रतिष्ठेबद्दल फार जागृक असत. ते दुसऱ्याच्या दाराशी उठून कधी गेले नाहीत की, आपल्या कामात ढवळाढवळ करायला कुणी आला तर तो गव्हर्नर असला तरी त्यांनी त्याला दरवाजा दाखवायला कमी केले नाही. मिंधेपणाने गिऱ्हाइकाशी कामाचे बाबतीत त्यांनी कधी तडजोडही केली नाही. नव्या होतकरू कलावंताबरोबर कधी ते स्पर्धेला उतरले

नाहीत; तसेच वेळप्रसंगी कठोरपणाने त्यांना योग्य मार्गदर्शन केल्याशिवाय राहिले नाहीत. त्याचप्रमाणे अशा कलावंतांना त्यांचेकडून नेहमीच उत्तेजन मिळत असे. दिल्ली येथे मी केलेला महात्मा गांधींचा पुतळा ते दिल्लीला आले असताना आवर्जून पाहून गेल्याशिवाय राहिले नाहीत. मला त्या वेळी त्याची केवढी अपूर्वाई वाटली. त्यांचे नेहमी म्हणणे असे की, आपणच आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे, वाढवली पाहिजे. जुन्या मान्यवर कलावंतांनी ही पद्धत घालून दिली पाहिजे, असा त्यांचा नेहमी आग्रह असे.

करमकरांची कला ही वास्तववादी होती व त्याचा त्यांना अभिमानही वाटत असे. कारण, त्यांचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच जीवनासक्त होता. कुत्र्या–मांजरांपासून दगड-पहाडापर्यंत यच्चयावत चराचर सृष्टीमधील प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार होत असे. आणि म्हणून पावलागणिक नजरेस पडणारी कोणतीही गोष्ट त्यांचा कलाविषय होऊ शकत असे. कुत्रा हा तर त्यांचा जिवलग मित्र. त्यांचे घरी वा स्टुडिओत तुमचे स्वागत हे त्यांचे कुत्रे (जिवन्त वा पुतळे) करतील. नाना रूपांनी त्यांनी हे त्यांचे साथी अजरामर करून ठेवले आहेत. पण कुत्रा हा प्राणी निव्वळ मॉडेल म्हणून त्यांनी कधीच बाळगला नाही. कौटुंबिक जिव्हाळ्याने हा प्राणी त्यांचे घरात वावरत असे. एखाद्या हुशार माणसाप्रमाणे याचा वावर त्यांचे घरात होत असलेला मी पाहिलेला आहे. मागे लढाईच्या काळात जेव्हा माणसालाच पोटभर मिळणे कठीण झाले होते, तेव्हा कुत्र्यासाठी रेशन कुठून आणणार? अशा बिकट परिस्थितीत नानासाहेबांनी शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणून कुत्र्याला घेऊनच ते रेशन अधिकाऱ्याच्या कचेरीत गेले व हा कुत्रा म्हणजे माझा कौटुंबिकच कसा आहे हे त्याला पटवून व कुत्र्याचे रेशन मिळवूनच ते तेथून परतले. अलीकडे शेवटची त्यांची माझी भेट झाली, तेव्हा आम्ही त्यांचे स्टुडिओत बसलो होतो. नेहमीप्रमाणे थोड्या वेळातच चहा आला. हे त्यांचे आणिक एक वैशिष्टच! वास्तविक, आम्हांला ते वयाने, अधिकाराने, सर्वच बाबतींत कितीतरी मोठे. खरं म्हणजे लांबूनच त्यांच्याशी बोलायला अगर त्यांचे काम बघायला मिळाले तरी आम्ही खुश असायचे. पण त्यांनी हा लहान–मोठा भेद कधीच केला नाही. हातचे काम थांबवून ते विचारपूस करतील. मनमोकळ्या गप्पा होतील. सिगरेट नेहमीच त्यांच्या ओठांत असे. मी ओढत नाही हे त्यांना माहीत असे तरी डबी पुढे करतील. नको म्हटले म्हणजे त्यांचा एक ठराविक प्रश्न असे, "का हो! अजून सुरुवात नाही वाटतं केली?" सांगायचा मुद्दा नेहमीप्रमाणे चहा आला. आणि लगेच त्यांनी एखाद्या लहान मुलीला हाक मारावी तसे मागे वळून कुणाला तरी बोलावले आणि पाहतो तो एक मांजरी आपल्या लहान लहान पिलांचे लटांबर घेऊन नानासाहेबांच्या पायात घोटाळू लागली. मग त्यांनी प्रेमाने सगळ्यांची विचारपूस केली, आपल्या हाताने सर्वांना दूध पाजले.

असा होता त्यांचा स्टुडिओतला संसार. कुत्र्या-मांजरांप्रमाणे त्यांच्या कलाविषयाला लागणारी स्त्री-पुरुषांची मॉडेल्सही स्टुडिओतल्या वातावरणाशी एकरूप झालेली दिसत. त्यांचा कलाविषय झालेल्या कोणत्याही गोष्टीशी त्यांचे एकत-हेचे नातेच जडलेले असे. जवळजवळ तीस-पस्तीस वर्षांपूर्वी 'कोळ्याची मुलगी' हे उत्कृष्ट शिल्प त्यांनी तयार केलं. त्या वेळी त्यांचे मॉडेल असलेली ही मुलगी फार तर १३-१४ वर्षांची असेल. आज इतक्या वर्षांनंतरही ते या मुलीला विसरले नव्हते. आज त्या मुलीची चांगली आजीबाई झाली आहे. कदाचित् नातवंडेही तिच्या मांडीवर खेळत असतील. परंतु ह्या अवस्थेतही करमरकरांच्या कलात्मक दृष्टीला तिच्यात एका परिपूर्तीचा भाव दिसला असावा. एका वेगळ्या सौंदर्याचा साक्षात्कार झाला असावा. कारण ह्या वयातलेही तिचे एक शिल्प त्यांनी निर्माण केले आहे.

## निर्मिती-संग्रह

जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन सौंदर्यवादी होता याचे प्रत्यंतर त्यांचा स्टुडिओ बघितला म्हणजे येतो. तुम्हा-आम्हांला अगदी सामान्य वाटणाऱ्या अनेक व्यक्ती त्यांचे कलाविषय झालेले दिसतील. त्यांच्या बागेत काम करणारा एखादा जुना माळी, तो आता त्यांच्या पायरीवर कायमचा बसलेला असेल, तर बाजूच्या शेतात गुरे राखणारा गुराखी त्याच्या म्हशीसकट तिथे झाडाखाली तयार करून ठवलेला पाहावयास मिळेल. एखादी रोजबिगारी करणारी स्त्री डोक्यावर घमेलं घेऊन रेंगाळत उभी असलेली सापडेल, सावलीची जागा बघून कुणी पांथस्थ स्त्री प्रवासाचा शीण घालवतानाही दिसेल. अशा एक ना अनेक सामान्य विषयांतून त्यांच्या असामान्य कलाकृती स्टुडिओच्या परिसरात विखुरलेल्या पाहावयास मिळतील. नानासाहेबांना मोकळे असे कुणी बघितलेलेच नाही. सदोदित त्यांचे हाताने काही ना काही निर्मितीचे काम चाललेलेच असे.

करमरकरांसारखे कलावंत हे आधुनिक भारताच्या सांस्कृतिक जीवनातले फार मोठे आधारस्तंभ. कै. गणपतराव म्हात्रे, श्री. फडके यांच्याबरोबर श्री. करमरकर


*रंगभूमीदिनी (५-११-६३) प्रसिद्ध झाले*

**मराठी**

**नाट्यसृष्टीतील मुशाफरी**

'नवशक्ति'फेम **श्री. सुमंत जोशी** यांच्या रंगभूमीविषयक लेखांचा संग्रह. रंगीत आकर्षक कव्हर. १२ दुर्मिळ फोटो. किंमत ५ रु. टपालखर्च निराळा.

**बलवंत पुस्तक भांडार, मुंबई ४**

यांनी आधुनिक शिल्पकलेचा पाया घातला, असे म्हणणे चूक होणार नाही. ब्रिटिश-सत्ता येथे येण्यापूर्वीच्या ३–४ शतकांत येथील शिल्पकलेची परंपरा लुप्त झाल्यासारखीच होती. मुसलमानी अंमलात, आणि त्यानंतरच्या मराठी सत्तेच्या काळात ह्या कलेची जोपासना म्हणावी तशी झाली नाही. बोट दाखवण्यासारख्या कलाकृती या काळात फारशा निर्माण झालेल्या दिसत नाहीत. या कलेचे पुनरुजीवन झाले ते ब्रिटिश अमदानी सुरू झाल्यानंतरच. या सुरुवातीच्या काळात करमरकरांसारख्या मातब्बर शिल्पकाराच्या कर्तृत्वानेच समाजात ह्या कलेसंबंधी आस्था आणि अभिरुची निर्माण झाली. करमरकरांनी अनेक उत्तमोत्तम शिल्पाकृतींची निर्मिती करून ह्या कलाप्रांतात फार मोलाची भर घातली. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासारख्या अनेक कलाकृती तर शतकानुशतके करमरकरांच्या नावाबरोबरच आमच्या या काळातील सांस्कृतिक जीवनाचं स्मरण लोकांना करून देतील.

नानासाहेबांची वैयक्तिक कला-निर्मिती फार मोठी आहे. चेंबूरला स्टुडिओ बांधल्यानंतर गेल्या १० वर्षांत त्यांनी स्वतःच्या कलानंदासाठी अनेक शिल्पाकृती निर्माण केल्या. करमरकरांचा हा स्टुडिओ आणि त्याचा परिसर हा त्यांच्या कलाकृतींचे एक प्रचंड म्युझियमच आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. पहिल्या प्रतीच्या वैयक्तिक कलाकृतींचा एवढा मोठा संग्रह जगातील फारच थोड्या शिल्पकारांजवळ तयार होतो. ही कलासंपत्ती पर्यायाने साऱ्या समाजाचे, साऱ्या राष्ट्राचे भूषण आहे. ह्या संपत्तीची जपणूक व्हावी म्हणून आम्ही दक्ष असायला हवे. त्याचा योग्य तो मोबदला देऊन त्या जागी त्यांच्या ह्या कलाकृतींचे कायम स्वरूपात प्रदर्शन मांडून ठेवणे हेच त्यांचे खरेखुरे स्मारक होणार आहे. ललितकला अकादमी वा अन्य तत्सम संस्थांनी या कार्यात लक्ष घालून ही कलासंपत्ती जतन करून ठेवली पाहिजे. ○


सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण

नावीन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक



हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८



# दक्षिणायन

वि. ग. कानिटकर

## ११

२१ एप्रिल,

सकाळी आठ वाजता तामिळनाडचे बांधकाम मंत्री श्री. करुणानिधी यांची भेट ठरली होती. त्या दिवशी सचिवालयाला कसलीतरी स्थानिक सुटी होती व भेट करुणानिधी यांच्या निवासी ठरली होती. "बरोबर ७॥ वाजता माझेकडे या" असे श्रीनिवासन् (का. क्षि. श्री.) यांनी बजावले होते. त्यामुळे सकाळची शाळा असली, म्हणजे जशी धांदल उडते, तशी आमची धांदल उडाली. ६॥ वाजता आम्ही एगमोर् रेल्वे स्टेशनसमोरच्या एका हॉटेलात शिरलो. इडली खाऊन कॉफीचे घुटके घेता घेता, करुणानिधींशी काय काय बोलायचे याची जुळणी चालू होती.

टॅक्सीने बरोबर ७॥ वाजता आम्ही श्रीनिवासन् यांचे घरी गेलो. ते तयारच होते. तयार होते म्हणण्यात काहीच अर्थ नव्हता म्हणा! कारण हे दाक्षिणात्य घरात ज्या पोषाखात बसलेले असतात, तसेच बाहेर वावरतात. आम्ही दारात दिसताच डाव्या हाताने लुंगी वर उचलून श्रीनिवासन् खुर्चीतून उठले व चपला घालून बाहेर पडले.

करुणानिधी यांचे घर मला अगदी ओळखीच्या घरासारखे वाटले. कोकणात रस्त्याच्या लगत जशी पोटमाळ्याची दुपाखी सुबक घरे असतात, तसे ते घर होते.

रस्त्याला लागून गळाभर उंचीचे दगडी कूस होते. मधोमध छोटा दरवाजा होता. अंगण चांगले तीस फूट तरी लांब व वीस फूट रुंद असे पसरले होते. स्वच्छ सारवलेले होते. अंगणाच्या दोन टोकांना माडाची उंच झाडे होती. अंगणातला मांडव छेदून ही दोन्ही झाडे मांडवाच्या छताबाहेर उंच गेलेली होती.

घराचे जोते चार-पाच फूट उंच होते. चार-पाच दगडी पायऱ्या चढून आम्ही बंदिस्त पडवीत आलो. पडवीला लाकडी चौकटीची जाळी ठोकलेली होती; तिथे डावीकडे खुर्चीवर १५–२० माणसे बसलेली होती. उजवीकडे एक उघडाबंब, लुंगीधारी फाटका माणूस हातात पाठकोऱ्या तांबड्या कागदाची चळत घेऊन टेबलावर मांडी घालून बसला होता. याच कोपऱ्यातून एक कमरेत मोडलेला व काटकोनात दिशा बदललेला जिना वर माडीवर गेलेला होता. पडवीला चिकटून मोठे माजघर होते. त्या माजघरात ८–१० लोक स्वैरपणे भिंतीवरील छायाचित्रे पाहत फिरत होते.

अंगण तर माणसांनी फुलून गेले होते. अंगणातही बसायला खूप बाके टाकलेली होती. एक फाटकी वस्त्रे नेसलेली, तरुण काळसर स्त्री कुसाला टेकून उभी होती. तिच्या बरोबर आलेले कुणीतरी तिची दाद लावण्याकरिता वर पडवीत घुसलेले असावे.

सुटीच्या दिवशी एखाद्या लग्नघरासारखी शंभर सव्वाशे माणसे तिथे जमलेली होती. सर्वांना करुणानिधींना भेटायचे होते. प्रत्येकाचे काही ना काही काम होते. आम्ही खुर्चीवर बसताच त्या उघड्याबंब माणसाने तांबडे कागद सगळ्यांना वाटले व आपापली नावे त्यावर सर्वांनी लिहून ते परत दिले. त्याने कागद गोळा करताना आमची चिठोरी खाली घातली व माझ्या पोटात गोळा आला. कारण या अनुक्रमाने मंत्रिमहाशयांनी भेटी दिल्या तर इथे ४–५ तास अडकून बसावे लागणार होते. परंतु आम्हांला तिथेच विसरून श्रीनिवासन आत अंतर्धान पावले होते, ते तेवढ्यात बाहेर आले व आम्हांला चक्क मराठीत म्हणाले—

" आपलीयाला भेट लौवकर होणार आहे. माझे नाव पाहिले की करुणानिधी आपलीयाला बोलावणारच. "

अण्णा दुराईंबरोबर करुणानिधींचे काढलेले पुष्कळ फोटो पडवीतल्या भिंतींवर लटकावलेले होते. मानपत्रे तसबिरीसारखी टांगलेली होती. ओठांवर मिशीच्या

तलवारी कोरलेले व डोक्याच्या बरोबर मध्यभागी भांग पाडून केस एखाद्या स्त्री पार्टीसारखे मागे नेलेले करुणानिधी, फोटोत खरोखरच देखणे वाटत होते. शिवाय त्यांच्या देहलतेत एक कोमलता होती. अण्णा दुराई व नेडूनजेनियन यांचा राकटपणाही नव्हता.

अर्धा तास गेला. जिन्यावरून कॉफी वर गेली. दहा मिनिटांत रिकामी कॉफीपात्रे घेऊन नोकर खाली आला. पाठोपाठ जिन्यात करुणानिधींचे खाजगी चिटणीस लँडिंगवर उभे राहिले व का. क्षि. श्रीं. ना त्यांनी खुणावले. का. क्षि. श्रीं. ची गडबड उडाली. त्यांनी आम्हांला तिघांना पाठोपाठ येण्यास सांगितले.

जिना चढून आम्ही वर खोलीत गेलो. छोटयाशा दिवाणवर गादी पसरलेली होती व मध्यभागी उत्सवमूर्तीसारखे करुणानिधी बसले होते. मागे लोड होता. परंतु ते खाली पाय सोडून बसले होते. त्यांच्या अंगात तलम झुळझुळीत नेहरू शर्ट होता. रेशमी उत्तरीय त्यांनी दोन्ही खांद्यांवरून सोडलेले होते. त्याचे काठ जरीचे होते. मला वाटले की त्यांचे घर हीच एक पालखी आहे. ते पालखीत बसले आहेत. खाली जमलेल्या माणसांनी ही पालखी खांद्यावर घेतली आहे.

**‘ वणक्कम ’**

आम्ही तिघांनी हात जोडून त्यांना नमस्कार केला. नमस्तेऐवजी आम्ही ‘ वणक्कम् ’ म्हणताच करुणानिधींच्या चेहऱ्यावर मंद स्मित पसरले.

समोर मांडलेल्या खुर्च्यांवर आम्ही बसलो. आमचे बोलणे लिहिण्याकरता दोन लघुलेखक चोपडया घेऊन पुढे सरसावले. त्या दोघांच्यामध्ये एक काळसर तरतरीत गिड्डासा तरुण होता. त्याच्या अंगात खादीचा शर्ट होता व खाली दुमडलेली लुंगी होती. करुणानिधींचे दैनिक ‘ मुरसोळी ’ याचे ते कार्यकारी संपादक आदित्यार होते, हे आम्हांला नंतर समजले.

“ मी तामीळमधून उत्तरे देईन. प्रश्न इंग्रजीतून विचारले तरी चालतील, ” असे का. क्षी. श्रीं. मार्फत करुणानिधींनी आम्हांला सांगितले. परंतु पुढे असा अनुभव आला की आम्ही विचारलेला प्रश्न इंग्रजीतून–तामीळमधून त्यांच्यापर्यंत पोचेपर्यंत ते उत्तर देत नव्हते. फारच सावधपणे व शब्द निवडून निवडून ते बोलणार आहेत हे लगेचच ध्यानी आले.

‘ समय हा सोन्यासारखा आहे ’ हे सुभाषित तिथे टांगलेले असल्याने आम्हांला झपाट्याने काम उरकावे लागणार होते. शिवाय खाली ताटकळत बसलेली माणसे आम्ही प्रत्यक्ष पाहिलेली होती.

द्रविड मुन्नेत्र कळघमच्या संघटनेची सर्व सूत्रे करुणानिधी यांचे हाती असतात असे आम्ही ऐकत होतो. पक्षाचे बौद्धिक नेतृत्व मुख्यतः अण्णा दुराई व नेडूनजेनियन यांचेकडे असले, तरी पक्षाची सर्व संघटना-सूत्रे करुणानिधींकडे होती. तेच पक्षाचे खजीनदार व प्रचारप्रमुख होते. त्यांच्याशी बोलताना आम्हांला याचा अनुभव

आला की जेवढ्यास तेवढे उत्तर देऊन ते प्रश्नाची बोळवण करीत होते. जास्त बोलण्यास ते उत्सुक नव्हते. शिवाय प्रदर्शनी बाहुले (Show-Doll) ही भूमिका पेलायला त्यांची चेहरेपट्टी अतिशय अनुकूल होती. ते सिनेमा नट होते व द्रविड मुन्नेत्र कळघमच्या प्रचारकी नाटकातून ते नायकाची भूमिका करीत असल्याने ते जनतेचे लाडकेही झालेले होते.

" स्वतंत्र द्रविडस्तानबाबत आपले धोरण काय आहे ?" ह्या प्रश्नाला त्यांनी विस्तृत उत्तर दिले. ते म्हणाले–

" आम्ही ती मागणी सोडली आहे असे अण्णा दुराईंनी सांगितलेले आहेच. पार्लमेंटमध्येही आमच्या प्रतिनिधींनी हे जाहीर केले आहे."

भाषेच्या प्रश्नाबाबतही त्यांनी सर्वज्ञात भूमिकाच सांगितली. ते म्हणाले–

" तामिळ ही आमची भाषा. ती आता तामिळनाडचे सर्व व्यवहार सांभाळील व प्रांताप्रांतांतील भाषा म्हणून आम्हांला इंग्रजी हवे आहे. हिन्दी नको. तामीळ व इंग्रजी या दोन्ही भाषा आम्ही शिकवणार आहोत."

दहा-पंधरा मिनिटांत महत्त्वाचे असे हे दोनच प्रश्न चर्चिले गेले. त्यांची उत्तरे त्यांनी दिली ती फारशी नवीन नव्हती. मुलाखत लांबविण्यात अर्थ नव्हता. तेव्हा आम्ही उठू लागलो. यावर करुणानिधींनी का. क्षि. श्री. यांना तामिळमधून सांगितले, की त्यांना काही प्रश्न विचारावयाचे आहेत.

आम्ही थोडे चकित झालो. त्यांना विचारलेला पहिला प्रश्न का. क्षि. श्री. यांनी आम्हांला भाषांतरित करून सांगितला–

" शिवसेना ही काय गडबड करीत आहे ?"

" शिवसेना ही फक्त मुंबईपुरती मर्यादित आहे ही पहिली गोष्ट. मंबईत महाराष्ट्रीय माणसांची काही दुःखे आहेत. ती दुःखे खरी आहेत. त्याला शिवसेनेने वाचा फोडली आहे."

–पुंडलिकांनी प्रश्नाला पुरेसे उत्तर दिले. परंतु करुणानिधींनी विचारले–

" काय दुःखे आहेत ? यासाठी दक्षिण भारतीयांवर हल्ले का होतात ?"

" हल्ले झालेच असतील तर ते सर्वच चळवळींत गुंडांकडून होतात तशा स्वरूपाचे ते असावेत. शिवसेनेने संघटितपणे हे हल्ले घडवून आणलेले आहेत असे आम्हांला वाटत नाही. अर्थात् We belong to Poona–आम्ही पुण्याचे आहोत आणि पुणे हे मुंबईपासून १२० मैलांवर आहे, तरी तिथे ही चळवळ नाही. प्रत्येक शहरात बाहेरून आलेले परप्रांतीय असे प्रश्न निर्माण करतात; तसे मुंबईतही झाले आहेत. स्थानिक लोकांना नोकऱ्या नाहीत. राहायला घरे मिळत नाहीत."

–जोशींनी आवेशात या गोष्टी सांगितल्या. का. क्षि. श्रीं. नी भाषान्तर करताना त्यातला आवेश काढून त्या करुणानिधींच्या कानांवर घातल्या. त्यांचे समाधान झाल्यासारखे दिसले. निदान आणखी प्रश्न त्यांनी विचारला नाही व आम्ही उठलो.

करुणानिधींना प्रत्यक्ष भेटलो या व्यतिरिक्त या सकाळच्या धडपडीत काही घडले नाही, अशी रुखरुख आमच्या मनाला लागलेली असताना 'मुरसोळ्ळी' पत्राचे आदित्यार यांनी अचानक आमची रुखरुख नाहीशी केली. त्याचे असे घडले की, आम्ही खाली आलो व आदित्यार यांनी आम्ही कोण, कुठले याची चौकशी केली. आमचे बोलणे चालू असतानाच मद्रास कॉर्पोरेशनचे मेयर व इतर काही अधिकारी जीपमधून तिथे आले. आदल्या दिवशी मद्रासमध्ये एका झोपडपट्टीला मोठी आग लागली होती व असंख्य झोपड्या भस्मसात झाल्या होत्या. त्या वेळी तरी झोपडपट्टीला लागलेली ती आग अपघाती आहे असा समज होता. करुणानिधींना घेऊन ही मंडळी जीपमधून जळिताच्या ठिकाणी जाणार असे दिसू लागताच, आदित्यार यांचेबरोबर ' मुरसोळ्ळी ' दैनिकाच्या कचेरीकडे आम्ही चालू लागलो.

आदित्यार हे द्रविड मुन्नेत्र कळघमचे कडवे प्रचारक झालेले होते. विनोबांच्या पदयात्रेत एकेकाळीं ते फिरले होते; व आता द्रविड मुन्नेत्र कळघममध्ये स्थिरावले होते. विनोबांविषयी बोलताना त्यांनी अण्णा दुराईंचाच हवाला दिला. ते म्हणाले, " अण्णा दुराईंच्या मते विनोबा ही आजची सर्वश्रेष्ठ व्यक्ती आहे–" परंतु याच संदर्भात अण्णांचे एक वचन त्यांनी चालता चालता सांगितले.

" We have Saints and also illitteracy.
We have rivers and also draught.
We have rains and also hunger".

इथे संत आहेत पण निरक्षरता आहे. इथे नद्या आहेत तरी पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. इथे पाऊस आहे आणि भुकेचा राक्षसही आहे. अण्णा दुराईंच्या तत्वप्रणालीतील आकर्षून घेणारा भाग असा छोट्या छोट्या वचनांचा असला पाहिजे, हे माझ्या ध्यानात आले.

निवडणुकांनंतर ते दिल्लीला गेले असता एका वार्ताहराने त्यांना विचारले,–

" द्रविड मुन्नेत्र व स्वतंत्र पक्षाचा मधुचंद्र आता संपणार काय ?"

अण्णा दुराईंनी हसत सांगितले होते– " मधुचंद्र संपतो तिथेच संसाराची सुरुवात होते !"

याच दिल्लीवारीत केरळचे मुख्यमंत्री नंबुद्रिपाद यांनी जेव्हा सांगितले, की पी. एल. ४८० योजनेखाली अमेरिकेकडून येणारे अन्नधान्य माझ्या प्रांतात नको, तेव्हा अण्णा दुराईंनी हा डावा आग्रह मोडून काढीत सांगितले,

" मी इतका सनातनी नाही !"

अण्णा दुराई यांचा हा असा हजरजबाबीपणा व वक्तृत्वातील उपरोधिक सूर यांच्यावर भाळलेला हा असा आदित्यार होता. तो म्हणाला–" आमच्या पक्षाचे निशाण तुम्ही पाहिले का ? आमच्या ध्वजात दोनच रंग आहेत. वर अर्धा भाग काळा व खालचा लाल. काळा रंग हा अज्ञानाचा रंग आहे. लाल रंग हा ज्ञानाचा

रंग आहे. अज्ञान घालवून ज्ञानियांचे राज्य स्थापन करण्यासाठी द्रविड मुन्नेत्र कळघम पक्ष सत्तेवर आलेला आहे."

बोलत बोलत आम्ही पत्राच्या कचेरीशी आलो होतो. 'मुरसोळ्ळी' दैनिकाच्या कचेरीच्या तोंडावरच अण्णा दुराईंचे सहा-सात फुटी मोठे छायाचित्र लटकावलेले होते. आतली कचेरी मात्र सुमार होती. टेबलावर त्या दिवशीचा अंक पसरलेला होता. एक साधे टेबल व त्याच्या आसपास पाच–सहा खुर्च्या ठेवलेल्या होत्या. पार्टीशन घालून संपादकाची खोली तयार केलेली होती. दुसऱ्या खोलीत आत जायला एक अंधारी बोळकंड होती व त्याच्या टोकाला दोन-तीन माणसे पत्राचे गठ्ठे इकडून तिकडे हलवीत होती. टेबलावर फोन होता.

कचेरीचा चौकीदार म्हातारा किरकिऱ्या होता व आम्ही संपादकांच्या खोलीत शिरताच तो दारात येऊन अवघडल्यासारखा उभा राहिला.

आदित्यार यांनी आमच्यासाठी कॉफी मागविली. कळकट ग्लासेसमधून आलेले ते कडवट पेय आम्ही पोटात घातले. आपल्याकडे बेचव चहा मिळतो तशी मद्रासमध्ये भिकार कॉफीही मिळते. एकीकडे आम्ही आदित्यार यांना प्रश्न विचारत होतो. त्या दिवशीच्या 'मुरसोळ्ळी'च्या अंकात आदित्यार यांचा जो लेख आला होता तो त्यांनी आम्हांला दाखवला.

"अण्णांबरोबर पांड्यांच्या राजधानीत" असे ते सदर होते. त्या सदरावर एक मासा व एक तलवार काढलेली होती. मासा हे पांड्यांच्या ध्वज चिन्हावरील चिन्ह होते. अण्णांचे व्याख्यान व करुणानिधी यांचा कुठेतरी झालेला सत्कार यांनी पहिले पान दोघांच्या कॉलमभर छब्यांसह अडवलेले होते.

'मुरसोळ्ळी' म्हणजे 'Sound of the trumpet'–तुतारीचा आवाज. दैनिकाचे नाव अर्थसूचक होते. एका उधळलेल्या बैलाची शिंगे धरून त्याला नेस्तनाबूद करणारा युवक दाखवणारे बोधचिन्ह दैनिकाच्या अग्रभागी नावासोबत आग्रहाने छापले जात असे. त्याचाही अर्थ हाच होता की काँग्रेसच्या उधळलेल्या बैलाला आवरणारा असा हा द्रविड मुन्नेत्र कळघम पक्ष आहे.

या दैनिकाचा दिवाळी अंक व निवडणुकीतील व्यंगचित्रांची चळत आदित्यार यांनी आमच्यापुढे टाकली. आदित्यार म्हणाले–" या व्यंगचित्राचा आता आम्हांला काहीच उपयोग नाही, वाटल्यास तुम्ही ही घेऊन जा."

द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाच्या प्रचाराची पातळी समजायला ही चित्रे मदत करणारी होती. म्हणून आम्ही ती निवडू लागलो. तोच मघापासून तोंडावर मारकटगाईचे कातडे ओढलेला तो म्हातारा चौकीदार एकदम पुढे झाला, आणि त्याने आदित्यार यांना मायबोलीत खडसावले. त्याच्या हातवाऱ्यावरून आम्हांला ही चित्रे देण्यास त्याचा सक्त विरोध होता. आमच्यादेखत चौकीदाराने आपला अपमान करावा हे आदित्यार यांना सहन झाले नाही. त्यांनी मायबोलीत त्याची हजेरी घेतली व ते

आम्हांला म्हणाले.–

"This third class fellow wants to teach me! He is a chowkidar. I am a sub-editor. What does he mean ?"

परंतु-तो चौकीदार ऐकेना. अखेर आदित्यार यांनी आम्हांला दोन-तीन चित्रेच निवडण्यास सांगितले.

**झाला प्रकार बराच अर्थवाही होता. दलितोद्धाराचे कंकण बांधलेली ही मंडळीही माणसाची लायकी व पेशाप्रमाणे वर्गवारी मनात बाळगतातच! शिवाय या कचेरीचे स्वरूपही बकाली आहे हे यावरून समजत होते.**

आदित्यार यांचे आभार मानून आम्ही 'मुरसोळ्ळी' कचेरी सोडली. या कचेरीला लागूनच अण्णा दुराई यांनी स्थापन केलेल्या 'होमरूल' या इंग्रजी साप्ताहिकाची कचेरी होती. या कचेरीबाहेरही अण्णांचा सहा-सात फुटी फोटो लटकत होता. ही कचेरी बंद होती.

मद्रास शहराच्या निरनिराळ्या भागांतून फिरताना व पुढे मद्रासच्या आसपासच्या खेड्यांतून आमची बस जात असताना एक गोष्ट आमच्या ध्यानात आली की, प्रत्येक खेड्याने व मोहोल्ल्याने पक्षाची निशाणे लावण्याकरता एक कोपरा मुक्रर केला होता. काँग्रेस, द्रविड मुन्नेत्र कळघम व स्वतंत्र पक्षाचे ताराधारी निळे निशाण, ही सर्व एकाच जागी गुण्यागोविंदाने फडकत असत. रोवलेली असत. कमी—अधिक उंचीवर. आता लक्तरे झालेली व रंग उडालेली ती तीन पक्षांची फडकी फडफडताना, एकाच झाडाच्या तीन फांद्या वाटाव्या अशी वाटत असत. तिघांचा विटका रंग मात्र एकाच प्रकारचा वाटत होता!

महाबलिपुरमला जाताना वाटेत आमची मोटार 'कलायम' या खेड्यात थांबली. रस्त्याच्या कडेला झोपडीत इडली-चहा-कॉफी मिळत होती. हे सर्व खेडे वनियार जातीचे दिसले. वनियार ही अस्पृश्य जमात आहे. (बेकायदेशीरपणे!) या झोपडीवरदेखील द्रविड मुन्नेत्र कळघमचे निशाण होते. या सर्व गावांची मते द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षालाच पडलेली दिसली.

करुणानिधी यांची 'उंची' ही खेडोपाडी पसरलेल्या या गरीब दलित जनतेला आकृष्ट करण्याइतकी रोमँटिक व मते खेचणारी असून, सांस्कृतिकदृष्ट्या ते कुणी परके वाटावे एवढी ती मोठीही नव्हती. करुणानिधी किंवा 'दिनठंठी'चे आदित्यन् या मंडळींनी द्रविड मुन्नेत्र कळघमची संघटना घट्ट मुठीत ठेवली, ती त्यांच्याभोवती असलेले सिनेनट वा सिनेमा सृष्टीतील माणसे म्हणून असलेले वलय व बौद्धिक दर्जापासून त्यांना लाभलेली नैसर्गिक मुक्तता, यामुळेच होय.

श्री. नेडूजेनियन या तामिळनाडच्या शिक्षणमंत्र्यांना आम्ही त्याच दिवशी दुपारी त्यांच्या निवासात भेटलो, तेव्हा जनसंपर्काप्रमाणेच द्रविड मुन्नेत्र कळघमचे बौद्धिक नेतृत्व हेदेखील समर्थ आहे याचा प्रत्यय आम्हांला आला.

आम्ही बंगलीत शिरलो तोच आदल्या दिवशी सकाळी सचिवालयात भेटलेले शिक्षण मंत्र्यांचे खासगी कारकून राघवन् हे तिथे आम्हांला आढळले. विस्तीर्ण दिवाणखान्याचे कसलेही पार्टीशन न घालता दोन भाग केलेले होते. गोलाकार कोच मांडलेले होते व दिवाणखान्यात यायला आतल्या भागातून जो दरवाजा होता त्याला लागून मध्यभागी एका बैठ्या टीपॉयमोवती चार कोचांच्या खुर्च्या ठेवलेल्या होत्या.

राघवन यांचे टेबल दिवाणखान्याच्या उजव्या कोपऱ्यात जिन्याखाली होते. ते सारखे घांदलीने इकडे–तिकडे फिरत होते.

शिक्षणमंत्र्यांची उंची चांगली ५।।–६ फूट आहे व ते चांगलेच धिप्पाड आहेत. शिवाय तलम पांढरा स्वच्छ नेहरू शर्ट त्यांनी घातलेला होता. त्यामुळे त्यांची भरदार रुंद छाती अधिकच मोठी वाटत होती. वर्णाने काळे असले तरी डोळ्यांत शिक्षणाचे तेज होते. चष्म्याच्या भिंगाआडून पाहणारी त्यांची नजर त्यांनी चेहरा हसतमुख केला तरीही मिस्किल वाटत होती.

ते टीपॉयमोवती पाय सोडून बसले व आम्ही तिघे त्यांच्यासमोर बसलो, तेव्हा एका ठिकाणी चार माणसे जवळजवळ डोकी घाशीत बसावीत तसे वाटत होते.

प्रश्नांची आघाडी पुंडलिकांनी उघडली. प्रश्न मुख्यत: केंद्र सरकार व तामीळनाड सरकार यांच्या संबंधांवर होते. शिक्षणमंत्र्यांची उत्तरे उडवाउडवीची नव्हती. आग्रही परंतु संयमी होती. अर्थात केंद्राचे व राज्याराज्यांचे संबंध चांगले राहावेत ही सर्वस्वी केंद्राची जबाबदारी आहे, हे त्यांचे म्हणणे अन्यायकारक होते.

परस्परसंबंधांची भाषा ही इंग्रजीच हवी असे त्यांनी प्रतिपादन करताच मी विचारले –

" याकरिता द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे जे सभासद लोकसभेवर निवडून गेले आहेत ते निवडताना त्यांना इंग्रजी चांगले लिहिता–वाचता येते हा निकष आपण लावला होता काय ?"

शिक्षणमंत्री म्हणाले –

" नाही. आम्ही ते करू शकलो नाही. १९७२ साली आम्ही ते करू !"

## हजरजबाबी शिक्षणमंत्री

जोशींनी नेहमीचा खदखदणारा प्रश्न केला –

" आपल्या पक्षाने एकाही ब्राह्मणाला तिकीट दिले नाही. मद्रासच्या मागील मंत्रिमंडळातही ब्राह्मण नव्हता. या मंत्रिमंडळातही नाही. याचे कारण काय ?"

शिक्षणमंत्र्यांचे उत्तर वाजवी होते. तरीही लबाडीचे होते. ते म्हणाले –

"आमचा स्वतंत्र पक्षाशी समझौता झाला. ब्राह्मणवर्ग हा बहुतांशी स्वतंत्र पक्षाच्या पाठीशी आहे. ब्राह्मणाचा कोटा स्वतंत्र पक्षालाच आम्ही दिला होता, व त्यांना आम्हीही मते दिली आहेत. आमच्या पक्षाच्या तिकिटावर कुणी ब्राह्मण निवडूनच न

आल्यामुळे मंत्रिमंडळात त्यांना जागा देण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही ! "

हे उत्तर शिक्षणमंत्री देत असताना मी सहज मागे पाहिले तो, राघवन जागीच उभा राहून पुंडलिकांना खुणावत होता —

" विचारा, विचारा. चांगला प्रश्न आहे ! "

राघवन्‌चे दुःखच जणू जोशींनी पुढे मांडले होते असा त्याचा चेहरा फुलला होता.

हळूहळू राघवन धीट झाला. पुढे आला. शिक्षणमंत्र्यांना पुष्टी देणारे मध्ये मध्ये बोलू लागला. शिक्षणमंत्र्यांनी त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. परंतु ते नाराजही झाले नाहीत. राघवन कारकुनाची ही खोड त्यांना परिचित असावी.

हळूहळू पुंडलिक नव्या नव्या प्रश्नांनी चर्चा पुढे रेटीत होते. वाकडातिकडा प्रश्न विचारणे हे माझे काम असल्याने मी मध्येच विचारले,

" मुंबईच्या निवडणुकीत द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाने कृष्ण मेनन यांचा प्रचार करण्यासाठी आपल्या पक्षाचे कार्यकर्ते धाडले ते का ? कृष्ण मेनन हे तुम्हांला जवळचे वाटतात ते कसे ?"

शिक्षणमंत्र्यांना यातली खोच लक्षात आली असावी. नेहूनजेनियन कदाचित पुढे शिवसेनेवर येतील या हिशेबाने मी ही मोर्चेबंदी सुरू केली होती.

शिक्षणमंत्री क्षणभर गोंधळले. परंतु हजरजबाबीपणाने म्हणाले —

" असे पाहा. तुम्ही तिघे आहात. या गृहस्थांच्या डोळ्याला (जोशी) चष्मा आहे. माझ्या आहे. तुमच्या तिघांत मला हे गृहस्थ जवळचे वाटतील ! तसेच कृष्ण मेनन हे दक्षिण भारतीय आहेत एवढाच त्यांच्यात–आमच्यात धागा आहे–! "

मुंबईला माटुंगा मतदार संघातून निवडून येणारे माधवन हे पूर्वी प्रजासमाजवादी पक्षाच्या तिकिटावर निवडून येत असत. पी. एस. पी. वाल्यांना वाटले हा आपला मतदार संघ आहे. पुढे माधवन काँग्रेसमध्ये गेले. तरी तेच निवडून येतात. उद्या ते स्वतंत्र म्हणूनही तिथून निवडून येतील. कारण त्यांना दक्षिण भारतीय मते देतात ते त्यांच्या भौगोलिक गुणांमुळे ! ही हकीकत मी शिक्षणमंत्र्यांना सांगताच ते म्हणाले, —" It is so ! "

मात्र ते पुढे म्हणाले —

" सर्वच शहरे हळूहळू भारतातील निरनिराळ्या भागांतून आलेल्या माणसांनी गजबजून जाणार आहेत. मद्रास शहरात कितीतरी परप्रांतीय आहेत. हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे, हे आम्हांला माहीत आहे. "

अपेक्षेप्रमाणे शिवसेनेसंबंधी त्यांनी प्रश्न विचारला. त्या संबंधी पुंडलिकांनी जे म्हणणे मांडले त्याच्याशी शिक्षणमंत्री सहमत झाले.

मद्रास शहरातील पंचम जॉर्ज बादशहा व त्यांचे सुभेदार-दरकदार यांच्या पुतळ्यांसंबंधी विचारल्यावर मात्र त्यांची प्रतिक्रिया अगदी अनपेक्षित झाली. शिक्षणमंत्री म्हणाले—

"आमचे ब्रिटिशांशी भांडण नाही. ते चांगले लोक होते. खूप चांगल्या गोष्टी त्यांनी केल्या. आम्हांला ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन, रशियन या सगळयांशीच चांगले संबंध ठेवायचे आहेत!"

ही आमची चेष्टा होती की, ब्रिटिशधार्जिण्या रामस्वामी नायक्कर यांच्या राजकारणाचा हा शिल्लक राहिलेला अंश होता हे आम्हांला कळले नाही.

बराच वेळ झाला होता. आम्ही शिक्षणमंत्र्यांचा निरोप घेतला. बंगल्याबाहेर आलो तो पाठोपाठ राघवनची स्वारी आली. तो अगदी हरखल्यासारखा झाला होता. तो उत्साहाने सांगू लागला—

" मी राजगोपालाचारी, कामराज, भक्तवत्सलम या सगळयांच्या वेळेपासून सचिवालयात आहे. इकडे तिकडे थोडा त्रास व्हायचाच पण द्रविड मुन्नेत्र कळघम राज्यातही ब्राह्मणांना मुळीच त्रास नाही."

सचिवालयात त्याने त्या दिवशी आम्हांला मागे सारून दुसऱ्याच लोकांना पुढे का घुसवले याचेही स्पष्टीकरण केले. आमचे त्याच्याविषयी विशेष चांगले मत व्हावे यासाठी तो गडबड गडबड उडवीत प्रयत्न करीत होता.

एका डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या साप्ताहिकाने द्रविड मुन्नेत्र कळघमच्या एका मतदाराच्या मुलाखतीत घातलेली खालील वाक्ये मला आठवली. तो म्हणाला होता—

" We were down for 20 years. We had no identity. We were smothered under the rule of the wealthy Mudliar community and the scheming brahmins. We have now found our feet."

'उपद्व्यापी' ही मद्रासी ब्राह्मणांना लावलेली उपाधी किती चपखल होती. त्याचा प्रत्यय मात्र या राघवन-दर्शनाने मला आला व ब्राह्मण मंत्रिमंडळात नसले तरी 'आसपास' आहेत याचे समाधानही झाले.

## तामीळ लेखकांसमवेत

आता फक्त सायंकाळची तामिळ कथा-लेखकांशी ठरलेली मुलाखत आटोपली की, मद्रासमधील काही दर्शनीय व प्रेक्षणीय भाग पाहण्यास आम्ही मोकळे होणार होतो. ज्या कामासाठी जोशी-पुंडलिक आलेले होते, त्यातली ही अखेरची महत्त्वाची बैठक होती. काम संपत आले की उत्साहाची एक अखेरची लाट काम गुंडाळीत येते. सायंकाळी पाच वाजता आम्ही म्हणूनच उत्साहाने रमतगमत 'महाजन सभा' या संस्थेच्या सभागृहापाशी पोचलो. हे सभागृह लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या इमारतीच्या पिछाडीस होते.

आम्हांला सभागृह सापडायला काहीसा वेळ लागला. त्यामुळे आम्ही सभागृहाच्या तोंडाशी पोचेपर्यंत २०—२२ लेखक मंडळी सभागृहाच्या गच्चीतच गप्पाटप्पा करीत आमची वाट पाहत असताना आम्ही पाहली.

महाजन सभचे हे समागृह पाहताना मुंबई मराठी साहित्य संघाच्या सभागृहाची किंवा पुण्याच्या सार्वजनिक वाचनालयाच्या समागृहाची आठवण झाली. लोकमान्य, महात्माजी, जवाहरलाल, सुभाषबाबू, गोखले, राजगोपालाचारी आदी नेत्यांची ५–६ फुटी सोनेरी रुंद चौकटीत बंदिस्त केलेली मोठाली छायाचित्रे चारी दिशांना लावण्यात आली होती. संत तिरुवलीवर व रवीन्द्रनाथांची चित्रेही त्यात होती. सभागृहाला जुन्या पुस्तकांची भरलेली काचेची कपाटे व उंच तावदानाच्या खिडक्यां-मुळे विद्योपासनेचे विशिष्ट वातावरण तेथ जाणवत होते. भिंतींचे रंग विटलेले होते. जीर्ण सतरंज्या दुमडून त्यांवर बसावे लागत होते व भिंतींवर महापुरुषांची मोठाली गंभीर छायाचित्रे होती व या सगळ्यांमुळे तिथे काहीसा मंदिरातला उदासपणा भरून राहिला होता.

परंतु आम्ही सर्व परस्परपरिचयासाठी मध्यभागी सतरंजीवर बसताच, अखि-लन यांनी मिस्किलपणे जमलेल्या लेखकांची स्तुती करीत या बैठकीचे स्वरूप सांगितले. ह्या सर्व मंडळींत विलक्षण सौहार्द दिसत होते व सर्वजण परस्परांशी चांगले परिचित असून नेहमीच्या बैठकीतील परस्परांची थट्टामस्करी ते सर्वजण करीत होते.

'प्रसन्न विघटन' या तामिळ मासिकाचे वयोवृद्ध संपादक श्री. नारायण दुरिक्कण यांनी आपला परिचय करून देताना सांगितले की, इथे जमलेल्या लेखकां-पैकी बहुतेकांचे पहिले लिखाण माझ्या मासिकात प्रसिद्ध झाले आहे. एम्. अब्दुल वहाब यांची छोटीशी काळीपांढरी दाढी व उर्दू आदब मला फार आवडली. 'ओरिजिनल' लिहिण्याचा गुन्हा आपण केलेला नाही असे सांगून त्यांनी आपल्या ऐतिहासिक व धार्मिक कथांची ओळख दिली. जी. अलिगर स्वामी यांचे आठ कथा-संग्रह होते व कंबरामायणाचे पाच भाग त्यांनी प्रसिद्ध केलेले होते. श्रीमती कमला या चाळीस-पंचेचाळिशीच्या लेखिकेने आतापर्यंत ६०० कथा व १२ कादंबऱ्या निर्माण केलेल्या होत्या तर चेलप्पा यांच्या १०० कथा व २ कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या होत्या.

यांचे हे पुस्तकांचे आकडे ऐकून फक्त एक कथासंग्रह नावावर जमा असलेल्या विद्याधर पुंडलिकांचा चेहरा अधिकाधिक गंभीर होऊ लागला, तर आपणच पुष्कळ लिहिले आहे हा जोशींचा गर्वसोपान ढासळू लागला होता.

गोमती स्वामिनाथन या स्त्री लेखिकासदृश नावाने लिहिणारे लेखक ऑडिट ऑफिसात कारकुनी करता करता आघाडीचे विनोदी लेखक झालेले आहेत, अशी पुष्टी अखिलननी जोडल्यावर, गोमती यांनी सांगितले, "२००० विनोदी लेख मी आजपर्यंत लिहिले आहेत. ६५० विनोदी लघुकथांबरोबर एक नाटकही माझ्या नावे जमा आहे." एवढे विनोदी साहित्य लिहिल्यानंतरही अजून विनोदाला विषय त्यांना सापडत असलेले पाहून आम्ही सहजोद्गार काढला- "आहे बुवा!"

स्वामिनाथन म्हणाले–"बुवा म्हणजे काय ?" यांवर जोशींनी सांगितले "हे मराठीतील गोमती स्वामिनाथन आहेत ! " कोमल स्वामीनाथ हे दुसरे साहित्यिक तिथे आलेले होते, त्यांची तीन नाटके रंगभूमीवर आलेली होती. 'अरिओली' या साप्ताहिकाचे संपादक श्री. कानेसर, तामिळ इतिहासाचे अभ्यासक मायली सिनी वेंकटराज, प्रमुख प्रकाशक एम्. एस्. सबंमदम, स्थापत्य शास्त्राचे अभ्यासक श्री. अमलनाद, चित्रकार व नवकवी एस. वहिदीश्वरन, नेताजी सुभाषचंद्रांच्या सैन्यात सेकंड लेफ्टनंट म्हणून लढलेले साहित्यिक लेखक श्री. के. एम्. मुथय्या, कथालेखक चेलप्पा अशी प्रत्येकाची काही काही ओळख लक्षात राहिली.

पंचवीस-तीस पेट्रोमॅक्सपुढे दोन-तीन प्रभाकर कंदील धरावेत अशा तऱ्हेने आमच्या साहित्यिक कर्तृत्वाचा आढावा त्यांनी ऐकला.

या जवळजवळ सर्वच लेखकांनी, का. क्षि. श्री. यांनी तामिळमध्ये रूपांतरित केलेल्या वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांची अक्षरश: पारायणे केलेली होती. त्यांच्या नायिका, कादंबरीतल्या कोटचा, प्रसंग हे चटपट ही मंडळी सांगत होती. तामिळ साहित्यावर खांडेकरांनी विलक्षण परिणाम केलेला आहे असे अखिलन यांनीच सांगितले. त्यानंतर वहिदीश्वरन यांनी मार्मिक प्रश्न विचारला, "खांडेकरांचे साहित्य अजूनही मराठी वाचकांत लोकप्रिय आहे काय ?"

यावर जोशींनी सावध उत्तर दिले,

"एकेकाळी खांडेकरांचे साहित्य अतिशय आवडल्यानंतर पुढे ते आवडत नाहीसे झाल्याची अनेक उदाहरणे आमचेकडे आढळतात !"

"ओ–अ ओऽऽ..." असा खेदोद्‌गार यावर पाच-सहा जणांनी काढला. पुंडलिकांनी यावर उत्तर देण्याचे काम आपलेकडे घेतले.

ते म्हणाले,

"He is still quite popular ! अजून खांडेकर चांगले लोकप्रिय आहेत."

चविष्ट कॉफीपानानंतर मराठीतील आजचे साहित्यिक प्रवाह व तामिळमधील साहित्यिक प्रवाह यांची परस्पर प्रश्न विचारून काही काळ चर्चा झाली. मराठीत उदय पावलेला बिटनिक साहित्यिकाचा वर्ग अजून तामिळ भाषिकांना अज्ञात आहे असे आम्हांला आढळून आले. नवकाव्य म्हणजे निर्यमक कविता एवढीच कल्पना आज तिकडे आहे.

शेवटी श्री. अखिलन यांनी सांगितले की जमलेल्या बऱ्याच मंडळींची 'शिवसेने'-संबंधी चर्चा करण्याची इच्छा आहे.

आम्ही ज्या गावाहून आलो आहोत तिथे शिवसेना नाही. परंतु मुंबईचे आम्ही बराच काळ रहिवासी असल्याने त्यासंबंधी शक्य असेल तेवढे शंकानिरसन आम्ही करू असे आम्ही त्यांना सांगितले.

"'द्रविड मुन्नेत्र कळघम' व 'शिवसेना' या एकाच मापाने मोजता येणार

नाहीत," असे सांगून श्री. अखिलन यांनी महत्त्वाचा मुद्दा मांडला. ते म्हणाले– "द्रविड मुन्नेत्र कळघमला भाषा, संस्कृती व इतिहास या सर्व दृष्टींनी तामिळनाडची तामिळ–'Identity' स्पष्ट करावयाची आहे. परंतु तुम्ही सांगता त्यावरून शिवसेनेची तक्रार फक्त मराठी लोकांची नोकऱ्यांबाबत जी आर्थिक गळचेपी होत आहे तेवढ्यापुरतीच दिसते. मग त्यांचा तंटा तिथल्या राज्यसत्तेशी असायला हवा तो त्यांच्याशी नसून मुंबईतील दाक्षिणात्यांशी त्यांनी वैर का धरावे ?"

इतक्या संख्येने तामिळ साहित्यिकांना एकदम भेटण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले. त्यांना पुण्याचे निमंत्रण दिले.

मराठीत कथावाचनाचे जाहीर कार्यक्रम यशस्वी होतात ही माहिती बोलता बोलता आमच्याकडून त्यांना कळली होती. उठता उठता श्री. अखिलन म्हणाले, "ही कल्पना फारच छान आहे. आम्हीही तामिळ कथांच्या वाचनाचा लवकरच अवश्य प्रयोग करून पाहू."

रस्त्यावर आलो तेव्हा बाहेर चांगलाच काळोख पडलेला होता. शनिवारी म्हणजे उद्यापासून आमची फाटाफूट होणार आहे. उद्या दुपारी एक वाजता श्री. जं. च्या सौ. इथे येऊन दाखल झाल्या. की जोशींचे सहकुटुंब दक्षिणायन सुरू होणार आहे.

मी व पुंडलिक उद्या मद्रासच्या अवाढव्य म्युझियममध्ये चांगले पाच-सहा तास घालवणार आहोत. रविवारी महाबलिपुरमची सहल करून, सोमवारी मदुरेला जायचे आम्ही नक्की केले आहे. उद्या बसची तिकिटे काढू.

आज रात्रीचे जेवण खूपच रेंगाळत आणि मजेत झाले. जेवताना पुंडलिक-जोशी 'माणूस' मधल्या आगामी लेखमालेच्या आराखड्याची चर्चा करीत होते. जोशी सांगत आहेत की, "तुम्ही पुढे पुण्याला पोचेपर्यंत मी पहिले दोन लेख पोस्टाने पाठवतो." मला माहीत आहे हे शक्य होणार नाही परंतु लिहितो म्हणणाऱ्याला नाउमेद कशाला करा !

निवासावर आल्यावर अंथरुणे टाकली. पुंडलिक बाहेर कुणाला तरी फोन करायला गेले आहेत. जोशी सांगत आहेत–

"तुम्हांला मी सांगतो. हा पुंड्या आणखी दोन महिने एक ओळ लिहिणार नाही! हो, हो करील. आपली पैज !"

मी जोशींना म्हणतो आहे–

"तुम्ही पुंडलिकची काळजी करू नका. माजगावकर त्याला बरोबर लिहिता करतील, तुमचे ते दोन लेख मात्र प्रवासात लिहून टाका !" (अपूर्ण)

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ शंकराने पचविलेले भेसळीचे विष

समुद्रमंथनातून निघालेले विष शंकर प्याला, पण त्याच्यावर त्या विषाचा काही परिणाम झाला नाही. का ? पुराणकार सांगतात, शंकराच्या अंगी विष पचविण्याचे सामर्थ्य होते म्हणून ! पण मला निराळीच शंका येते. स्पष्ट सांगायचे म्हणजे त्या विषात भेसळ असावी म्हणून शंकराला ते बाधले नसावे. माझी ही शंका साधार आहे. कारण, परवा केरळच्या एका विधानसभा-सदस्याने असे विधान केले की केरळमध्ये उंदरांचे विषही इतके भेसळीचे मिळते की उंदरांवर त्याचा काही परिणाम होत नाही. पाहिलेत ! उंदरालादेखील विष बाधत नाही, तर शंकराला कसे बाधणार ? चला, होते ते बऱ्याचसाठी होते. समजा, शंकराला प्यावे लागलेले विष केरळमध्ये तयार झालेले नसते, तर बिचाऱ्यावर मोठाच अनवस्था प्रसंग ओढवला असता. मूषक वाचला तसा महादेवही वाचला !

## □ कमिटीने शिवलेले जोडे

सामान्य माणसाने चांभार-चौकशा करू नयेत, असा शिष्टाचाराचा संकेत आहे. पण सरकारला शिष्टाचाराचे बंधन नसल्याने अक्षरशः चांभार-चौकशी करण्यासाठी सरकारी कमिटी नेमल्याचे उदाहरण घडले आहे. हिंदुस्थानातल्या खाण-कामगारांसाठी योग्य प्रकारचे जोडे कसे असावेत याचा विचार करण्यासाठी सुमारे दहा वर्षांपूर्वी एक कमिटी नेमण्यात आली. मला वाटते, कमिटीत एकही चांभार नसावा. त्यामुळे जोडे करणे या कामापेक्षा चौकशी करणे याला जास्त महत्त्व होते. कुठलीही गोष्ट अविचाराने करू नये, या भारवी कवीने खास सरकारी कमिट्यांसाठी घालून दिलेल्या नियमाला अनुसरून प्रस्तुत कमिटीने बरीच वर्षे सखोल विचार केला व अखेर १९५९ साली तिचा अहवाल प्रसिद्ध झाला. आता तुम्ही विचाराल, एकदा अहवाल तयार झाल्यावर अहवालाबरहुकूम जोडे तयार व्हायला काय हरकत होती ?— पण सबूर ! चांभार अन् सरकार यांत फरक आहे तो हाच. चांभार जोडे करतो, सरकार चांभार—चौकशा करते. तेव्हा पहिल्या अज्ञ कमिटीने सुचविलेले जोडे अधिक मजबूत करण्यासाठी सन १९६३ साली दुसरी तज्ज्ञ कमिटी नेमण्यात आली.

पाहिलेत ? तेथे पाहिजे जातीचे ! सरकार म्हटले की कमिटी आलीच, अन् कमिटी म्हटली की तज्ज्ञ आलाच. या तज्ज्ञांनी चांगला दीड वर्ष खोलवर विचार

करून आपला अहवाल १९६४ च्या नोव्हेंबरमध्ये दिला– पण एवढ्या गंभीर बाबतीत अवघ्या एक-दोन कमिट्यांवर विसंबून राहण्याइतके आपले सरकार अविचारी थोडेच आहे? या दुसऱ्या कमिटीचा अहवाल तयार व्हावयाच्या आधीच सरकारने १९६३ साली आणखी एक कमिटी या जोडे-प्रकरणाचा इत्थंभूत विचार करण्यासाठी नेमली. या तिसऱ्या कमिटीच्या शिफारशी १९६५ च्या ऑगस्टमध्ये सुपूर्द झाल्या. काय, इतक्या लवकर? इतक्या सफाईने केलेले कुठलेही काम नीट होणे कसे शक्य आहे? तेव्हा सध्या या शिफारशीत सुधारणा करण्याचे काम चालू आहे. असे हे पादत्राण-पुराण ऐकून कुणाच्या पायातले त्राण राहील?


## ☐ सरकारमान्य तंदुरी चिकन

भारताच्या अस्मितेला कुठल्याही क्षेत्रात धक्का लागता कामा नये, याबद्दल हल्ली आपण फार जागरूक असतो. खरे म्हणजे भिक्षेकऱ्याचा वाडगा हातात न पेलण्याइतका जड झाल्याने डोक्यावर ठेवावा लागला असतानाही त्या वाडग्याखालची मान ताठ ठेवणे ही केवढी अवघड गोष्ट! पण तीही आपण मोठ्या खुबीने साध्य करून घेतली आहे. पण परवा मात्र हिंदुस्थानच्या पोटावरच परदेशी पाय पडण्याची पाळी आली होती. एका इटालियन डॉक्टरने म्हणे असे मत मांडले की तंदुरी चिकन आणि कबाब खाऊन कॅन्सर होतो. अर्थात् आपल्याकडे हलकल्लोळ उडाला. बिहारमधल्या दुष्काळ–पीडित चुकलो, टंचाई–पीडित माणसांना जेव्हा झाडाची पानेही खायला मिळेनात, तेव्हा त्यांच्यापुढे जगण्याचा एकच मार्ग खुला होता, पण तंदुरी, चिकनने कॅन्सर होतो म्हटल्यावर तोही खुंटला! बिहारमधला शेतकरीच कशाला, मुंबईचा हमाल, पुण्याचा पत्रकार, केरळचा कारकून, दिल्लीचा पट्टेवाला या सगळ्यांचेच धाबे दणाणले होते.

पण भारत सरकारच्या स्वास्थ्यमंत्र्यांनी सगळ्यांची काळजी दूर केली आहे. त्यांनी लोकसभेत निःसंदिग्ध घोषणा केली आहे की, तंदुरी चिकन व कबाब खाऊन कॅन्सर होतो, असे म्हणायला मुळीच आधार नाही. हाय! भारतातल्या तमाम अर्धपोटी जनतेच्या मनावरचे केवढे मोठे दडपण दूर झाले. गहू-तांदूळ खाल्ल्यानं कॅन्सर होतो असे कोणी म्हटले असते तर त्याचे विशेष वाटले नसते. कारण या दुर्मिळ व चैनीच्या वस्तू काळ्या बाजारात घेण्याइतकी अलोट संपत्ती ज्यांच्याकडे आहे, अशा दोन-चार लक्षाधीशांनाच त्याची भीती होती. पण तंदुरी चिकन खायचे नाही म्हणजे गरीब बिचाऱ्या जनतेने खायचे तरी काय? बरे, खावे म्हटले तर कॅन्सरने मरायचे, की उपासमारीने मरायचे, असा प्रत्येक भारतीय भिकाऱ्यापुढे प्रश्न पडला असता. सुदैवाने माय-बाप सरकारच्या कनवाळू स्वास्थ्यमंत्र्यांनी मनाला स्वस्थता आणली आहे. गहू-तांदूळ भरपूर खाण्याइतकी अफाट सुबत्ता कधी देशात कधी येईल ती येवो, पण सध्या तरी तंदुरी चिकन आणि कबाब खाऊन कशीबशी गुजराण करणे प्राप्त आहे.

१२ ऑगस्ट १९६७

# ११




वि. स. वाळिंबे

प्रारंभीचे सर्व सहकारी आता आपल्यापासून दूर गेले आहेत या जाणिवेचा लेनिनच्या मनावर बराच परिणाम झाला. क्रुपस्कायाला त्याच्या प्रकृतीबद्दल चिंता वाटू लागली. सेशेरान सोडून दूर कोठेतरी जाऊन आल्याशिवाय लेनिनचे मन शांत होणार नाही हे ओळखून क्रुपस्कायाने प्रवासाचा बेत आखला. जिनीव्हा, लुसान, इंटरलेक, लुकर्न अशी ही मनःपूत भटकंती सुरू होती. या प्रवासात राजकारणाची मुळीच चर्चा करावयाची नाही, असे सेशेरानहून निघतानाच क्रुपस्कायाने लेनिनला बजावले होते. महिनाभर त्यांचा हा दिशाशून्य प्रवास सुरू होता. २ जुलै १९०४ रोजी लेनिनच्या आईला धाडलेल्या पत्रात कपस्काया लिहिते— ‘ दिवसभर आम्ही वाट फुटेल तिकडे भटकत असतो. मध्येच छानदार तलाव दिसला की पोहण्याची हौस पुरवून घेतो. पोहून दमलो की मग निवांत, भरपूर झोप. कोणताच कार्यक्रम ठरवून करावयाचा नाही, असे आम्ही ठरविलेले आहे. लेनिन तर सध्या वर्तमानपत्रदेखील वाचत नाही. ’

# तुम्ही जागे झालात तर ठीकच

# नाही तर हा वणवा. . . .

या छंदखोर प्रवासामुळे लेनिनच्या मनावरील खिन्नतेचे मळभ दूर झाले. तो जिनीव्हाला परतला तेव्हा पुढच्या लढाईबाबतची त्याची मानसिक तयारी पूर्ण झाली होती.

या सुमारास ए. ए. बोगॅडॅनोव्ह या मार्क्सवादी लेखकाशी त्याचा परिचय झाला. बोगॅडॅनोव्हसारखा विचारवंत आपल्या बोल्शेव्हिक पक्षात दाखल होण्यास तयार आहे हे पाहून लेनिनचा उत्साह दुणावला. एक महिनाभर त्यांच्या बैठकी चालू होत्या. मेन्शेव्हिक गटाच्या हाती गेलेल्या 'इस्क्रा'ला तोंड देण्यासाठी आपण एक नवे साप्ताहिक सुरू करावे, असे या बैठकीत ठरले. या साप्ताहिकाच्या योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी ऑक्टोबरच्या अखेरीस जिनीव्हा येथे बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांच्या चर्चा सुरू झाल्या. या चर्चेमध्ये लेपेशिन्स्की, लुनाखरस्की, झेमलीआख, व्होरोव्हस्की, गुसेव, व्हेलिचकिना आदी कार्यकर्त्यांनी भाग घेतला. चर्चेच्या शेवटी लेनिन म्हणाला, "रशियातल्या कामगारवर्गाचे खरेखुरे प्रतिनिधित्व करणे हे आपल्या या पत्राचे मुख्य उद्दिष्ट असावयास हवे. आपण जर आवाज उठविला नाही तर बोल्शेव्हिक पक्ष संपला असेच लोक मानू लागतील, अन् म्हणूनच या नव्या पत्राचे स्वरूप जहाल असले पाहिजे."

१९०४ च्या डिसेंबरमध्ये 'फॉरवर्ड' या पत्राचा जन्म झाला. परंतु काही दिवसांनी 'प्रोलेटरियन' असे त्याचे नामांतर करण्यात आले. या पत्राची सर्व सूत्रे लेनिनने स्वत:कडेच ठेवली होती. बोगॅडॅनोव्ह, लुनाखरस्की, ओल्मिनस्की आणि व्होरोव्हस्की या चौघांचा संपादक मंडळात समावेश करण्यात आला.

'प्रोलेटरियन' पत्र सुरू होताच लेनिनला हवे होते ते शस्त्र सापडले. तो प्रत्येक अंकातून मेन्शेव्हिकांविरुद्ध कडाक्याचे हल्ले चढवू लागला. या लिखाणाचे स्वरूप इतके तिखट होते की झारपेक्षाही मेन्शेव्हिकांनाच लेनिन आपले कट्टर शत्रू मानत आहे हे दिसून आले. मार्तोव्हसारख्या मेन्शेव्हिकाने 'इस्क्रा' आपल्या हातून काढून घेतले याचा त्याला किती संताप आला होता हे 'प्रोलेटरियन'मधील लिखाणावरून दिसून येत होते. 'प्रोलेटरियन'चा कालांतराने पुन्हा 'इस्क्रा' होऊ नये

याची त्याने प्रारंभापासूनच खबरदारी घेतली होती. ' इस्क्रा 'च्या वेळी सर्व संपादक-मंडळाची दररोज बैठक भरून गरमागरम चर्चा व्हायची अन् त्या चर्चेच्या अनुरोधानेच पुढच्या अंकातील मजकुराचे स्वरूप ठरत असे. ' प्रोलेटरियन 'च्या बाबतीत लेनिनने ही चर्चेची प्रथाच बंद करून टाकली. ' प्रोलेटरियन 'चे संपादन करताना तो इतर संपादकांचा सल्ला घेत नसे. लेनिनने सांगावयाचे आणि इतर संपादकांनी बिनबोभाट ऐकावयाचे, असे या नव्या पत्राच्या लेखनाचे व संपादनाचे स्वरूप होते. लेनिन क्रपस्कायाला म्हणाला, " आता मी पूर्वीच्या निरर्थक चर्चा बंद केल्या आहेत. ज्यांना केवळ काम करण्याचीच इच्छा आहे, अशा सहकाऱ्यांना बरोबर घेऊन मी हा नवा खटाटोप करीत आहे. सर्व काही माझ्या तंत्रानुसार चालत असल्यामुळे माझा हा नवा खटाटोप यशस्वी होणार याबद्दल मला तिळमात्र संशय नाही. "

रशियातही या सुमारास अशा काही घटना घडल्या होत्या की त्यांमुळे आपले उद्दिष्ट अपेक्षेपेक्षाही अधिक लवकर साध्य होईल असे लेनिनला वाटू लागले. १९०४ च्या फेब्रुवारीमध्ये जपानशी युद्ध पुकारून झारशाहीने पहिली घोडचूक केली. जपानसारख्या छोटया राष्ट्रापुढे रशियन सेनेला माघार घ्यावी लागल्यामुळे झारशाहीच्या प्रतिष्ठेला पहिला तडा गेला. या एकतंत्री राजवटीबद्दल लोकांच्या मनात बऱ्याच दिवसांपासून असंतोष घुमसत होता ही गोष्ट खरी असली तरी या राजवटीबद्दल ब्र उच्चारण्याचे धाडस होत नव्हते. परंतु एका छोटया राष्ट्राने झारशाहीला जोरदार रट्टा लगावताच लोक उघडपणे या राजवटीविरुद्ध टीका करू लागले. रशियातील राजकीय पक्षांच्या दृष्टीने ही घटना महत्त्वाची होती. झारच्या राजवटीबद्दल जनतेच्या मनातील अप्रीतीला खतपाणी घालण्याची नामी संधी प्राप्त झाली आहे या जाणिवेने उदारमतवाद्यांपासून क्रांतिकारकांपर्यंत प्रत्येक गट झारशाहीबद्दलची लोकांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न करू लागला. १९०५ च्या जानेवारीमध्ये जपानने पोर्ट आर्थर ताब्यात घेतले. लागलीच लेनिनने लिहिले, ' या लाजिरवाण्या पराभवाला झारशाही जबाबदार आहे, रशियन जनता नव्हे ! उलट झारशाहीच्या या नामुष्कीमुळे रशियन जनतेची ताकद वाढली आहे. पोर्ट आर्थरचा पराभव हा झारशाहीच्या अंतिम पराभवाचा खचित प्रारंभ आहे.'

प्रोलेटरियन पत्र सुरू केले तेव्हा लेनिन चौतीस वर्षांचा होता. यापूर्वीची दहा वर्षे त्याने व्यावसायिक क्रांतिकारकांची संघटना उभारण्याच्या प्रयत्नात व्यतीत केली होती. थोरल्या भावाची फाशी, पीटर्सबर्गमधला तुरुंगवास, सैबेरियातील विजनवास आणि गेल्या चार वर्षांतील पश्चिम युरोपातील वास्तव्य, हा सारा कालखंड पूर्वतयारीत खर्ची पडला होता. आता त्याच्या विचारांना आणि कार्यपद्धतीला निश्चित

दिशा प्राप्त झाली होती. अंतिम उद्दिष्ट ठरले होते. मार्ग माहीत झाला होता, आता त्या मार्गावरची वाटचाल झपाट्याने कशी करता येईल एवढा एकच विचार सतत डोळ्यांसमोर तरळत होता. म्युनिक, ब्रुसेल्स, लंडन आणि जिनीव्हा या पश्चिम युरोपातील शहरांत काही दिवस काढले असल्यामुळे पश्चिम युरोप आणि रशिया यांच्या जमिनीत बराच फरक आहे हे त्याला कळून आले होते. पश्चिम युरोपमधील भूमीचा पोत वेगळा आणि रशियातील खडकाळ अन् भरड मातीची जात वेगळी हे त्याने अचूक हेरले. रशियातल्या इतर मार्क्सवाद्यांत आणि लेनिन-मध्ये हाच खरा फरक होता. रशियातील इतर मार्क्सवाद्यांना जर्मनी किंवा फ्रान्स येथील समाजवादी चळवळीचे आकर्षण असे. परंतु पश्चिम युरोपमध्ये चार वर्षे राहूनही लेनिन कोणत्याही अर्थाने 'युरोपियन' बनला नव्हता. इतर मार्क्सवादी पश्चिम युरोपमधील समाजवाद्यांची भाषा बोलत असत. परंतु रशियन कामगारांना इतर मार्क्सवाद्यांच्या भाषेपेक्षा लेनिनची भाषा अधिक जवळची वाटे. कारण ती संपूर्णपणे रशियन होती. प्लेखानोव्ह किंवा अॅक्सेलरॉड यांच्यासारखे तर्कपंडित जी भाषा बोलत आहेत ती रशियन जनतेला कळण्यासारखी नाही हे लेनिनला पक्के ठाऊक होते. झारशाही उलथून पडल्यानंतर रशियन भूमीत 'बोल्शेव्हिझम'चे रोपटेच मूळ धरू शकणार आहे यासंबंधी तो निःशंक होता.

पश्चिम युरोपमधील मार्क्सवादी विचारवंतांच्या सहवासात राहूनही क्रांति-कारकांच्या एकतंत्री हुकूमशाहीवरचा लेनिनचा विश्वास मुळीच कमी झाला नाही. उलट व्होल्गाच्या परिसरातल्या मातीला हुकूमशाहीच मानवणार आहे याचाच त्याला वारंवार साक्षात्कार होत होता. रशियन मार्क्सवाद्यांपैकी केवळ आपल्या एकट्यालाच हे 'रहस्य' उमगले आहे हेही तो जाणून होता. मेन्शेव्हिकांना तो मूर्ख समजत असे. क्रांतिकारकांची एकतंत्री संघटना उभारण्याच्या आपल्या प्रयत्नाला मेन्शेव्हिकांमुळे खीळ बसली म्हणून तो त्यांच्यावर अद्वातद्वा टीका करीत होता. प्लेखानोव्ह, अॅक्सेलरॉडसारखे विचारवंत क्रांतीला नीतीचा पाया असला पाहिजे असे जेव्हा प्रति-पादन करू लागत तेव्हा लेनिन त्यांच्याकडे पाहून हसायचा. तो म्हणायचा, "तुम्ही खुशाल नीति—अनीतीचा वाद घालत बसा. मी फक्त क्रांती जाणतो."

प्रोलेटरियनसारखे केवळ आपल्याच आग्रहाचा पुरस्कार करणारे पत्र हाती आल्या-नंतर लेनिनने इतरांशी तत्त्वचर्चा करण्याचे जवळ जवळ सोडूनच दिले. भोव-तालच्या एखाद्याने मतभिन्नता व्यक्त केली की तो भडकून उठायचा. 'तुम्हांला काय कळतंय! मी सांगतो तेवढं नीट ऐका! उगाच आपलं निर्बुद्ध डोकं शिणवू नका' असा एकंदर त्याच्या बोलण्याचालण्याचा रोख असे. आपला एखादा अंदाज चुकला तर त्याची इतर सहकाऱ्यांपाशी मनमोकळी कबुली देणेही त्यास मंजूर नव्हते. उलट तो सारवासारव करण्यासाठी म्हणायचा, 'क्रांतीच्या शत्रूंना फसविण्या-

साठी मी मुद्दामच तसे बोललो होतो.' बोल्शेव्हिक पक्षाचे कार्यकर्ते निवडतान मार्तोव्हसारखे स्वतंत्र प्रज्ञेचे लोक यात येणार नाहीत, याबाबत तो दक्ष असे.

१९०५ च्या प्रारंभी लेनिनच्या बोल्शेव्हिक पक्षात दाखल झालेला व्हॅलेंटिनोव्ह लिहितो, 'मी लेनिनला भेटलो तेव्हा तो अवघा चौतीस वर्षांचा होता. हा आपल्यापेक्षा वयाने लहान असला तरी त्याच्या बुद्धीची झेप अलौकिक आहे व म्हणून आपण त्याचेच ऐकले पाहिजे, अशी त्याच्या भोवतालच्या कार्यकर्त्यांची दृढ श्रद्धा होती. ते म्हणायचे, 'रशियन जनतेचे नेमके दुखणे काय आहे आणि ते कसे दूर करायचे याचे ज्ञान एकट्या लेनिनलाच आहे. इतर लोक खुशाल क्रांतीच्या गप्पा मारोत; परंतु क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य आणि कौशल्य एकट्या लेनिनजवळच आहे.'

स्वतः लेनिनला ही व्यक्तिपूजा आवडत होती की नाही हे सांगता येणे कठीण आहे. परंतु आपले जीवितकार्य यशस्वी रीतीने पार पाडावयाचे असेल तर आपले अनुयायी असेच अंधश्रद्धाळू असले पाहिजेत हे तो जाणून होता. लेपेशिन्स्कीने काढलेले एक व्यंगचित्र त्या वेळी बरेच गाजले होते. अवाढव्य शरीराचा लेनिन शांतपणे झोपला असून दहा-बारा उंदीर त्याच्याभोवती उगाच खडबडत आहेत असे ते व्यंगचित्र होते आणि उंदरांवर 'मेन्शेव्हिक' अशी अक्षरे लिहिलेली होती. लेनिनसंबंधी त्याच्या नव्या सहकाऱ्यांची भावना कोणती होती याचे हे एक उदाहरण आहे.

क्रांती यशस्वी होऊन सत्ता आपल्या हातात आली तर आपण कोणती राज्यपद्धती स्वीकारणार आहोत याचे लेनिनने क्रांतिपूर्व काळात विवेचन केलेले नाही. परंतु रशियाची सर्व सूत्रे हाती आल्यानंतर मात्र त्याने आपले खरे स्वरूप प्रकट करण्यास मुळीच हयगय केली नाही. १९२० मध्ये त्याने लिहिले आहे, 'समाजात भिन्न-भिन्न वर्ग असतात. या प्रत्येक वर्गावर एकेका पक्षाचे नियंत्रण असते. परंतु अखेरीस हे पक्षही काही विशिष्ट व्यक्तींच्या हातांतच असतात. त्यांना आपण पुढारी म्हणतो बस्स, ज्याला राजकारण करावयाचे आहे त्याला तेवढे माहीत असले की पुरे. समाजाला काय हवे आहे हे पुढारीच ठरवत असतात. काही समाजांना हुकूमशहाच मानवतो. एका व्यक्तीच्या हाती सर्व सत्ता सुपूर्द केल्याने समाजाचे सर्व प्रयत्न लवकर सुटू शकतात हे नाकारून कसे चालेल? सगळ्यांना समान अधिकार दिले पाहिजेत, ही भाषा धादांत खोटी आहे!'

परंतु ही झाली १९२० ची भाषा. १९०५ मध्ये असे बोलून चालणारे नव्हते एक गोष्ट मात्र खरी ती ही की १९०५ मध्ये लेनिन सर्वंकष हुकूमशाहीची भाषा बोलत नसला तरी त्याची पावले मात्र त्याच दिशेने पडत होती. सर्व सहकाऱ्यांनी केवळ आपल्याशीच निष्ठा बाळगली पाहिजे, असा त्याचा आग्रह असे आणि या अपेक्षित निष्ठेमध्ये कोणाकडून कसूर होत आहे असे दिसून येताच लेनिन किंचितही दयामया न दाखविता त्याला निष्प्रभ करून टाकी.

एकदा व्हॅलेंटिनोव्ह आणि लेनिन गप्पा मारत बसले असताना व्हॅलेंटिनोव्ह म्हणाला, 'आपण एका कार्यकर्त्याला पक्षकार्यासाठी रशियात जाण्याकरिता जे पैसे दिले होते ते त्याने येथेच एका वेश्येच्या घरी उधळून टाकले आणि त्यामुळे तो रशियात गेला नाही.

या तक्रारींवरचे लेनिनचे उत्तर मोठ मार्मिक होते.

'तू आतापर्यंत वेश्येकडे कधी गेला नसशील किंवा पक्षाचे पैसे घेऊन ते दारूबंदीवरही कधी खर्च केले नसशील; कारण तुला बाई किंवा बाटली या दोन्हींचाही नाद नाही, हे मला माहीत आहे. परंतु बाईबाटलीवर पक्षाचे पैसे खर्च करण्यापेक्षा अधिक गंभीर स्वरूपाची दुष्कृत्ये तू करू शकशील हेही मला माहीत आहे. कधी तरी तुझ्या हातून मेन्शेव्हिकांशी लगट करण्याचे पाप घडू शकेल. कदाचित तू बुर्झ्वा लोकांशी संगनमत करून माखसारख्या जडवादाच्या शत्रूचे गोडवे गाऊ लागशील. बुल्गाखोव्हच्या तथाकथित 'सत्यशोधक' प्रयोगाची तारीफ करण्याची तुला लहर येऊ शकेल. या असल्या वैचारिक व्यभिचारापेक्षा तो शारीरिक व्यभिचार परवडला! कारण त्याने पक्षकार्याची हानी तरी होत नाही. तुमच्या बौद्धिक व्यभिचारामुळे कामगारवर्गाची वर्गलढ्याची श्रद्धा उडण्याचा धोका असतो. तुम्ही मार्क्सवादाचे केव्हा शत्रू व्हाल हे सांगता येत नाही. उलट, तो कार्यकर्ता सच्चा क्रांतिकारक आहे. कालही तो माझा सहकारी होता. आजही आहे आणि उद्याही राहणार आहे, हे मला पक्के ठाऊक आहे. माझ्या दृष्टीने हीच गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. अन् म्हणूनच शारीरिक व्याभिचार करणाऱ्यांकडे मी सहज दुर्लक्ष करू शकतो. परंतु तुझ्यासारख्याचा बौद्धिक व्याभिचार मला मुळासकट खणून काढावासा वाटतो. मार्क्सवादावर टीका करणारे लोक मला महारोग्यांपेक्षाही अधिक तिरस्कारार्ह वाटतात. मी अशा लोकांशी साधे हस्तांदोलनही करू शकणार नाही. असल्या घातकी लोकांबरोबर मी जेवायला बसलो तर मला एक घासदेखील जाणार नाही.'

१९०३ च्या जुलैमध्ये किएव्ह शहरात कामगारांनी जोरदार निदर्शने केली होती. व्हॅलेंटिनोव्हनेही त्यात भाग घेतला होता.त्यामुळे मधून मधून या अशा निदर्शनांबाबतही त्याची व लेनिनची चर्चा होई. असाच एकदा कामगारांच्या निदर्शनाचा विषय निघाला असताना लेनिन म्हणाला, "अशा तुरळक निदर्शनाचा काळ आता इतिहासजमा झालेला आहे. कोणीही उठावे. हातात लाल बावटा घेऊन झार-

शाहीच्या धिक्काराच्या घोषणा कराव्यात आणि पोलिसांनी त्यांना झोडपून काढावे हा प्रकारच मला मंजूर नाही. आता सर्व कामगारांनी एकत्र येऊन झारशाहीविरुद्ध उभे राहिले पाहिजे. झार आणि त्याचा गोतावळा यांना नष्ट करण्याची ताकद उभी केली पाहिजे. झारशाहीच्या हस्तकाला एकएक ठोसा मारताना त्याचा हिशेब सांगितला पाहिजे– हा पहिला ठोसा कामगारांवर हल्ला केल्याबद्दल, हा दुसरा शेतकऱ्यांना मारहाण केली म्हणून, तिसरा विद्यार्थ्यांवर दंडुका उगारला म्हणून. केवळ चार गोंडस शब्द बोलून क्रांती होत नसते. क्रांती करावयाची असेल तर वाटेत जे जे आडवे येईल ते ते कापून टाकण्याचा निर्धार असावा लागतो. तशा निर्धाराला साजेशी कृती व्हावी लागते. खरेच सांगतो, मला आता या बैठकी, चर्चा, विचारविनिमय यांचा अगदी कंटाळा आला आहे. कामगारवर्गाच्या एकजुटीची मूठ शक्तिशाली कशी होईल याचाच फक्त मी विचार करीत असतो. फक्त कोणाशी झुंज घ्यायची आहे याची आपल्या मनात पक्की खूणगाठ हवी.'

आपली मूठ आवळत आणि ती टेबलावर आपटत लेनिन म्हणाला, "आता ही मूठ हेच आमचे प्रतीक. झारशाहीला जमीनदोस्त करण्याचे सामर्थ्य या मुठीत आहे."

लेनिनची विचारसरणी ही अशी व्यावहारिक क्रांतिकारकांची होती. त्याची ही 'मुठी'ची भाषा प्लेखानोव्ह-मार्तोव्हसारख्यांना समजण्यासारखी नव्हती.

तो व्हॅलेंटिनोव्हला म्हणाला, "कर्मठ मार्क्सवाद्यांना फेरविचार करण्याची गरजच भासत नाही. कारण मार्क्सने सनातन सत्यच सांगितले आहे. त्याने दाखवून दिलेला वस्तुनिष्ठ मार्ग आपण आचरला तरच आपण आपले उद्दिष्ट गाठू शकू. इतर मार्ग अवलंबले तर केवळ तात्त्विक मायाजालात फसण्याविना हाती काहीच येणार नाही. मार्क्सचे तत्त्वज्ञान म्हणजे पोलादी पहार आहे. सर्व शत्रूंचा चक्काचूर करण्याचे सामर्थ्य या एका पोलादी पहारीत सामावलेले आहे."

कामगार वर्गाची शक्तिशाली मूठ आणि कर्मठ मार्क्सवाद्यांची पोलादी पहार ही दोन शस्त्रे घेऊन लेनिनला क्रांतीच्या समरांगणावर उभे ठाकावयाचे होते.

सोशल डेमोक्रॅटिक पक्षातील वैचारिक संघर्ष शिगेला पोचलेला असताना रशियात सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पार्टी नावाचा नवा पक्ष उदयास आला होता. कॅथेरीन ब्रेशोव्हस्की, मिखाइल गोट्झ, ग्रेगरी गेरशुनी, व्हिक्टर चेस्लॅव्ह आदी जहाल क्रांतिकारक प्रवृत्तीच्या तरुणांनी हा पक्ष उभारला होता. 'जनतेच्छा' या जुन्या क्रांतिसंघटनेचा जणू वारसा घेऊनच ही मंडळी राजकारणाच्या आखाड्यात उतरली होती. दहशतवादावर श्रद्धा असणाऱ्या या तरुणांनी अनेक सरकारी अधिकाऱ्यांचे खून केले होते आणि त्यापायी शिक्षाही भोगल्या होत्या. सत्ताधारी वर्ग नष्ट करावयाचा असेल तर उग्र शस्त्राचार हाच काय तो एकमेव मार्ग आहे, अशा

श्रद्धेने हे तरुण संघटित झालेले होते. आपल्या या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पार्टी जिनीव्हाहून एक साप्ताहिकही प्रसिद्ध करीत असे. त्याचप्रमाणे रशियातल्या बेचाळीस प्रांतांत अनेक ठिकाणी गुप्त छापखाने सुरू करून त्यांकरवी शस्त्राचाराचा प्रचार करणारे वाङ्मय तरुणांत व कामगारांत वाटले जाई.

सोशल डेमोक्रॅटिक पक्ष आणि सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पार्टी यांच्या विचारसरणींत खूपच फरक होता. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पार्टीवर मार्क्सवादापेक्षा हेर्झेन, लाव्हरोव्ह आणि मिखाइलोव्हस्की यांच्या दहशतवादाचा प्रभाव होता. आर्थिक कार्यक्रमाबाबतही या दोन पक्षांतील मतभेद मूलगामी होता. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला वर्गलढा तीव्र करावयाचा होता तर रेव्होल्यूशनरी पक्षाला उत्पादक आणि ग्राहक यांचे सहकार्य अपेक्षित होते. शिवाय क्रांतीमागे केवळ कामगारवर्गावर भिस्त ठेवण्याची मार्क्सवाद्यांची भूमिकाही या क्रांतिकारकांना मंजूर नव्हती. त्यांना हवी होती ती राष्ट्रीय स्वरूपाची क्रांती. म्हणजे या क्रांतीत श्रमिक जनतेवरच बुद्धिजीवी वर्गालाही समाविष्ट करून घेतले पाहिजे असे त्यांचे मत होते. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचा असा ठाम सिद्धान्त होता की, समाजाला जशी शेतकरी व कामगार यांची गरज आहे तशीच लेखक आणि शास्त्रज्ञ यांचीही आवश्यकता आहे. केवळ श्रमिक जनता म्हणजे समाज हा मार्क्सवाद्यांचा आग्रह त्यांना मान्य नव्हता. समाजातील श्रमजीवी आणि बुद्धिजीवी वर्गांचे ऐक्य प्रस्थापित केले पाहिजे असे ते प्रतिपादन करीत. श्रमांची प्रतिष्ठा ते मान्य करीत होते. परंतु त्याबरोबरच बुद्धिजीवी वर्गांच्या वैचारिक स्वातंत्र्याची बूज राखली पाहिजे असाही त्यांचा आग्रह असे. वैचारिक स्वातंत्र्याशिवाय समाजवाद म्हणजे सर्व समाजाचे एका साचेबंद ठोकळ्यात रूपांतर करण्यासारखे आहे असा त्यांचा आक्षेप होता.सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचा सरकारी समाजवादासही विरोध होता. त्यांचे म्हणणे असे होते की सर्वच उद्योगधंद्यांचे सरकारीकरण केले की हाती येणारी सर्वंकष आर्थिक सत्ता नोकरशाही आपल्या स्वार्थासाठी राबवील व पुन्हा लोकांची निराळ्या पद्धतीने पिळवणूक सुरू होईल.

सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचे हे ध्येय धोरण अर्थातच सोशल डेमोक्रॅट्सना मंजूर होण्यासारखे नव्हते. त्यांना कामगारवर्गाशिवाय दुसरे काही सुचतच नव्हते. मार्क्सवादाची त्यांच्या मनावर एवढी पकड पडली होती की इतर तत्त्वज्ञानेही मानवजातीच्या हिताचा विचार करू शकतात, ही वस्तुस्थिती ते मान्यच करीत नसत. ठोकळेबाज आणि साचेबंद मार्क्सवादातील उणिवा दाखविण्याचा कोणी प्रयत्न केला की हे सोशल डेमोक्रॅट्स त्याला ' बुर्झ्वा ' ही लाडकी शिवी देऊन मोकळे होत व समाजाच्या हिताचा मक्ता फक्त आपल्यालाच दिला आहे अशा धुंदीत वावरत.

या दोन क्रांतिकारी प्रवृत्तींच्या पक्षांव्यतिरिक्त इतरही अनेक पक्ष त्या वेळी अस्तित्वात होते. रशियात लोकशाहीप्रधान प्रजासत्ताकाची स्थापना व्हावी आणि या प्रजासत्ताकाची राज्यघटना निश्चित करण्यासाठी घटनासमिती बोलावण्यात

यावी, अशी या पक्षांची मुख्य मागणी होती. लोकशाहीप्रधान प्रजासत्ताकात व्यक्ति-स्वातंत्र्याचे मूलभूत तत्त्व अंतर्भूत होणार असल्यामुळे सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाने या मागणीचा पाठपुरावा केला.

समाजवादी पक्षांप्रमाणेच उदारमतवादी पक्षही घटनासमितीची मागणी करीत होते. या उदारमतवादी पक्षांत प्रामुख्याने मध्यमवर्गीयांचा भरणा होता. राजसत्तेने लोकांचा आवाज ऐकला पाहिजे, अशा आशयाची निवेदने हे उदारमतवादी पक्ष वारंवार झारकडे धाडत असत. परंतु झारने स्वतः विचार करण्याचे केव्हाच सोडून दिले होते. पोबेडोनोस्तसेव्ह या आपल्या सल्लागारावर झारची सारी भिस्त असे आणि हा पोबेडोनोस्तसेव्ह कमालीचा जुलमी होता. ठिकठिकाणच्या प्रांतिक विधिसभांची मुस्कटदाबी करून लोकमताचा आवाज झारच्या कानांपर्यंत पोचू नये यासाठी त्याची खटपट चालू होती. लोकांत फूट पाडण्यासाठी त्याने वांशिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांचा पद्धतशीर छळ सुरू केला. पोबेडोनोस्तसेव्हच्या या दडपशाहीविरुद्ध लोकमत संघटित करण्यासाठी सर्व उदारमतवादी पक्षांनी १९०३ मध्ये यूनियन ऑफ लिबरेशन ही आपली प्रातिनिधिक संघटना स्थापन केली. या संघटनेच्या वतीने जिनीव्हा येथून पीटर स्ट्रूव्हच्या संपादकत्वाखाली एक साप्ताहिक पत्र सुरू करण्यात आले. या पत्राच्या प्रतीही रशियात फार मोठ्या प्रमाणावर वाटल्या जाऊ लागल्या.

जपानबरोबरच्या लढाईत रशियन सेनेचा पराभव होताच आतापर्यंत दबून बसलेला लोकमानसातील असंतोष उसळ्या मारू लागला. त्यातच फॉन प्लेव्ह या गृहमंत्र्यांचा खून झाला. तत्काळ झारशाहीविरुद्धच्या निदर्शनांना नवा जोर चढला. गृहमंत्र्याचा खून होताच झारही थोडा भानावर आला. लोकांचा प्रस्थापित राजसत्ते-विरुद्धचा असंतोष कमी करण्यासाठी त्याने स्विआटोपोल्क-मिर्स्की या किंचित उदार-मतवादी गृहस्थाची गृहमंत्रिपदावर नियुक्ती केली. त्याचप्रमाणे आपण लवकरच घटनात्मक सुधारणा करणार आहोत, अशीही घोषणा केली. आपल्या मागण्या नेटाने पुढे मांडण्याची आता वेळ आलेली आहे हे ओळखून प्रांतिक विधिसभांच्या प्रति-निधींनी १९०४ च्या नोव्हेंबरमध्ये पीटर्सबर्ग येथे विराट मेळावा भरवून, जनतेला भाषणस्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य मिळाले पाहिजे, सर्व नागरिकांना समान अधिकार दिला गेला पाहिजे व राज्यघटना तयार करण्यासाठी त्वरित घटनासमिती बोलावली पाहिजे, अशा तीन प्रमुख मागण्या झारच्या कानांवर घातल्या. इतर राजकीय पक्षांनीही आपापले मेळावे भरवून घटनासमितीच्या मागणीचा जोरदार पाठपुरावा केला.

सर्वच बाजूंनी लोकक्षोभाचा वणवा पेटला असताना व काहीतरी आश्वासने देऊन हा वणवा शांत करण्याचे झारच्या सल्लागारांचे प्रयत्न चालू असतानाच या राजकीय चळवळीपासून कामगारवर्गाला दूर खेचण्यासाठी झारशाहीचे हस्तक निराळा डाव खेळू लागले. त्यांनी कामगारांना आर्थिक अधिकार मिळवून देण्याचा देखावा

करण्यासाठी युनियन ऑफ रशियन वर्कर्स ही संघटना स्थापन केली. या संघटनेत दाखल होणाऱ्या कामगाराला झारशी राजनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागे. फादर गॅपन नावाच्या धर्मोपदेशकाला या कामगार संघटनेचे सूत्रधार नेमले. त्यामुळे कामगारहिताचे व औदार्याचे नाटक तर चांगले रंगविण्यात आले. परंतु इतर पक्षांनी या नव्या कामगारसंघटनेचे वास्तव स्वरूप काय आहे हे पटवून दिल्यानंतर कामगार-वर्ग फादर गॅपनच्या पायघोळ आवरणापासून दूर झाला.

२२ जानेवारी १९०५ रोजी या युनियनच्या कामगारांनी झारला आपले निवेदन सादर करण्यासाठी विंटर पॅलेसच्या रोखाने मिरवणूक काढली. पीटर्सबर्गमधले हजारो कामगार आपल्या बायका-मुलांसमवेत या मिरवणुकीत सहभागी झालेले होते. या कामगारांच्या हातात नुसते फलक होते. झार किंवा त्याचे मंत्री आपले म्हणणे ऐकून घेतील अशी या कामगारांना आशा वाटत होती. परंतु मिरवणूक राजवाड्या-बाहेरच्या चौकात येताच सैनिकांनी ती अडविली. ही मिरवणूक टॉइस्की पुलाजवळ येताच आदल्या दिवसापासून तयार असलेल्या सैनिकांनी कामगारांवर सैतानी गोळी-बार केला. झार राजवटीचे हे अनपेक्षित स्वरूप पाहताच कामगार पळू लागले. तरीही सैनिकांचा गोळीबार चालूच होता. त्यांच्या या बेबंद गोळीबारात सत्तर कामगार जागच्या जागी ठार झाले. जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या कामगारांची संख्या तर फारच मोठी होती. निःशस्त्र कामगारांच्या अर्जाला झार राजवटीने बंदुकीच्या गोळ्यांनी उत्तर दिले होते!

या हत्याकांडाने लोकांचा झारशाहीवरचा संपूर्ण विश्वास ढासळून पडला. २२ जानेवारी १९०५ हा दिवस 'काळा रविवार' म्हणून ओळखला जाऊ लागला. पीटर्सबर्गमधल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ठिकठिकाणी कामगारांनी संपाचे हत्यार उपसले. झारशाहीचे हे जनताद्रोही स्वरूप पुन्हा एकदा दृष्टीला पडताच सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष स्वस्थ बसला असता तरच नवल! महिनाभराच्या आतच मॉस्कोचा गव्हर्नर जनरल ग्रँड ड्यूक सर्जेइ याचा कॅलिएव्ह नावाच्या क्रांति-कारकाने खून करून निपराध कामगारांच्या रक्ताचा बदला घेतला.

कॅलिएव्हला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. शिक्षा ऐकल्यानंतर तो न्याया-धीशांना उद्देशून म्हणाला, 'तुम्ही मला नष्ट करू शकता. पण ज्या पिढीचा मी प्रतिनिधी आहे ती पिढी तुमची सैतानी झारशाही नष्ट केल्यावाचून स्वस्थ बसणार नाही हे लक्षात ठेवा. लवकरच क्रांतीचा वणवा पेटणार आहे. तत्पूर्वी तुम्ही जागे झालात तर ठीकच. नाहीतर हा वणवा झारशाहीची राख करील. आणि त्याबरोबर तुमचीही!'

(क्रमशः)

# स्वातंत्र्यवीर सावरकर

## अवघे तेजोमय जाहले !

पुस्तके

चरित्र हा वाङमयप्रकारच काहीसा वेगळ्या प्रकारचा आहे. चरित्रविषय, चरित्रकार आणि चरित्रलेखन या तिन्हींचे परस्परांवरील परिणाम एकत्र होऊन ते वाङमय आकार घेते. विषय आणि विषयिन्, Subject आणि Form यांची एक नाजूक गुंतागुंत आपोआप बनत जाते. म्हटला तर पूर्ण वस्तुनिष्ठ, पण आत्मानुभूतीच्या गवाक्षातून येणारा असा हा वाङमय-प्रकार चरित्रकाराच्या चरित्रविषया-बद्दलच्या भावना, त्याच्या मनातील आदर अथवा अनादर, काही पूर्वग्रह आणि व्यक्तिगत आवडीनिवडी यांचा चरित्रावर आपोआप परिणाम होत जातो. आणि मग कुठे 'ज्योतिने तेजाची आरती' घडते तर कधी क्षितिजाची लांबी फूटपट्टीने मोजायला निघाल्याप्रमाणे चरित्रकाराची स्थिती झालेली दिसते.

प्रस्तुत चरित्रात वेगळाच अनुभव आला. येथे चरित्रविषयाचे माहात्म्य इतके तेजस्वी आहे, कर्तृत्व इतके प्रज्वलित आहे की चंडरश्मीच्या मृणालतंतूंहूनही सूक्ष्म किरणाचा स्पर्श होताच अवघे ब्रह्मांड उजळून निघावे त्याप्रमाणे त्या माहात्म्याने कर्तृत्वाने, असामान्यतेने 'अवघे तेजोमय जाहले' आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे



## नि शि कां त मि र ज क र

सारे जीवन म्हणजे मूर्तिमंत तेजोमयतेचा महायज्ञ होता. त्यांचे विचार, आचार आणि उच्चार यांमध्ये धगधगीत तेजाखेरीज दुसरे काहीही आढळणार नाही. अशा ओजस्वितेचा स्पर्श झाल्यामुळे मुळातच त्यांचे चरित्र हे मानवी अस्मितेचे चिरंतन शिल्प ठरले आहे. कुणीही कसेही ते गावे. त्यातली स्फूर्तिप्रदता सदैव अव्याहतच राहणार. दुर्बळातल्या दुर्बळ लेखणीला कर्तृत्वाचे गोवर्धन उचलावयास लावणे हे त्या प्रकाण्डज्वालेचेच स्फुरण आहे. मग श्री. वाळिंब्यांची लेखणी तर चांगली मुरलेली. 'इतिहासाचे सातवे सोनेरी पान ' रेखाटून आलेली. तिच्या सान्निध्याने ज्योतीला ज्योत मिळावी त्याप्रमाणे मूळचाच तेजस्वी असणारा हा चरित्रविषय आणखी झळाळून उठला आहे. 'अवघे तेजोमय जाहले ' आहे.

अर्थात् एका मर्यादित अर्थानेच श्री. वाळिंबे यांनी हे केले आहे. स्वातंत्र्यवीरांच्या कार्याचे मूलगामी विश्लेषण त्यांनी केलेले नाही; त्यांच्या मतप्रणालीची साधार सुधड चर्चा केलेली नाही; ठिकठिकाणच्या त्यांच्या भावना नि विचारप्रवाह त्यांनी भडक रंगांनी चितारलेले नाहीत. त्यांनी नुसते स्वातंत्र्यवीरांचे चरित्र सांगितले आहे. घडले तसे सुसंगतपणे सांगितलेले आहे. पण असे करताना आपल्या वस्तुनिष्ठ निवेदनपद्धतीला त्यांनी असा नेमका मार्ग आखून दिला आहे की त्या प्रतापसूर्याचे समग्र नि साग्र दर्शन नसले तरी त्याच्या तेजोवलयाचे अगदी रेखीव चित्रण यात घडले आहे. सावरकरांच्या भाषणातील, लेखनातील व कवितांतील अनेक उतारे यासाठी त्यांनी जागोजाग दिले आहेत. त्यामुळे या माहात्म्याच्या जीवनपटाच्या घटनात्मक बाह्य चित्रणाबरोबर त्याच्या अंत:स्फूर्तीचा वैचारिक आणि भावनिक आलेखही संगतवार काढलेला आढळतो.

"मारिता मारिता मरेतो झुंजेन " हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनाचा महामंत्र होता. त्यांचे सारे जीवन याच एका कैफात गेले. बाकी कशाचीही अपेक्षा त्यांनी केली नाही. फार काय, भारताच्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे दर्शन आपल्याला घडेल, भारताचा स्वातंत्र्यदिन आपल्याला पाहता येईल या भाग्याचीही त्यांनी कधीच अपेक्षा केली नाही. फक्त तो दिवस कधीतरी उजाडावा आणि आपल्यामुळे तो उजाडण्याचा समय काही क्षणांनी जवळ यावा म्हणून सर्वस्वाचे बलिदान करणे हे

त्यांनी आपले कर्तव्य मानले होते. त्यांचे स्वप्न ध्येयस्फूर्तीचा कळस बनण्याचे नव्हते. ध्येयप्राप्तीच्या यज्ञातील समिधा बनण्याचे होते. समिधा बनणे अती कठिण असते. त्याग, सर्वस्वाचा त्याग, आणि केवळ त्यागच त्यासाठी अंगी संचारावा लागतो. सावरकरांचे वेड ते होते. "बाष्पयंत्रात प्रेरणा उत्पन्न होण्यासाठी आपल्या देहास इंधन करून जर कोणी जळत राहणेच असेल तर मग ते आपणच का राहू नये ? असले नुसते जळत राहणे कर्मच आहे, इतकेच नव्हे पण महत्कर्म आहे," असा त्यांचा विश्वास होता. याच दुर्दम्य विश्वासामुळे आणि जाज्वल्य महत्त्वाकांक्षेमुळे अंदमानची जन्मठेप त्यांनी निर्धाराने सोसली. "ही संकटे सोसणे आणि असे कारागारात सडत कोणालाही न कळत, ज्यांच्यासाठी हे कष्ट भोगले त्यांचेही शिव्याशाप खात असे मरणे हेच आता आपल्या आयुष्याचे ध्येय; तितकेच महान् की जितके बाहेर राहून कीर्तीच्या आणि दुंदुभीच्या तालावर नाचत राहणे महान् समजले जाते. कारण अंतिम विजयास ते ज्ञात झुंजणे आणि ते बंदुकीचे निनाद जितके अवश्य असतात तितकेच हे भुयारातील अश्रूंत कण्हणे आणि अज्ञात प्राणोत्क्रमणेही अवश्यच असतात." ही त्यांची बेडर विचारसरणी. नाना हालअपेष्टा सोसत देहदंड भोगतानाही मनात अचल असलेला हा निर्धार ! खरोखर, हा लौकिक पुरुष नव्हता. भगवद्गीतेच्या कर्मयोग्याचे हे मूर्तिमंत उदाहरण होते.

## कसलेली लेखणी

अशा ज्वलंत व्यक्तिमत्त्वाला शब्दबद्ध करणे हेच मुळी दुर्घट. त्याच्या साऱ्या जीवनपटाची वाटचाल ग्रथित करून त्याच्या कर्तृत्वाची उंची दाखविणे ही तर त्याच्याही पलीकडची गोष्ट. परंतु या पुस्तकाच्या आवाक्यापुरती तरी श्री. वाळिंब्यांना साधली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे तेजःपुंज दर्शन घडविण्यात मात्र ते पूर्ण यशस्वी ठरले आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही. बालपणापासून सावरकरांच्या मनीमानसी धगधगणारी स्वातंत्र्यप्रेरणा, वासुदेव बळवंत नि चाफेकर यांच्या बलिदानामुळे तिची झालेली पेटती ज्वाला, 'अभिनव भारत' संघटनेच्या रूपाने त्या ज्वालेतून भडकलेला स्वातंत्र्ययज्ञ आणि अखेर कर्मयोग्याच्या निराशय तृप्तीमध्येच त्या ज्वालेने केलेले आत्मसमर्पण या साऱ्या वृत्तांताचे धावते, पण समग्र विवेचन श्री. वाळिंब्यांनी केलेले आहे. सावरकरांची स्वातंत्र्यलालसा, त्यांचा आत्मयज्ञ, त्यांचे हिंदुसंघटन आणि त्यांचे दूरगामी द्रष्टेपण या साऱ्यांवर त्यांनी पूर्ण प्रकाशझोत टाकला आहे. वसुधेची उदारता नि आकाशाची भव्यता यांचा संगम साधणाऱ्या त्या महान् व्यक्तिमत्त्वाच्या चरणी त्यांनी आपल्या लेखणीचा हा नजराणा अर्पण केला आहे.

मघाशी म्हटल्याप्रमाणे श्री. वाळिंब्यांची लेखणी कसलेली आहे, कुशल आहे, पण ती कधी भावनेने खवळून जात नाही. अनावर झाले म्हणून लिहिले गेले असा प्रकार त्यांच्या लेखणीचा बहुधा नसतो. परंतु जे लिहावयाचे ते ती समरसून लिहिते.

त्यामुळे भावनेचा खळबळाट नसला तरी एकप्रकारचे नेटकेपण, ओघ, सुघडपणा त्यांच्या लेखनात जाणवतो. त्यामुळे सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे हे चरित्रलेखन आत्मनिष्ठेच्या गवाक्षातून आलेले असले तरी वस्तुनिष्ठतेवरील त्यांची नजर कुठेच ढळलेली नाही. अनलंकृत ओघवत्या भाषेतले हे निवेदन त्यामुळेच या पुस्तकाच्या मर्यादेत आटोपू शकले. अन्यथा भाववृत्तीच्या स्वैर आंदोलनाला वाव दिला गेला असता तर तिच्या एककेंद्रिक वर्तुळांचा विस्तार कुठल्या कुठे पोहोचला असता !

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे या तऱ्हेचे चरित्र उपलब्ध नव्हतेच. मराठीच्या संसारातली ती एक उणीवच होती. श्री. वाळिंबे यांच्या या पूर्ण झालेल्या संकल्पाने ती उणीव भरून निघालेली आहे. आयुष्यभर निरपेक्ष वृत्तीने आत्मसमर्पण करून अनंताच्या महाशिल्पाचा एक चिरा शिल्पिणाऱ्या माहात्म्याचे मराठीने हे अंशतः फेडलेले ऋण आहे.

**[ स्वातंत्र्यवीर सावरकर : वि. स. वाळिंबे : केसरी प्रकाशन : मूल्य सहा रुपये ]**

## □ आकर्षक नवलकथा

विज्ञानाने आता इतकी प्रगती केली आहे की, सर्वसामान्य लोकांच्या मनातही त्याच्याविषयी कुतूहल निर्माण व्हावे. चित्रसृष्टीच्या आकर्षणापायी रसिकांना चित्रपट–कलावंतांचे खासगी जीवनाविषयी जसे औत्सुक्य असते तसे या विज्ञान-युगातील माणसाला विज्ञानाविषयी–वैज्ञानिकांविषयी उत्सुकता वाटत असते. आणि ते साहजिकच आहे. कलावंताइतकेच किंबहुना, अधिकच शास्त्रज्ञ विक्षिप्त, लहरी असतात. लोकांची ही उत्सुकता जाणून श्री. रमेश के. सहस्रबुद्धे यांनी जगातील निरनिराळ्या शास्त्रज्ञांच्या जीवनातील वैचित्र्य आणि शोधातील वैशिष्टय यांनी विनटलेल्या ५१ कथा आपल्या ' शास्त्रीय जगातील नवलकथा ' या पुस्तकात संक-लित केल्या आहेत. यापूर्वी या कथा ' नवशक्ती ', ' नवल ', ' अमृत ' ' वसंत ' आदी नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

या संग्रहातील बहुतेक सर्वच कथा माहितीपूर्ण नि मनोरंजक आहेत. विशेषतः, न्यूटन, मार्कोनी, मेंडले, आर्किमिडीज, विल्यम ग्रीन, एडिसन, आईनस्टाइन इत्यादी शास्त्रज्ञांच्या आगळ्यावेगळ्या नवलकथा सुंदरच आहेत. त्यात विज्ञान, रसायन, खगोल, शरीरशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र या सर्व विज्ञानाच्या शाखांचे सुंदर मिश्रण आहे.

श्री. सहस्रबुद्धे यांची भाषाशैली आकर्षक असून कथा छोटया छोटया असल्या-मुळे सर्वसामान्य वाचकांतही त्या लोकप्रिय व्हाव्यात. विज्ञानाविषयी त्यांच्या मनात गोडी निर्माण व्हावी. संदर्भाच्या दृष्टीनेही त्याचा चांगला उपयोग व्हावा.

**हिदायतखान**

**[ प्रकाशक : लाखाणी बुक डेपो, मुंबई ४, मूल्य : दोन रुपये. ]**



# पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

रायगडावरील राजवाड्यात देव्हाऱ्यापुढच्या नक्षीदार चौरंगावर पत्रपुष्पांच्या राशीखाली भवानी तलवारीचं पातं जवळ जवळ झाकून गेलं होतं. चौरंगाच्या चारही कोनांशी चार समया तेवत होत्या.

महाराजांनी भवानीच्या चौरंगाला स्पर्श केला. तोंडाने 'जय जगदंब जगदंब!' असा अस्फुट नामोच्चार करीत त्यांनी तलवारीला पाच वेळा मुजरा केला आणि तिच्या रत्नजडित सोनेरी मुठीत आपला उजवा हात घालून त्यांनी ती अलगद उचलली. तिचं दुधारी पातं फुलांच्या राशीतून बाहेर पडलं. पात्यावरून फुलं, बिल्वपत्रं आणि हळदकुंकू चौरंगावर घरंगळलं अन् भवानीचं ते लखलखीत पान समयांच्या उजेडात झळ्ळकन् तेजाळून गेलं. महाराजांनी डोळे मिटून आपलं मस्तक लवविलं आणि भवानीच्या पात्यावर टेकविलं. क्षणभर ते तसेच अचल राहिले आणि गंभीर स्वरात उद्गारले,

"जय असुरमर्दिनी! जय भवानी!"

त्याच क्षणी राजवाड्याच्या महादरवाजावर

# कोजागिरीची रात्र

भालदार-चोपदारांनी आपल्या हातातील सोन्याचे दंड उंचावीत ललकारी दिली,

" सिंहासनाधीश्वर क्षत्रियकुलावतंस राजा शिवछत्रपति-महाराऽऽऽज ! "

आणि एकदम नगारे, चौघडे, शहाजणे आणि कर्णे वाजू लागले. शिंगांच्या ललकाऱ्या शिरारल्या. हत्तीवरची साहेबनौबत दण् दण् दणाणू लागली. भगव्या झेंड्याच्या हत्तीने सोंड उंचावून सलामी दिली आणि शिवाजीमहाराजांचा खासा हत्ती छत्रचामरांनिशी झुलत झुलत राजवाड्यातून बाहेर पडला. हुजुरातीची फौज मुजऱ्याकरिता झुकली. उजवा हात किंचित् वर उचलून महाराजांनी हत्तीवरून सर्वांचा मुजरा घेतला.

टापा आपटीत घोडदळ चालू लागलं. राजचिन्हांचा संभार हत्तीच्या पुढं निघाला. अष्टप्रधानमंडळ आणि सरदार-दरकदार मानापानाने चालू लागले. बंदुकीच्या फैरी झडू लागल्या. महाराज शिवछत्रपतींची स्वारी दसऱ्याच्या शिलंगणासाठी निघाली. जय-जयकारांनी आणि रणवाद्यांनी रायगड दुमदुमून गेला. पुढे राजसभेपुढच्या दरवाजापुढून ढालगज पुढे निघताच सलामीच्या तोफांची गडाच्या बुरुजांवरून सरबत्ती सुरू झाली. धडाड धुम ! धडाड धुम ! धडाड धुम !

तोफांचे आवाज गडाभवतीच्या दऱ्याखोऱ्यांत कडाडून घुमू लागले आणि गडाखालच्या वाडीतल्या शेरडाकरडांनी अन् गाई-वासरांनी दचकन् दचकून कान टवकारले. कोवळ्या वासरांनी शेपट्या उंचावून चार पायांवर ताड् ताड् उड्या मारायला सुरु-वात केली.

तोफांचा दणका ऐकला अन् ओले हात पदराच्या टोकाला पुसत पुसत हिरा घरातून अंगणात आली. तिचं लक्ष गडाकडे गेलं. उंच उंच रायगड आभाळाला टेकला होता. बुरुजांवरून तोफा कडाडत होत्या. हिराला इतक्या खालून त्या तोफाही दिसत नव्हत्या अन् त्या उडविणारी माणसंही दिसत नव्हती. फक्त आवाज ऐकू येत होता अन् आवाजामागोमाग उसळणारा धूर दिसत होता. मग तिला आठवलं. आज दसरा.

गडावर राजाचा दसरा गरजतोय. ती तशीच गोठ्याच्या खांबाला टेकून गडाकडे बघत राहिली. तिचं मन हरकून गेलं. भवती वासरं आणि करडं टणाटण उड्या मारीत होती. हिराला त्याचं भान नव्हतं. तिचं मन गडावर धावत होतं. महाराजांच्या स्वारीचा थाट बघायला पैठणी नेसून, नाकात सरजाची नथ घालून पायांत तोडे घालून तिचं मन गडावरच्या राजरस्त्याकडे धावत होतं. कशी असेल दसऱ्याची स्वारी ? कसा असेल थाट ? कसा असेल बाजारहाट ? कसा असेल राजाचा वाडाहुडा ? राजाच्या राण्या ? राजाचा संसार ? हिराला वाटलं बघावं एकदा हे सारं डोळे भरून. राजाच्या रायगडापायथ्याचं आपल्याला सासर लाभलं. गड आपल्या अंगणात ऐरावतासारखा उभा ! पण अजून ह्या ऐरावतावरची अंबारी आपण देखली नाही. माहेरच्या मैतरणींनी पुसलं जर, 'राजाचा गड बाई कसा ते सांग तरी,' तर काय बाई सांगायचं ?

हिराला वाटलं अस्संच गडावर जावं. बघावं त्या टकमकीच्या टोकावर उभं राहून बघावं आपलं माहेरचं गाव दिसतंय का ?

अन् तेवढ्यात दचकल्यागत चमकून तिने घराकडे पाहिलं. तान्हं पोर रडल्याचा आवाज घरातून आला. ती आत पळाली. बांग-

ड्यांची नाजूक किण्किण् आणि पाळण्याचा 'कुर्रर्र कुई कुर्रर्र कुई' असा आवाज माजघरातून पाझरू लागला. हिराच्या बारीक आवाजातल्या ओव्याही दरवळू लागल्या.

दसरा गडावर गाजला. गडाखालच्या वाडीतही गाजला आणि संपला. हिराच्या डोक्यात मात्र अजूनही गडावरच्या तोफा दणाणत होत्या. तिला गड बघायची ऊर्मी आली होती. पण मनातली ही हौस पुरवील कोण? गडावर नेऊन गड दाखवील कोण?

दुसरं कोण? नवरा!

हुं! त्यानला कामं हजार! शेतकरीगडी. त्यान्‌ला कुठली सवड बायकोचे लाड पुरवायला? आपलं लगीन झालंय् एवढं त्येंच्या ध्यानी राह्यलं, तरी लई झालं!

दसरा उलटून चार दिवस गेले अन् अश्विनाची पुनव उगवली. दिवस फुटला आणि वाडीत घोड्याच्या टापा खडाखडा वाजल्या. घोडेस्वार पाटलाच्या दारापुढं थांबला. स्वार गडावरून काहीतरी हुकूम घेऊन आला होता. पाटील लगबगीने धावत बाहेर आला. स्वाराने त्याला हुकूम सांगितला,

"पाटील, सांजच्याला गडावर दुधाची जर्वर हाये! आज कोजागरीची पुनव हाये. तवा वाडीतल्या गवळ्यान्‌ला सांगून आज सांजच्या वख्ताला पाच हंडे दूध गडावर घालाया सांगा. गडाची कवाडं बंद व्हायच्या आत दुधाची धार वाड्यात पडायला हवी!"

"जी व्हय्, जी व्हय्! करतो बंदुबस्त!"

पाटलाने हवाला घेतला अन् स्वार माघारा दौडत गेला. तो गेला आणि मागोमाग पाटलांकडून हिराला सांगावा आला की, "गडावर राजाला दूध हवंय सांजच्याला. उन्हं उतरल्यावर गडावर जायाचंय. काय हंडा, अर्धा हंडा असंल घेऊन तयार व्हाय!"

हिरा चट्टकन 'हो' म्हणाली. तिच्या मनाजोगतं काम घरी चालून आलं. गडावर जायला तिचं मन आतुरलं होतच.

उन्हं कलंडली. वाडीतल्या चार-पाच गवळणी आपआपल्या घरचं दूध घेऊन निघाल्या. त्या हसत होत्या. थट्टेची बोलणी बोलत

होत्या. त्यांच्या डोईवर, लख्ख घासलेले हंडे चकचकत होते. त्यांनी हिराच्या दारापुढं येऊन हिराला हाळी दिली.

" हिरा ऽ! अग हिरा ऽ! चल चल बया बिगी बिगी मथुरेच्या बाजाराला!"

" आल्ये आल्ये ऽ! थांबा वाईच!"

आतून हिराची साद आली. बाहेर खसखस पिकत होती. हिरा आपल्या बाळाला पदराखाली पाजीत होती. पिता पिता पोर पेंगुळलं. तिने त्याला पाळण्यात झोपवलं, झोका दिला. पदर सावरला. डोईवर चुंबळ ठेवली. वर दुधाचा हंडा घेतला अन् बाहेर आली. बाहेरच्या गवळणींनी खोचून विचारलंच तिला,

" कशात ग जीव गुतला व्हता इकता येळ?"

" पोरात! अग बायांनू तान्हं हाये माझं! त्येला पाजलं, झोपीवलं आन् आलो!"

हिराने कवाडाला कडी घातली अन् निघाली. हसत खिदळत साऱ्या साळकाया माळकाया गडाच्या वाटेला लागल्या.

झपाझपा पावलं पडत होती..पायाच्या बोटातली जोडवी वाजत खटक चटक् खटक् चटक्! गवळणी गड चढत होत्या. त्यांच्या सावल्या त्यांच्याबरोबर लोळत लोळत चालल्या होत्या. गडावरचा झेंडा फडफडताना दिसू लागला होता.

आणि बायांनी गड गाठला. महाद्वारातून साऱ्याजणी गडात प्रवेशल्या. गड गजबजून गेला होता. हिरा टकमका तो राजधानीचा थाट बघत होती. सर्वजणी राजवाड्यात गेल्या. तिथं तर काय! सारंच डौल न्यारा. उंच उंच कमानी, प्रचंड दरवाजे, माड्यांची रांग. हंड्या, झुंबरं, पगड्या, शेले, जाळीदार पडदे, हुजरे अन् मुजरे. हिराला जाता जाता हा ओझरता दिमाख दिसत होता. मुदपाकखान्यात साऱ्याजणींनी दुधं घातली. कारभाऱ्यांनी दिलेले दुधाचे पैसे घेतले आणि रिकामे हंडे घेऊन त्या राजवाड्याबाहेर पडल्या. ह्या वेळी दिवस ढळत आला होता.

राजरस्त्यावर पालख्या, मेणे, हत्ती, घोडे यांची रहदारी चालू होती. बाजारपेठ तर ऐश्वर्याने झगमगत होती. भरजरी कपड्यांची,

दागदागिन्यांची आणि वस्तूंची मांडामांड केलेली दुकाने उंच ज्योत्यांवर दुतर्फा हारीने उभी होती. वाडे, मनोरे, देवळे, तलाव, चबुतरे, चौक आणि भारदस्त दरबारी माणसं—राजाचा गड म्हणजे रामराज्यातल्या अयोध्येसारखा सजलेला होता. रिकामा हंडा शिरावर घेऊन हिरा गडावर साऱ्याजणींबरोबर फिरत होती. तिच्या त्या मैतरणी घरी चलायची तिला घाई करीत होत्या. तरीही ती म्हणत होती.

"थांबा ग वाईच !"

मग कुणी आपल्या सासूचा धाक सांगितला. कुणी आपल्या नवऱ्याचा धाक सांगितला. कुणी आपल्या सासऱ्याचा तऱ्हेवाईकपणा सांगितला. साऱ्याजणी घाई करू लागल्या. तेव्हा हिरा म्हणाली, "तुम्ही व्हा म्होरं ! मी येत्ये तुमच्या मागुमाग. अर्ध्या वाटेवर गाठत्ये तुम्हांला. तुम्ही जावा म्होरं !"

"तुझा बया राजारानीचा सौसार ! उशीर झाला तरी कुनी रागायचं न्हाई, कुनी गागायचं न्हाई ! त्यातून तुझा दादलाबी गावाला गेलाया ! तुझं बरं हाये !"

एवढं बोलून त्या आयाबाया झप्झप् निघाल्या, महादरवाजातून बाहेर पडल्या आणि गडाच्या उतरणीला लागल्या. हिरा रमली गडावर. नगारखाना, हत्तीखाना आणि गंगासागराची शोभा बघण्यात हिरा भान विसरली. क्षणाक्षणाने दिवस बुडत होता. अन् तेवढ्यात एकदम धडाडकन् आवाजाने ती बिचकली. तोफेचा आवाज होता तो. ती क्षणात भानावर आली. तिने मावळतीकड वळून पाहिलं सूर्य डोंगराआड पूर्ण बुडाला होता ! तिला एकदम आपल्या तान्ह्या बाळाची आठवण उमाळून आली. क्षणात ती वेड्यापिशासारखी गडाच्या महादरवाजाकडे धावत सुटली. हत्तीखान्यापासून महादरवाजा बराच दूर होता. हिरा धावत होती, धापा टाकीत ती दरवाजापाशी येऊन पोहोचली आणि बघते तो दरवाजा बंद ! आतून कड्या आणि कुलुपे ! ! तुळईसारखा आडवा भक्कम आडसर ! ! !

गडावरून खाली जायची ही एवढी एकच वाट. अन् तीही बंद!

आता ? आता गडाखाली कसं जायचं ? हिरा अतिशय घाबरली. तिचं ऊर धडधडू लागलं. तिला ऐकून माहीत होतं की, गडाचे दरवाजे एकदा बंद झाले की कुणासाठीही ते उघडले जात नाहीत. महाराजांच्या खास हुकमाशिवाय दरवाजाच्या कडीकुलपाला हात-सुद्धा लावत नाही कुणी ! दिवस मावळल्यानंतर दरवाजे बंद झालेच पाहिजेत हा इथला कडक कायदा ! मग जरी प्रत्यक्ष यमाने हट्ट धरला की ह्याच दरवाजातून आत येईन, तरी त्यालाही आत येता येणार नाही ! अन् ह्या दरवाजातूनच बाहेर जाईन, असा हट्ट वाऱ्याने धरला, तरी त्याला जायला किंचितशीही फट मिळणार नाही !

हिराने हे ऐकलं होतं पूर्वी. तिला सारं आठवलं. ती घामाने डबडबली. समोर त्या मोठ्याथोरल्या दरवाजापुढं तीन-चार मराठी शिपाई भाले घेऊन उभे होते. कडेच्या देवडीवर सहा-सात शिपाई बोलत बसले होते. भीत भीत, पण मनाचा तसाच धीर करून हिरा पुढं पावलं टाकू लागली. एका हाताने डोईवरचा हंडा सांभाळीत आणि दुसऱ्या हाताची अर्धी ओंजळ पुढे करीत ती त्या पहारेकऱ्यांना दाटलेल्या गळ्याने म्हणाली,

"आवो, आवो शिलेदारसाह्यब !"

"काय हाय ?"

देवडीवरचे मिश्यांचे झुपके आणि राकट टप्पोरे डोळे तिच्या-कडे वळले.

"कोन तू ?"

"म्या, म्या गडाखालल्या वाडीतली गवळण ! दूध घालाया म्या गडावर आलो व्हतो !"

"मंग हवं काय ? बोल की !"

"मला बाहीर जाऊ द्या ! मला घरला जायाचंय् !"

"न्हाई ! गड बंद झाला ! उंद्या सक्काळा तोफ झाल्याबिगर दरवाजा न्हाई खुलायचा ! आता रातच्याला गडावरच न्हाय आन् उंद्या सक्काळा उठून खाली जाय !"

"नगा नगा वो असं करू ! पाया पडतो तुमच्या ! माझ्या-

करता उघडा वो कवाड ! "

" अग नाय माझी बाईऽ ! कवाडाच्या किल्ल्या मघाच गेल्या राजवाड्यामंदी ! "

" अग आई ! म्या आता काय करू ? "

" पोरी रडतियास कशापायी ? हतं का वनवासात पडलियास व्हय् ? काय बी चिंता नगं करूस. अग पोरी, हा आपल्या राजाचा गड हाय. सुखानं न्हाय आन् उंद्याला जाय ! "

" अवो म्या पदर पसरतो ! मला कसं बी करून बाहीर सोडा ! "

" फिरून त्येच ! त्ये आपल्या बाच्यानं बी व्हनार नाय ! "

हिरा एखाद्या सासुरवासणीसारखी उभी राहून शिपायांचे आर्जव करीत होती. डोळे पुसत होती. त्या पहारेकऱ्यांनाही तिची कणव येत होती. पण ते तरी काय करणार ? ते तिची समजूत घालीत होते. तिला सारखं डोळ्यापुढं तिचं बाळ दिसत होतं. रात दाटत चालली. हिराला जास्तच हुंदका फुटला. बांध फुटावा तसं तिला रडू कोसळलं. ती स्फुंदत स्फुंदत म्हणाली,

" घरी माझं लेकरू तान्हं हाये वं ! भुकेलं पोर रातभर येकलं कसं न्हाईल ? रडून रडून सुकून जाईल ! माझ्या लेकरासाठी मला सोडा ! तान्हं लेकरू–! "

" व्हय् ? आरं आरं आरं ! तान्ह्या लेकराची आय हाये वो ही ! पोरी, घाबरू नगंस. तुझी अशी चुकून माकून गुतवन झाल्याचं आम्ही किल्लेदारास्नी कळवितो, मग किल्लेदार जातीनं महाराजान्ला अर्ज करील, काय समजलीस ? मंग महाराजांचा हुकूम झाला, तर दरवाजा सताड खुलंल. राजा मोठ्या काळजाचा हाये. पर राजाची रीत लई अवघड. त्येच्या हुकमाबिगर गड कुनाच्या द्येवालाबी खुलला जात न्हाई. उगी न्हाय माझी बाई ! डोळं पूस ! देवडीच्या पल्याडच्या अंगाला बैस घडीभर. महाराजांचा हुकूम झाला की, झटक्यात जाशील. म्या किल्लेदाराच्या कचेरीला गडी लावून देतो. बैस बैस पोरी ! "

[ पृष्ठ ८६ वर ]

# दोन माणसं ! दोन प्रसंग !

## जयवंत दळवी

काही घटना, काही व्यक्ती विलक्षण असतात. तशा त्या अगदी साध्या आणि म्हटलं तर निरर्थक असतात. त्यांचा आपल्याशी तसा अर्थाअर्थी काहीएक संबंध नसतो. वास्तविक, तिकडे आपलं लक्ष जावं असंही काही नसतं. पण कारण नसता-नाही आपलं लक्ष जातं. आणि त्या घटना मनात कुठं तरी खोल रुजून बसतात. मातीत ओलावा येताच तणाचं पातं वर यावं तसं होतं. त्या आठवणींना कोंब फुटतात. मनाला कसली तरी अनामिक टोचणी लागते. काही काळ मन अस्वस्थ होतं. जशा काही आपलं मन अस्वस्थ करण्यासाठीच त्या घटना मनात दबा धरून बसलेल्या असतात !

काही काळ वृत्तपत्रव्यवसायात असताना पहिल्या स्वातंत्र्य-दिनाची एक बातमी लिहिण्याचं काम माझ्यावर सोपविलं होतं. मुंबईत चौपाटीवर मध्यरात्री बाराच्या ठोक्याला बाळासाहेब खेर तिरंगी ध्वज वर चढवून " आम्ही स्वतंत्र झालो " असं जाहीर करणार होते. तो चित्तथरारक प्रसंग पाहून आणि वक्त्यांची भाषणं ऐकून वृत्तान्त लिहिण्याचं काम माझ्याकडे होतं. रात्री बारा वाजता कार्यक्रम. त्यानंतर झेंडावंदन आणि भाषणं म्हणजे दोन तास सहज लोटणार होते. त्यानंतर 'लोकमान्य' दैनिकात जायचं आणि बातमी लिहायची. परत झोपायला येईपर्यंत पहाटेचे चार वाजले असते. कदाचित जुन्या फायली डोकीला लावून तिथंच झोपावं लागलं असतं. म्हणून मनाशी मी विचार केला, रात्री आठ वाजता पोटभर जेवावं. ( पहिल्या स्वातंत्र्यदिनी पोटभर जेवलो एवढी तरी आठवण मनात राहावी ! ) त्यानंतर दोन-तीन तास स्वस्थसं झोपावं आणि रात्री साडेअकरा वाजता चौपाटी-वर जावं. चौपाटीपासून दहा मिनिटांच्या अंतरावरच मी राहत होतो. या विचारांत पोटभर जेवणाचा विचार असल्यामुळे तो पक्का केला. जेवलो. नवाच्या सुमारास लवंडलो. उशीकडं गजराचं घड्याळ ठेवलं. अकराचा गजर लावला. आणि तत्काळ झोपलो.

पण दुर्दैवानं काय गोंधळ झाला कोण जाणे ! रात्री घड्याळाचा गजर झालाच नाही. आणि जाग आली ती पहाटे चार वाजता ! तसाच तिरमिरत उठलो, आणि

चौपाटीच्या दिशेनं धावत सुटलो. तिथं काहीसुद्धा नव्हतं. सगळा कार्यक्रम संपला होता. फडकावलेला ध्वज फडफडत होता. आणि चार पोलिस डुलक्या घेत बाजूला बसले होते. बाकी सर्व काही संपलं होतं.

आकाश फाटणं म्हणजे काय ते त्या वेळी कळलं. आज पहिला स्वातंत्र्य-दिन. आता आणखी एका तासानं बाहेर पडणाऱ्या 'लोकमान्या'च्या अंकात या महत्त्वाच्या कार्यक्रमाचं वृत्त नसणार, बाळासाहेब खेरांचं भाषण नसणार. त्याहीपेक्षा त्यामुळे आजच स्वातंत्र्यदिनाला आपल्या हाती नोटीस येणार! या कल्पनेनं मी टरकून गेलो. एकदा विचार आला. 'लोकमान्या'च्या कचेरीत जाऊन काय झालं आहे ते पाहावं. पण म्हटलं, एवीतेवी नोकरी जाणारच. त्यात आणखी पाहायचं काय? संपादक आले म्हणजे दुपारी नोटीस घेऊन बाहेर पडावं, असा विचार करीत तिथंच थोडा वेळ बसलो. अर्थात, रात्रीच्या उपसंपादकांनी माझी वाट पाहिली पाहिली आणि दुसऱ्या वर्तमानपत्राच्या कचेरीत फोन करून चौपाटीवरील कार्यक्रमाची थोडी कामचलाऊ बातमी दिली होती. तरीही माझी नोकरी जाणारच होती. अनेक वेळा दुर्दैव आड येतं. या वेळी सुदैव आड आलं. संपादकांच्या माझ्यावरील प्रेमामुळे हे प्रकरण तसंच मिटलं. नोकरी बचावली.

या प्रसंगात माझी नोकरी जाते की टिकते असा बाका प्रसंग होता. पण हा प्रसंग मला विशेष आठवत नाही. मन अस्वस्थ तर मुळीच करीत नाही; किंबहुना हा प्रसंग मी तसा विसरूनच गेलो आहे असं म्हटलं तरी चालेल.

पण ज्याचा माझा काही संबंध नाही असा एक ओंगळ कामाठी मात्र माझ्या मनात गेली अनेक वर्षे दबा धरून बसलेला आहे, याच पत्राचा बातमीदार म्हणून मी पहिल्या प्रजासत्ताकदिनी मुंबईच्या फोर्ट भागात पायी फिरत होतो. त्या रात्री मुंबईतील रोषणाई आणि लोकांचा उत्साह यांना कसलीही सीमा नव्हती. एवढी प्रचंड प्रमाणावरील रोषणाई आणि हर्षभरित लोकांचे थवेच्या थवे—हे सारं आम्ही आमच्या आयुष्यात प्रथमच पाहत होतो. प्रत्येक सार्वजनिक इमारतीवर हजारो विजेचे दिवे लखलखत होते. ट्रामगाड्यांवर दिव्यांच्या माळा लोंबत होत्या. कंडक्टर तिकिटं मागत नव्हते. लोक झुंबड करून ट्रामगाड्यांतच नव्हे तर ट्रामच्या टपावरसुद्धा बसून जात होते. टॅक्सी, घोडागाड्या यांची धावाधाव चालू होती. हजारो पादचारी पिपाटणी वाजवीत नाचत होते. सगळीकडे नुसता जल्लोष होता.

मुंबई विद्यापीठाच्या आवारात राजाबाई टॉवर रंगीबेरंगी दिव्यांनी सजला होता. त्या भागातला तो सर्वांत उंच मनोरा. (विशेष म्हणजे त्या मनोऱ्याची चार दिशांवरील चार घड्याळं त्या वेळी चालू होती आणि त्याचीच लोकांना गंमत वाटत होती!) मनोरा पाहत हजारो लोक थांबत होते. पाहत पाहत पुढं जात होते. आणि त्याच वेळी तिथं फूटपायरीवरील दगडी कठड्याला पाठ टेकून एक ओंगळ



**त्याचा तो रिकामा चेहरा,**
**दाढीचे खुंट, बसलेले गाल**
**आणि थिजलेले डोळे, सारं काही**
**क्षणापूर्वी पाहिल्यासारखं...**

दिसणारा कामाठी उकिडवा बसला होता. डोकीवर चिखलानं मळलेलं मुंडासं, अंगात फाटकं कुडतं आणि कमरेला गुंडाळलेलं फडकं. तोंडावर दाढीचे खुंट. चेहरा अत्यंत निर्विकार ! एक आणेवाला चण्याचा पुडा घेऊन तो एक एक चणा खात होता. बहुधा त्यांतही वेळ काढता यावा म्हणून तो एकेक चणा सोडत होता. चणा खात होता आणि मग सोललेलं सालही जिभेच्या टोकावर ठेवीत होता. त्या चण्यांतच तो इतका रंगला होता की, आपल्याभोवती प्रजासत्ताकदिनाचं हर्षोन्मादक वातावरण पसरलं आहे याचा त्याला पत्तासुद्धा नव्हता. एक वेळ प्रजासत्ताकदिनाचं सोडा ! पण भोवताली निदान दिव्यांचा लखलखाट आहे, हजारो लोक फूटपायरीवरून, थेट त्याच्या नाकावरून जातायेताहेत, पिपाट्यांचे आणि फुग्यांचे भेसूर आवाज उठत आहेत——त्या कामाठ्याला कशाचा कशाचा म्हणून सुगावा नव्हता. तो ठार आंधळा आणि बहिरा होता की काय असंच कुणालाही वाटलं असतं. पण त्याच्या सुदैवानं त्याच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. माझं त्याच्याकडे लक्ष जाताच मला त्याचा मोकळा, रिता, कोराकरकरीत चेहरा कसासाच वाटला ! निदान त्या उत्साही वातावरणात तरी ! मी त्याच्या पुढ्यात थांबलो. पण त्याचं लक्ष नव्हतं. वाटलं, या एकाकी नागरिकाला या देशाच्या पहिल्या प्रजासत्ताकदिनी काय वाटतं ते विचारावं. म्हणून त्याच्या पुढ्यात वाकलो. तसं त्यानं तोंड वर केलं आणि भेकरासारखं माझ्याकडं पाहिलं. त्याच्या सुकलेल्या, थिजलेल्या नजरेत भीती दिसली. त्यानं हातातले चणे संपवले होते आणि पुड्याचा कागद चुरगाळून बाजूला टाकला होता. एकदम काय बोलावं ते मला कळलं नाही. कोणत्या भाषेत बोलावं ? ‘क्या नाम है ?’ एवढं विचारलं मात्र ! त्याने मला न समजणारे दोन तेलगू शब्द टाकले. त्याने उठण्यासाठी हालचाल केली. उठताना त्यानं फूटपायरीचा दगड झाडल्यासारखा

केला. चुरगाळून टाकलेला कागद उचलला आणि माझी ब्याद नको म्हणून कडेकडेनं तो चालत राहिला. तिथं बसून त्यानं कचरा केला म्हणून मी त्याला हटकत होतो, असं त्याला वाटलं की काय कोण जाणे ! तो चालत चालत पुढं गेला. एकदा त्यानं मागं वळून पाहिलं. आपल्या मागं कोणी लागलेलं नाही असं पाहताच तो काळोखाचा आडोसा घेऊन पुन: बसला. पुन: एकदा एकाकी झाला ! मग मात्र मला पुन: त्याच्याकडे जाण्याचं धैर्य झालं नाही. मी गेलो असतो तर तो पुन: भयभीत होऊन पळत सुटला असता. तथापि या प्रसंगी त्याचा तो चेहरा आणि त्याची ती नजर पाहून माझ्या तोंडची चव बदलली.

आता हा कामाठी माझ्या मनात घर करून का राहावा ? त्याचा तो रिकामा चेहरा. दाढीचे खुंट. बसलेले गाल. आणि पिवळट थिजलेले डोळे. सारं काही क्षणापूर्वी पाहिल्यासारखं आजही माझ्या नजरेसमोर येतं आणि माझं मन अक्षरश: अस्वस्थ होतं. अनेक इमारतींच्या बांधकामावर हे कामाठी काम करीत असतात. चिखलात माखलेले. दमछाक माहीत नसलेले. जनावरांसारखे राबतात. जनावरांच्या घोळक्यात एक एक जनावर ओळखता येत नाही, तसा एक एक कामाठी ओळखता येत नाही. सगळेच सारखे वाटतात. त्यामुळे कुठंही चार कामाठी दिसले की त्यात तो 'प्रजासत्ताक' कामाठी मला दिसू लागतो. कुठल्याही कामाठ्याला पाहिलं की त्याच्या जागी मला तोच चेहरा दिसतो– तेच दाढीचे खुंट– तेच बसलेले गाल आणि तेच पिवळट थिजलेले डोळे....!

हा कामाठी आता माझा जन्माचा सोबती ! तोही फक्त मन अस्वस्थ करण्यासाठी !

* * *

याहीपेक्षा थोडा जुना असा आणखी एक प्रसंग !

बेचाळीस सालची गोष्ट ! मुंबईत फ्लोरा फाऊंटनवर महाराणी व्हिक्टोरियाचा पुतळा होता. ब्रिटिश राजवटीला प्रखरतेनं विरोध करण्याचा तो काळ ! त्याच सुमारास कोणी तरी या महाराणीचं नाक कापून टाकलं होतं. ते कापलेलं नाक मुद्दाम पाहायला गेलो होतो. दुपारचे बारा वाजले होते. तिथंच शेजारी वळसा घेऊन एक टांगा येत होता. आणि त्याच वेळेला एक फक्कड आलिशान मोटारही वळण घेत होती. क्षणभरात काय झालं कोण जाणे ! टांगेवाला एकदम जीव गेल्यासारखा मोठ्यानं ओरडला, आणि त्या मोटारीचेही कर्कश ब्रेक लागले. मोटार आणि व्हिक्टोरिया गाडी समोरासमोर ठाकल्या. एक प्रख्यात सिनेमा नट ती मोटार चालवीत होता. त्याच्या शेजारीच त्याच्याबरोबर त्या वेळी चित्रपटात काम करणारी एक तेवढीच प्रख्यात नटी होती. नेमकं काय झालं ते कुणालाच कळलं नाही. पण तेवढ्यात, अवघ्या दोन मिनिटांच्या अवधीत दोनशे माणसं जमा झाली, आणि त्या नटनटीला बघण्यासाठी मोटारीच्या भोवती उभी राहिली.

**पराभूत माणसासारखा मी त्याच्याकडे बघत राहिलो. हाताची बोटं हवेत उडवीत तो बोलला.**
**" क्या करना ?**
**दुनिया आंधी हो गयी !**



आपल्या भरधाव मोटारीला व्हिक्टोरियावाला आडवा आला म्हणून तो नट भयंकर संतापला होता. तो लालबुंद तोंडानं मोटारीतून उतरला आणि संतापाच्या भरात इतक्या जोरानं टांगेवाल्याच्या अंगावर धावला की तो आता त्याचा मुडदाच पाडणार असं क्षणभर वाटलं. टांग्याच्या पुढच्या चाकावर पाय ठेवून तो चटकन अर्धवट वर चढला आणि बेपर्वाईनं त्यानं व्हिक्टोरियावाल्याची गर्दन पकडली. त्याला खाली ओढू लागला. थोडी झटापट झाली. टांगेवाल्याचं खाकी खमीस फाटलं. आपल्या फडर्या हिंदीत तो नट आग ओकत होता. मध्येच व्हिक्टोरिया-वाल्याच्या हातातनं त्यानं चाबूक हिसकावून घेतला. वाटलं, आता तो चाबकानं टांगेवाल्याला फोडणार ! सगळे लोक अवाक् बघत होते. पण तेवढ्यात सुदैवानं ती नटी खाली उतरली. तिनं त्या नटाला ओढत ओढत मोटारीपाशी नेलं आणि आत बसवलं. बसताना त्यानं चाबूक मागल्या सीटवर टाकला. सगळे लोक नटीला आणि नटाला वाकून वाकून बघत असतानाच त्यानं भरधाव मोटर सोडली. शे-दोनशे लोक नटनटीला हावरटपणे बघण्यासाठी मोटरीमागं धावत राहिले.

इथं जागच्या जागी व्हिक्टोरिया उभी. पायांनी घोडा उभा—गरीब होऊन. पापण्या हालवीत. व्हिक्टोरियाच्या उंच बैठकीवर म्हातारा व्हिक्टोरियावाला. डोकीवर लाल टोपी. बसके गाल. डोळ्यांभोवती सुरकुत्यांचं जाळं. त्यातून डोळे दिसतच नव्हते. नुसत्या खाचा दिसत होत्या. झटपटीत त्याचं कुडतं फाटलं होतं. ते तो सावरीत बैठकीवर बसला होता.

पण त्याच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. त्याचा चाबूकसुद्धा तो नट घेऊन गेला होता. पण ते कुणाच्या ध्यानात आलं नव्हतं. क्षण—दोन क्षण. फाटकं खमीस चोळत तो टांगेवाला तसाच बसून राहिला. मग त्याला एकदम जाग आली. त्यानं मागं वळून पाहिलं. कुठून तरी दुरून भाडं ठरवून व्हिक्टोरियातून आलेला उतारूही त्या गोंधळाचा फायदा घेऊन भाडं न देताच पसार झाला होता. तो काहीच

बोलला नाही. दोन्ही हातांची ताणलेली बोटं हवेत हालवीत व्हिक्टोरियावाल्यानं फक्त आपली मान झुकवली.

या घटकेला व्हिक्टोरियावाल्याकडे वेड्यासारखा बघत जवळ जवळ मीच एकटा उभा होतो. त्या नटाचं बखोटं धरून त्याच्या हातातुला चाबूक हिसकावून मी तो व्हिक्टोरियावाल्याला देऊ शकलो नाही. तेवढं धैर्य मला झालं नाही. पराभूत माणसासारखा मी फक्त त्याला बघत राहिलो. मी त्याला बघतो आहे, हे व्हिक्टोरियावाल्याच्या लक्षात आलं. तेव्हा त्यानं एक ओझरता दृष्टिक्षेप माझ्या तोंडावर टाकला. हातातनं सुटलेल्या लगामाच्या दोन पट्ट्या त्यानं डाव्या हातात घेतल्या. उजव्या हाताची बोटं प्राण जाताना ताणावीत तशी त्यानं ताणली, विस्फारली आणि ती हवेत उडवीत तो स्वत:शीच बोलला, " क्या करना ? दुनिया आँधी हो गयी ! "

त्यानं लगाम खेचला. मरतुकडं घोडं पाय उचलू लागलं.

मी वळून पाहत तसाच उभा होतो. दोन्ही बाजूंना डळमळत व्हिक्टोरिया चालत होती. मागून, मागल्या काळ्या टपावर व्हिक्टोरियावाल्याचं फक्त मुंडकं दिसत होतं. तेही तुटल्यासारखं हालत होतं.

" क्या करना ? दुनिया आँधी हो गयी ! "

हे एक वाक्य मला सतावीत होतं. अजूनही सतावतं.

मी त्या आंधळ्या दुनियेत आहे ! आपल्या षंढ हातानं वेळीच काही होऊ शकलं नाही याची खंत करीत ! ○





# क्रीडांगण

१५ जुलैच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'देशी खेळांचे संवर्धन' या टीकात्मक लिखाणासंबंधी मुंबईच्या श्री. मुकुंद विष्णु आंबर्डेकर यांनी एक बोलके पत्र 'माणूस'च्या संपादकांकडे पाठविले आहे. त्यात श्री. आंबर्डेकर यांनी पुढील महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत.

(१) श्री. मेहतांच्या भाष्यातील विधायक कार्य कुणी किती करावयाचे हा खरा यक्ष प्रश्न आहे.

(२) कबड्डी आणि खोखोच्या राष्ट्रीय संस्था असून त्या १९५० व १९५६ मध्ये स्थापन झाल्या. त्यांच्यातर्फेच भाई नेरुरकर आणि मोईर सुवर्णचषक सामने आयोजिले होते. त्यामुळे श्री. रेगेंचे 'वृत्तसंकलन' अपुऱ्या माहितीवर आधारलेले आहे.

(३) भाई नेरुरकर स्पर्धांच्या वेळी वृत्तपत्र प्रतिनिधींना विशिष्ट प्रकारे माहिती गोळा करून दिली जात असे. सामन्यांचे चटकदार वर्णन वृत्तपत्रांत मिळण्याची व्यवस्थाही जर पदाधिकाऱ्यांनीच करावयाची तर वृत्तपत्रांचे प्रतिनिधी काय करणार ?

(४) भाई नेरुरकर आणि अश्विनीकुमार मोईर सुवर्णचषक स्पर्धांचा खर्च १० ते १२ हजारांच्या घरात जातो. असे सामने प्रतिवर्षी एकदाच खेळविताना राज्य संघटनेची काय तारांबळ उडते हे त्यांचे त्यांनाच ठाऊक.

(५) वृत्तपत्रे आणि आकाशवाणीवरील प्रसिद्धीच्या बाबतीत मात्र अजून हे खेळ बरेचसे पोरके आहेत.

(६) हाताशी असलेल्या साधनसामग्रीच्या आधारे संस्था व कार्यकर्ते आपल्या ताकदीनुसार या खेळांना चांगले दिवस आणण्याचा प्रयत्न करीत आहेतच. श्री. रेगे यांनी वृत्तपत्रांतून अशा खेळांना जास्तीत जास्त प्रसिद्धी देऊन ठिकठिकाणी सामन्यांना अधिक प्रेक्षक कसे मिळतील याचा प्रयत्न करण्यास असलेल्या कामाचा वेग वाढू शकेल.

**म नो ह र रे गे**

# देशी खेळ आणि संघटित प्रयत्न

भारतीय खेळांना आंतर-राष्ट्रीय महत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांना वृत्तपत्रांत सहज प्रसिद्धी मिळू शकेल आणि त्यापूर्वी या खेळांतील पदाधिकाऱ्यांपासून क्रीडा प्रतिनिधीपर्यंत सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे कसे आवश्यक आहे या मूळ भूमिकेवरून मी देशी खेळांचे संवर्धन अपेक्षित केले होते. त्यातील अपुऱ्या माहिती-पेक्षाही, प्रश्नांनी श्री. आंबर्डेकरांसारख्या खेळातील कार्यकर्त्यांच्या विचारांना त्वरित चालना मिळू शकली हा काही कमी फायदा झाला असे म्हणता येणार नाही. मुंबईच्या क्रीडा-चालकांनी वृत्तप्रतिनिधींची उत्तम व्यवस्था केली होती. तसा प्रकार गेल्या वर्षी पुणे येथे राणा प्रताप संघाच्या पदाधिकाऱ्यांनीही करून दाखविला होता. हेमंत जोगदेव, चंद्रकांत केळकर आणि मधु परंगी यांनी वृत्तपत्रांना चांगले साहाय्य केले होते. अशी परिस्थिती सगळीकडेच अनुभवाला येईल असे नाही. कबड्डीच्या काही चालकांना तर प्रसिद्धीची किंमतही नसते, म्हणूनच हे दृश्य बदलणे जरूर आहे.

भारतीय खेळ आंतरराष्ट्रीय क्षितिजावर नेण्याचे कार्य राष्ट्रीय संस्थांनी सरकारच्या मदतीनेच केले पाहिजे. तशी काही माहिती उपलब्ध असल्यास कुणी जरूर कळवावी.

बाहेरगावाहून संघ बोलवायचे, त्यांची राहण्या-खाण्याची व्यवस्था करावयाची म्हणजे खर्च येणारच, पण त्यासाठी अडून बसून कसे चालेल ? कार्य सुरू झाले की पैशाचा ओघ वाहत येतो. पुण्याच्या डेक्कन जिमखान्यावर टेनिसची व्यवस्था पाहा. डॉ. जी. ए. रानडे मला एकदा म्हणाले होते की, टेनिस खेळाला योग्य अशी २० मुले द्या. वर्षाला पाच हजार रुपये त्यांच्यासाठी खर्च करण्याची माझी तयारी आहे. जिमखान्यावर पूर्वी टेनिसची चार कोर्टे होती तेथे आता अकरा आहेत. सुरुवातीला तरी त्यांच्याकडे कुठे पैसा होता ?

श्री. आंबर्डेकर म्हणतात, आकाशवाणी भारतीय खेळाबद्दल गप्प बसते. पण राणा प्रतापच्या गेल्या वर्षीच्या कबड्डीच्या अंतिम सामन्यांचे प्रत्यक्ष धावते वर्णन पुणे आकाशवाणीवर जोगदेव आणि भिडे यांनी केले होते. प्रयत्न सगळीकडेच होत आहेत; ते अधिक संघटितपणे आणि प्रभावी होणेच आवश्यक वाटते. शेवटी श्री. आंबर्डेकर यांना मी असे जरूर आश्वासन देतो की भारतीय खेळांसाठी कुवती-प्रमाणे वाटेल ते कार्य करण्याची निदान माझी स्वतःची तरी तयारी आहे. ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज




**श्री. गो. जोशी**

सायनाचार्य, नासिक


ता. १२ ते १८ ऑगस्ट १९६७

**मेष :** गुरूचे कर्तृत्व आणि शनीचे दातृत्व यांचा साक्षात्कार होण्याचा हाच काल. दि. १५ पासूनच या माझ्या विधानाचा आपणांस प्रत्यय यावा. साडेसातीमुळे आजवर आपल्या ज्या ज्या अपेक्षा असफल झाल्या त्या त्या साऱ्या आता सफल व्हायला लागतील.

समर्थ व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी स्नेहसंबंध जुळून यायला लागतील आणि त्यामुळे तुमचे न होण्यासारखे काम झटपट होऊन जाईल. याच वेळी यशस्वी उद्योगपतींचे आपणांस मार्गदर्शन लाभेल आणि त्यांच्या सहानुभूतीने एका नव्या व्यवसायात आपले पदार्पण घडेल.

सांपत्तिक अडचणी निवारल्या जातील. सामाजिक प्रतिष्ठा उंचावू लागेल.

दि. १५ ते १८ या कालाची नोंद करा.

**वृषभ :** गुरूच्या रूपाने साक्षात परमेश्वरच तुमच्या पाठीशी उभा असल्याचा आपणांस प्रत्यय यायला लागेल. आता अशक्य, अतर्क्य, अवघड असे काहीच जाणवणार नाही. आजवर न सुटलेले प्रगतीचे गणित आता कोणाच्याही मदतीशिवाय सुटू शकेल.

या आठवड्यातील विशेष घटना प्रवास, उच्च अधिकारप्राप्ती, नव्या क्षेत्रात पदार्पण याच होत. यांपैकी काही किंवा सर्वही कोणत्याही क्षणी घडाव्यात.

अगदी निश्चितपणे सांगायचे झाल्यास दि. १७ ते २० मध्ये आपणांस माझ्या या विधानाचा प्रत्यय यावाच.

आपल्या व्यवसायधंद्याच्या अभिनव आणि आकर्षक योजना याच काली आकार घेऊ लागाव्यात.

दि. १६ ते १८ हा सर्वच काल अपेक्षित कार्यात यश देणारा आहे.

**मिथुन** : एका तपाच्या दीर्घ कालानंतर घनस्थानी सूर्य-गुरू योग होत आहे. नवे आकर्षक आणि अभिनव असे काही या वेळी घडवून आणाल. गुरूचा ध्येयवाद आणि सूर्याचा पौरुषवाद यांचा प्रत्यय पदोपदी यायला लागेल.

तुमच्या आचारा-विचारांत आमूलाग्र क्रांती घडेल, नवी घडी बसविण्यासाठी नव्या साधनसामग्रीची शोधाशोध सुरू होईल. आणि या वेळी आपणांस जे जे हवे ते ते गवसेल.

सूर्याचे पराक्रमस्थानी आगमन घडताच दाही दिशा तुमच्या कर्तृत्वाला मोकळ्या होतील. सहज काही करावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे असा आपणांस पदोपदी प्रत्यय यायला लागेल, सांपत्तिक योग अपेक्षेबाहेर सुधारतील.

दि. १६ ते १८ या कालाची नोंद ठेवा.

**कर्क** : तुमच्या राशीतच सूर्य-गुरूचे वास्तव्य. समर्थांचे साहचर्य वाया कसे जाईल? सामाजिक प्रतिष्ठा या वेळी कळसाला पोचेल, वृत्तपत्रीय प्रसिद्धी तर नेहमीच लाभू लागेल.

चौथ्या मंगळाबद्दल खंत बाळगण्याची मुळीच गरज नाही. सूर्याच्या प्रखर सामर्थ्या-पुढे त्याचे अस्तित्वही जाणवणार नाही.

आपली तात्त्विक बैठक मजबूत असल्यामुळे, तात्त्विक मतभेद होण्याची शक्यता यत्किंचितही नाही.

वैद्यकीय, रासायनिक व यांत्रिक व्यवहारांशी संबंध असणाऱ्या व्यावसायिकांना हे सध्याचे दिवस संपूर्णपणे अपेक्षासाफल्याचे जाणवतील.

दि. १४–१६–१८ या काळात सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**सिंह** : सूर्य-गुरू व्ययात असूनही त्यांचे आपणांस हरघडी साहाय्य लाभेल. ते तुमची प्रतारणा करतील ही कल्पनाच खोटी.

मंगळ पराक्रमस्थानी आहे. तो एकटा तुमच्या साऱ्या विवंचना दूर करायला समर्थ आहे. या वेळी अनंत कामे आपणांस हातावेगळी करावी लागतील. क्षणाची उसंत मिळणार नाही. आणि या साऱ्या परिश्रमाचे श्रेयही लाभेल अपेक्षेबाहेर.

प्रामुख्याने यांत्रिक-विद्युत क्षेत्रांतील व्यक्तींना हे दिवस अत्युत्तम प्रगतीचे ठरावेत. या कालात सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात हिरीरीने भाग घ्यावा लागेल.

दि. १५ ते १८ यशस्वी काल.

**कन्या** : सूर्य-गुरु एकादशात. ही ग्रहांची बैठकच अशी आहे की, जे जे घडायला

हवे ते ते या वेळी झटपट घडून यायला लागेल.

नव्या उत्पादन क्षेत्राशी या वेळी आपला घनिष्ठ संबंध येईल. आणि आगामी १॥–२ महिन्यांत असे काही भव्यदिव्य कार्य आपल्या हातून घडेल की, जगाच्या नजरा आपल्यावर खिळून राहतील.

आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेण्याची वेळ आता आलेली आहे. आणि योग्य ते निर्णय घेतले तर तुमच्या जीवनाला आकर्षक वळण लाभेल.

अनपेक्षित लाभ होतील. नवे स्नेहसंबंध जोडले जातील.

दि. १३–१६–१८ या काळी अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

**तूळ :** एकादशात शुक्र, दशमात सूर्य-गुरू इतकी सर्वोत्तम ग्रहस्थिती लाभल्यावर आणखी काय हवे ?

गेल्या कित्येक महिन्यांतील तुमच्या साऱ्या समस्या सुटतील. एवढेच नव्हे तर अनेक लाभदायक व प्रगतिपर घटनाही या आठवड्यापासून घडून यायला लागतील.

अकरावा गुरू लवकरच येणार आहे त्याची ही प्रसादचिन्हेच होत.

कला–साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना याच्याइतका सर्वांगाने प्रगतीचा काल या पूर्वी क्वचितच जाणवला असेल.

राजकीय मानसन्मान घडून येण्याची लक्षणे १५ ऑगस्टच्या सुमारास घडून येतील.

दि. १५ ते १८ विशेष यश देणारा काल.

**वृश्चिक :** निर्धारनिष्ठेचे खडतर व्रत निष्ठेने आचरण करणारी माणसे फक्त वृश्चिक राशीतच निपजतात. आणि म्हणूनच त्या व्यक्तींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील उच्च स्थान लवकरच लाभू शकते. तुम्हांलाही या वेळी या विधानाचा हातोहात प्रत्यय यावा. सूर्य-गुरू-भाग्यस्थानी असा योग अंतरिक्षात पुन्हा १२ वर्षे तरी होणे नाही. तुम्हांला जे जे काही हवं असेल ते ते मागून घ्या. ग्रह क्षणाचाही विचार न करता ते प्रसन्न मनाने म्हणतील की, "तथास्तु".

दूरचा प्रवास घडेल, नोकरीत बढती–बदलीचे योग दिसू लागतील. परराष्ट्रीय व्यापारधंद्यांत फार मोठा लाभ होईल.

दि. १४ ते १७ सारे काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**धनू :** शुक्र-मंगळ हे व्यावहारिक यशाचे ग्रह आपणांस सर्वस्वी अनुकूल असल्यावर अन्य ग्रहांच्या प्रतिकूलतेबद्दल खंत बाळगण्याचे कारणच काय ?

धावपळ–धडपड ही खूप करावी लागेल. या परिश्रमांचा प्रकृतीवर थोडाफार मात्र अनिष्ट परिणाम होईल. पण आपले सारे हेतू सफल झाल्याशिवाय राहणार नाहीत.

या आठवड्यापासून कौटुंबिक अप्रसन्नता दूर होऊ लागेल, कित्येक दिवसांपासून न सापडणारे स्वास्थ्यही या वेळी गवसेल, पैशा–अडक्याबद्दलही आता विवं-

चना करावी लागणार नाही. प्रवास वरचेवर घडतील.

दि. १५–१७–१८ अपेक्षित यश देणारा काल.

**मकर :** जगाने तुमचा सतत हेवा करावा असं भाग्य तुमच्या वाट्यास आलेलं आहे. आणि ते कोणी हिरावूनही घेऊ शकणार नाही. अंतरिक्षातील साऱ्या ग्रहांची लाडकी राशी म्हणून तुमचा कौतुकाने उल्लेख केला जात असतो.

गेल्या १५–२० दिवसांच्या मानाने या आठवड्याचे महत्त्व आपणांस अधिक जाणवेल.

ग्रहांची प्रसन्नता लाभलेलीच आहे तिला थोडी प्रयत्नांची जोड दिलीत की, आपल्या साऱ्या आकांक्षा सफल होतील.

या आठवड्यापासून आपले प्रगतीकडे आणखी एक पाऊल पडेल.

दि. १३ ते १६ याच काली प्रगतीची लक्षणे स्पष्टपणे दिसायला लागतील.

**कुंभ :** गेल्या कित्येक महिन्यांत आला नसेल इतका चांगला अनुभव या आठवड्यात आपणांस यायला लागेल.

मानसिक–शारीरिक व्यथा विवंचना मिटतील, शारीरिक अस्वास्थ्य दूर होईल. आणि या अनुकूलतेमुळेच काही सामाजिक, शैक्षणिक कार्य करायला हिरीरीने लागाल.

वैज्ञानिक क्षेत्र-संशोधन विभाग ही तुमची खास क्षेत्रे. त्यात तुम्ही भाग घ्यायच अवकाश, यश ठेवलेलेच.

या आठवड्यात प्रवास घडेल. प्रवासात अनेक नवे इष्टमित्र भेटतील आणि त्यांच्या सहवासात दिवस अत्यानंदात जातील. आता मंगळ तुम्हांला कोणत्याही गोष्टीची उणीव भासू देणार नाही.

दि. १५–१७–१८ अपेक्षित यशलाभ देणारा काल.

**मीन :** याही वेळी आपणांस फारसे चांगले दिवस जाणवतील असे म्हणणे हा " वदतोव्याघात " ठरेल.

साडेसाती, त्यातून शनी वक्री आणि त्यातूनही आठव्या मंगळाच्या कटकटी. अशा वेळी जपून वागल्याशिवाय आपल्या हाती दुसरे काय आहे ?

नाही म्हणावयास सूर्य-गुरू पंचमात आहेत. ते आपली सारी शक्ती, सहानुभूती पणास लावू तुमचं भलं कसं होईल याचाच प्रयत्न करायला लागतील.

हटवादी शनी-मंगळांपुढे त्यांच्या प्रयत्नाला कितपत यश येईल हा प्रश्नच आहे. तरीसुद्धा हे दिवस पूर्वीइतके त्रासदायक जाणवणार नाहीत एवढी अपेक्षा करायला मुळीच हरकत नाही.

दि. १५ ते १८ काहीसे अनुकूल दिवस.

○

*हिरकणी . . .* पृष्ठ ७३ वरून

देवडीवरच्या शिपायांपैकी एकजण किल्लेदाराच्या वाड्याकडे निघाला. हिरा डोळे पुसत देवडीवरच्या बाहेरच्या अंगाशी कडेला बसली. अंधार तिळातिळाने दाटत होता. अन् उगवतीला आभाळात चांदीच्या ताटासारखा पुनवेचा चंद्र वर वर चढत होता. गडावर नगारखान्यात सनईचौघडा वाजू लागला होता. जागोजागच्या चौक्यापहाऱ्यांवर मशाली पेटलेल्या दिसत होत्या. लांब तिकडे राजरस्त्यावरून एखाद्या थोरामोठ्याची पालखी मशालीच्या उजेडात धावताना दिसत होती. पालखीपुढचा मशालजी वाऱ्याने फुरफुरणारी मशाल घेऊन धावत होता. अधून मधून घोडेस्वाराच्या काळ्या सावल्या दौडत जाताना पुसट पुसट दिसत होत्या. राजवाड्यातल्या शमादानांचा आणि हंड्यांचा उजेड खिडक्यांच्या मेहरपीतून उजळताना दुरून दिसत होता. पहारेकऱ्यांची मधूनच एखादी आरोळी आणि तिला कुठूनतरी मिळणारा प्रतिसाद ऐकू येत होता.

हिरा बसली होती; पण पळापळाने तिच्या जिवाची उलघाल वाढत होती. तिच्या डोळ्यांपुढं भुकेने रडत असलेलं आणि मुठी चोखत असलेलं तिचं बाळ तिला दिसत होतं. अन् किल्लेदाराने किंवा महाराजांनी आपली आर्जवणी ऐकलीच नाही, तर–तर आपल्या बाळाचा रात्रभर भुकेने फुटणारा टाहो तिला आत्ताच ऐकू येत होता. तिच्या जिवाची तगमग क्षणाक्षणाला वाढतच होती. सारी रात बाळाविना गडावर काढायची? केवढी मोठी रात ही! हिराला रडू कोसळलं. पण क्षणात ती थांबली. तिच्या मनात काही-तरी आलं. तिची नजर चौफेर भिरभिर फिरू लागली. वारा भळाळत होता. आपल्यासाठी दरवाजा उघडला जाईल ही आशा तिच्या अधिऱ्या मनातून दुरावली. तिचे हुंदके थांबले. ती इकडे तिकडे पाहू लागली. देवडीवरचे शिपाई ठाणवईच्या उजेडात बोलत बसले होते. आपल्याला कुणी बघत नाही. असं पाहून ती उठली. तिने हळूच हंडा उचलला आणि भराभरा तेथून निघाली. झपा-ट्याने पावलं टाकीत ती गडाच्या मावळतीच्या अंगाला चालू

लागली. त्या बाजूला तुरळक चौक्या-पहाऱ्यांच्या मशाली चमकताना दिसत होत्या. त्या बाजूला न जाता, त्या चुकवीत, टाळीत, एका हातात लुगड्याचा सोगा धरून ती चालली होती.

आणि ती पश्चिमेच्या एका कड्यावर येऊन पोहोचली. तिने खाली डोकावून पाहिलं. भयंकर खोल ! खूप खोल खोल, साफ तुटलेला बेलाग कडा होता तो ! खाली कभिन्न अंधारात बुडालेली खोल खोल दरी होती ! त्या दरीतल्या जंगलाची सळसळ करकर कानांवर येत होती. त्या बाजूला असेच सगळे भयंकर कडे होते चारचारशे, पाचपाचशे हात खोल ! सरळ भिंतीसारखे तुटलेले ! अशा भयंकर कड्यावर तटबंदी करण्याची गरजच नसे. कोणाची हिम्मत होती इथून चढून वर येण्याची ? मृत्यूची दरीच ती ! अशा दऱ्या राजगडाच्या सर्वांगास किती तरी. अशा भयंकर कड्याच्या टोकावर कायमचे चौकी पहारे ठेवायची जरुरी नसे. रात्रीच्या वेळी फिरते घोडेस्वार गस्त घालीत फिरत असत.

हिराने हंडा जमिनीवर ठेवला. इकडे तिकडे पाहत तिने पदर कमरेला खोचला. ओचे सावरून खोचले आणि ती खाली बसली. तिने कड्यावरून पाय खाली सोडले. हातांचा आधार घेत ती छातीवर ओणवी झाली. पायाच्या बोटांनी चाचपडत कड्यावर पाऊल ठेवण्यासाठी सांधीसापटी शोधू लागली. कुठं तर बारीकशा कपारीत तिच्या पायाच्या बोटांना आधार गवसला. हातांनी आणि पायांनी अशाच कपाऱ्या, सांधीसापटचा चाचपीत अन् मिळेल तेवढ्याच आधारावर साऱ्या जिवाचा भरंवसा टाकून ती बोट बोट, वीत वीत अंतर खाली खाली उतरू लागली. 'घूं घूं' करीत वाऱ्याची मुसंडी मधूनच बसत होती. तिला भीतीची कल्पनाही चाटून जात नव्हती. जर हात किंवा पाय निसटला तर ? एखादं सरपटणारं विखारी जनावर एखाद्या सांधीसापटीत असलं अन् तिथंच जर हातपाय लागला तर ? कड्याकपाऱ्यांवर नेहमी लागणारी गांधीलमाश्यांची किंवा मधुमाशांची आग्यामोहोळं वाटेत लागली तर काय होईल ? काय होईल ? जर का हात निसटला, जर का पायाची बोटं निसटली, तर-तर-तर, फक्त

एक किंकाळी ! तिचे एकामागोमाग एक असे तीन-चार प्रतिध्वनी ! अन् अखेरचा प्रतिध्वनी उठायच्या आतच कुठंतरी शिळेवर थाडकन् आवाज ! –देहाच्या चिंधड्या चिंधड्या चिंधड्या ! मृत्यूच्या एकदम स्वाधीन ! अन् मग सामसूम ! चिडी चिडी चिप्प ! डोळे बांधून मृत्यू जणू तिच्याशी आंधळी कोशिंबीर खेळत होता त्या कड्यावर !

–पण हिराच्या मनाला अशी पुसटशीसुद्धा भीती चाटून जात नव्हती. तिच्या काळजात सुसरीची निर्भयता आली होती. तिच्या बोटांत घोरपडीचा चिवटपणा शिरला होता. रायगडच्या त्या भीषण कड्यावरून सुसर उतरत होती, घोरपड उतरत होती.

अंहं ! रायगडच्या कड्यावरून मूर्तिमंत 'आई' खाली उतरत होती ! आईची सारी सारी सामर्थ्यं हिराच्या अंगी आली होती.

पण हिराला ह्या भयंकर धाडसाला 'धाडस' म्हणतात याचीही जाणीव नव्हती. तिला काहीही माहीत नव्हतं तिला ओढ लागली होती घरची. घरातल्या तान्हुल्याची. उशीर झालाय, बाळ रडत असेल ! काय करू बाई ! डोंगर संपेना !

हिरा कडा उतरत होती.

अन् तिकडे देवडीवरच्या एका पहारेकऱ्याने बोलता बोलता सहज उठून देवडीच्या कडेला पाहिलं. तिथं त्याला हिरा दिसली नाही. तो चमकून उद्गारला,

"ऑ ? ही पोरगी गेली कुठं ?"

हिरा कडा उतरत होती ! जंगलाच्या खांद्या-फांद्यांची वाऱ्याने होणारी करकर आता तिला ठळक ऐकू येत होती. वटवाघळांची किंचाळणी आणि फडफड तिच्या कानाशेजारून जात होती. मधूनच घुबडं घुमत होती. हिराला खरचटत होतं. गुडघ्याला लागत होतं. तशीच ती चाचपडत उतरत होती.

आणि हिरा कड्याच्या पायथ्याशी येऊन पोहोचली. क्षणभरही न थांबता त्या झाडीतून हरणीसारखी ती धावत सुटली. कळकाच्या बेटांतून वारा शीळ घालीत होता. ठेच लागतीय की काटा रूपतोय याचं तिला भान नव्हतं. काटेरी झुडपं तिला अंधारात

ओरबाडीत होती. ती अडखळत होती. पडत होती. उठत होती. धावत होती. तिचे पाय थांबत नव्हते. रायगडचं रान म्हणजे वाघाचित्त्यांची जाळी. नागासापांना तरी काय तोटा? नानटी, रुकाटी, मण्यार,–छपन्न प्रकार! पाय पडायचा अवकाश!– हिराला त्याचं भान नव्हतं. चंद्र अजून गडाआड होता. म्हणून हिराच्या वाटेवर अंधारच होता.

रानझाडी संपली. वाडीचं शिवार लागलं. गडावर चंद्र चढत होता. ओल्या खोबऱ्याच्या किसासारखं चांदणं करून सांडू लागलं होतं. भात खाचरांच्या बांधा–बांधाने धावत, उड्या टाकीत ती घर वेधीत होती. वाडीतल्या कुत्र्यांचं भुंकणं ऐकू येऊ लागलं होतं. घर जवळ आलं होतं.

हिराची पावलं अंगणांत वाजली. गोठ्यातल्या गाईवासरांनी कान टवकारले. ती हुंबरली. दाराला कडी तशीच होती. तिने अधीरतेने कडी काढली. देवाच्या देवळीत ठाणवई जळत होती. ती अधाशी नजरेने पाळण्यापाशी धावत गेली. तिने पाहिलं. तिचं छबकडं जागंच होतं. रडत नव्हतं. मुठी चोखत लोळत होतं. तिने हसून एकदम टाळी वाजवली. पटकन् तिनं त्याला उचललं. तेही खुदकन् हसायला लागलं. तिने त्याचा पापा घेतला. तिने त्याला पदराखाली घेतलं. जणू तिला आता शिवाजीराजापेक्षाही मोठ्ठं राज्य मिळालं होतं! तिने आपल्या डबडबलेल्या कपाळावरचा घाम पुसला.

अन् गडावर बोभाटा झाला. गवळण हरवली! गवळण हरवली! गेली कुठं हे कुणाला उमगेना. महाराजांच्या कानावर सारा मजकूर गेला. लेकुरवाळी गवळण गडावर अडकली अन् आता गेली कुठे? महाराजांना मोठं आश्चर्य आणि कुतूहल वाटलं. त्यांनी किल्लेदाराला आज्ञा दिली,

"तावडतोब बाईचा शोध करा! दरवाजे बंद असताना बाई जावी कुठं? बयाजवार शोध करा!"

गडावरचं घरन् घर पाहिलं. मशाली घेऊन शिपाईप्यादे अवघ्या गडावर हिंडू लागले. देवळं, बाजार, पागा–सारं पाहिलं. गवळण

गवसेना. महाराज चिंतावले. बाई गेली कुठे ?

आणि तेवढ्यात एक मावळा एका हाती मशाल आणि दुसऱ्या हाती हंडा घेऊन धावत आला, गवळणीचा हंडा गवसला ! मुजरा करून मावळा म्हणाला,

" महाराज, ह्यो हंडा मावळतीच्या कड्यावर गवसला. पर पर बाईची तथं कायबी चाहूल न्हाई ! "

" मावळतीच्या कडावर ? म्हणजे ? तिने कड्यावरून खाली उडीबिडी टाकली की काय ? की अंधारात पाय घसरून कोसळली ? किल्लेदार–"

" जी महाराज ! "

" ताबडतोब गडाखाली माणसं सोडा ! मावळतीच्या कड्याखालच्या जंगलात शोध करा ! माउलीचं काय झालं असेल त्या ! केवढा कडेलोट तो ! जगदंब जगदंब ! जा जा ताबडतोब ! "

गडाचा दरवाजा उघडला गेला. शंभर–सवाशे मशालवाले मावळे गडाखाली धावले. कड्याखालच्या जंगलात माणसं घुसली. कडा ताठ उभा होता. वर बघावं तर डोईचं पागोटं भुईवर पडत होतं !

महाराज गडावरून कड्याखाली बघत होते. खालच्या मशाली खोल खोल दरीत काजव्यांसारख्या चमकत होत्या. इतक्या उंचावरून बाई कोसळली ! – महाराजांचं काळीज ह्या कल्पनेनेच कळवळलं.

आणि हिरा आपल्या घरी बाळाला कुशीत घेऊन गाढ झोपली होती. मावळ्यांनी अवघा तळ शोधला. पण गवळणीचा मागमूसही लागला नाही ! मावळे गडावर परतले. मध्यरात्र उलटून गेली होती.

मोठं अपरूक झालं. गवळण गेली कुठं ? महाराजांना हे कोडं उलगडेना. ह्या सगळ्या धावपळीतच रात्र गेली. सुकीर चांदणी उगवली.

बाई दुसरीकडे कुठं तरी कड्यावरून कोसळून मेलीच असली पाहिजे, अशी महाराजांची खात्री झाली. दिवस फुटताच महा-

राजांनी गवळणीच्या घरी स्वार पिटाळले. बिचारीच्या घरची माणसं काळजीत बुडून गेलेली असतील म्हणून! कडू निरोप घेऊन स्वार गडावरून निघाले.

घोड्यांच्या टापा हिराच्या दारापुढं वाजल्या. हिरा सडा शिंपीत होती. तिचं लक्ष स्वारांकडे गेलं. एका स्वाराच्या हातांत तिचा हंडा होता!

" बाई माझा हंडा! इसरलो की वो म्या राती गडावर!"

हंडा घ्यायला हिरा भराभरा पुढं आली, हंडा देत देत स्वारांनी तिला पुसलं,

" ह्यो हंडा तुझा! गडावर दूध घालाया तू आली व्हतीस?"

" जी! ह्यो माझा हंडा हाय! राती कड्यावरच ऱ्हायला!"

" गडाची कवाडं बंद झाली व्हती, मग तू गडाखाली आलीस कशी?"

" त्या कड्यावरून उतरून आलो! तान्हं पोर होतं एकलं घरी म्हनूनशान!"

" काय? त्या कड्यावरून?"

आश्चर्याने डोळे विस्फारीत आणि हनुवटीला मूठ लावीत स्वारांनी विचारलं. त्यांची तर विस्मयाने मान आणि छाती मागे झुकली. त्यांच्या तोंडून शब्द निघेना. ते 'आ' करून तिच्याकडे बघतच राहिले! —आणि हिरा कावरीबावरी झाली. घाबरली. तिला वाटलं आपलं काहीतरी चुकलं. राजाला न पुसता कड्यावरून आपण खाली आलो. आता राजा कोपेल! ते स्वार तिच्याकडे 'आ' करून बघतच राहिले. तीही बावचळून आलटून पालटून त्यांच्या तोंडाकडे बघू लागली अन बघता बघता ती घाबरून एकदम घरातच पळाली!

तो भयंकर उभा कडा त्या स्वारांच्या डोळ्यांपुढे उभा राहिला होता. त्यांनी घोडे वळवले. दौडत दौडत त्यांनी गड गाठला.

सगळ्या गडावर बातमी पसरली, गवळण जिवंत आहे! सुखरूप आहे! पोराच्या ओढीने ती कडा उतरून रातोरात घरी गेली! अवघा रायगड आश्चर्यात बुडून गेला. अष्ट प्रधानांनी तोंडात

बोटं घातली. मोठमोठ्या मर्दांनीही दबकून छातीवर हात ठेवला. पाच हजारांचा तोडा बक्षीस लावला असता, तरीही कुणी गडी कड्याखाली पाय सोडायला तयार झाला नसता! अन् ही कोवळी पोर–

महाराज तर थक्क झाले. पोराच्या ओढीने त्या आईने हे दिव्य केलेलं ऐकून त्यांना आठवण झाली जिजाई आईसाहेबांची. त्यांचा गळा गहिवरला.

"होय होय पंत, आईपण हे असंच असतं! आम्हांला माहीत आहे–सारं आठवतंय्!–पंत पालखी पाठवून त्या मुलीला गडावर आणवा!"

"आज्ञा महाराज!"

पंतप्रधान मोरोपंतांनी मुजरा केला.

स्वार, शिपाई आणि पालखी हिराच्या घरापुढं आली. वाडी-तल्या आयाबाया हातची कामं टाकून तरातरा दाराशी धावल्या. शिपायांची गर्दी पाहून चोरट्या आवाजात कुजबुजू लागल्या,

"कुणाला ग बाई धरणं आलं? हिराला–? आत्ता ग बाई?"

हिरा पोर कुशीत घेऊन बसली होती. शिपाई घरात आले. ती घाबरली! ती घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली,

"न्हाई न्हाई! आता पुन्हा कंदी यायचो न्हाई मी गडावर! चुकलं माझं! पाया पडतो!"

शिपाई हसायला लागले. तिला म्हणाले,

"येडी का काय तू? महाराज तुला वलीवत्यात! चल! पालखी धाडलीय तुझ्यासाठी! चल बिगीबिगी!"

"मला भ्या वाटतं!"

"राकशेसावनी कड्यावरून उतराया भ्या न्हाई वाटलं! आन् राजा तुला माहेरी बलीवतोय, तर भ्या वाटतंय्! येडी!"

अन् पालखीतून हिराला घेऊन स्वारशिपाई गडावर आले. जो तो टकमका हिराकडे बघत होता. हिराच्या मांडीवर बाळ होतं.

राजसभा दाटली. सोन्याच्या सिंहासनावर छत्राखाली महाराज

बसले होते. हिराला घेऊन बाळाजी आवजी चिटणीस राजसभेत प्रवेशले. बावरलेल्या नजरेने हिरा पावलं टाकीत होती. चिटणीस तिला हळूच म्हणाले,

"ये ये बाळ ! अशी माझ्या मागून ये ! "

तिचं कोवळं वय आणि कोवळा देह पाहून राजसभा तर अधिकच विस्मित झाली. कडेवर मूल घेऊन अन् पदर पुढं ओढीत हिरा येत होती. तिच्या पाठीमागे जणू तो अफाट कडाच वर वर वर सरकत आहे असा राजसभेला भास होत होता. सिंहासनासमोर येऊन हिरा थांबली. महाराजांच्या मुखावर कौतुकाचं स्मित फुललं होतं.

"शाबास, शाबास मुली ! यमराजाच्या पाठीवरूनच जणू उतरून गेलीस तू ! आम्ही कालपर्यंत असं समजत होतो की रायगडाची कड्याकुलपं अभेद्य आहेत ! पण तू काल गडाच्या महादरवाजाचा पराभव केलास ! शाबास !

शेल्याखाली झाकलेलं ताट पंतांनी महाराजांपुढे नेलं. मोरोपंतांच्या हातातील ताटास महाराजांनी हाताने स्पर्श केला. पंतांनी हिराजवळ जाऊन तिची सोन्याच्या दोन ओंजळ मोहरांनी आणि नारळाने ओटी भरली. तिला लुगडं-चोळी आणि तिच्या बाळाला अंगडंकुंचडं दिलं. त्या वेळी महाराज म्हणाले,

"मराठ्यांच्या मुलीसुद्धा जिवावरची धाडसं सहज करू शकतात ! अशा आयांचं दूध पिणाऱ्या मराठ्यांना जिंकायला खासा औरंगजेब जातीने आला, तरीही फत्ते होईल आमचीच ! "

महाराज किंचित् हसून म्हणाले,

"जगाच्या पाठीवर जोपर्यंत हा रायगड उभा आहे, तोपर्यंत ह्या मुलीलाही जग विसरणार नाही ! पंत, ही हिरा गवळण ज्या कड्यावरून चढून आली, त्या कड्यावर ताबडतोब एक बुरुज बांधून काढा आणि त्या बुरुजाला नाव ह्या मुलीचंच द्या ! हिरकणी बुरूज ! हिरकणी बुरूज ! ! "

पंतांनी महाराजांना मुजरा केला आणि हिराने पदर सावरीत खाली वाकून नमस्कार केला. ○

## पवनाकाठचा धोंडी.... पृष्ठ ९ वरून

शेवटी रोगाने सारे बैल मरतात. धोंडीच्या गोठ्यात एकच बैल उरतो. आता शेती नांगरायची कशी हा प्रश्न पडतो.

पण हा जिद्दीचा धोंडी कुदळ घेऊन हाताने शेती उकरायला आरंभ करतो. जर एखाद्या शेतकऱ्याला शेती नांगण्याची साधने नसतील; जर हाती बळ नसेल वा पदरी माणसं नसतील तर त्याची शेती नांगरण्यास गांवकरी मदत करतात. आपापले बैल नांगर घेऊन येतात आणि त्याची शेती नांगरून, पेरून देतात. याला म्हणतात 'इर्जीक' घालणे. अशी 'इर्जीक' धोंडीच्या शेतात घालायची आता पाळीं येते. पण हे दुबळेपण धोंडीला सहनच होत नाही. तुंगीगडाच्या बहादूर हवालदाराच्या शेतात अशी दानाची इर्जीक ? छेः छे: छे: ! शक्यच नाही. धोंडीला हे लाजीरवाणं वाटतं. नेहमी ताठ मानेने आणि मनगटाने जगणारा अन् जगा म्हणून सांगणारा हा किल्लेदार धोंडी अखेर आपल्या नांगराला एका बाजूला आपला एकुलता एक बैल जुंपतो आणि दुसऱ्या बाजूचं जू आपल्या स्वतःच्या खांद्यावर घेऊन आपली जमीन नांगरू लागतो. घरून कोंडीची बायको सरू (जयश्री गडकर) धावत येते. सारा गांव इर्जिकीसाठी घेऊन कोंडीही येत असतो. त्याच वेळी उरीपोटी नांगरट करीत असलेला धोंडी रक्त आकू लागतो. अन् रक्त ओकीत आकीतच आपल्या हवालदारीच्या इनामी जमिनीवर पूर्वजांच्या समाधीपुढं मरून पडतो. "मी माझ्या वाट्याचं नांगरलं !" हे त्याचं मरताना समाधान असतं. "वाडवडीलाप्रमाणं रक्त शिंपून या काळया आईची चाकरी करावी ही इच्छा आज पुरी झाली !" याच आनंदांत धोंडी प्राण सोडतो.

अशी ही एका इरेसरीच्या, इमानी, अभिमानी कायावाचामनाची कथा आहे. पीळ जबरदस्त आहे. आमच्या आजच्या लाचार, खंतहीन आणि निर्जीव मनांना

**माधवाश्रम**, गिरगाव, मुंबई ४

**अत्यंत स्वस्त दरांत राहण्याची उत्तम सोय**

सुग्रास व चवदार भोजनासाठी

**महाजन भोजन गृह**

( मर्यादित भोजन पद्धती )

दूरध्वनी : ३५८६१३

ह्या धोंडी समजेल तरी का? कारण गेली वीस वर्षं अमेरिका 'इर्जीक' घालते आहे. कुणाला त्याची खंत आहे? खेद आहे? लाज आहे?

'पवनाकाठचा धोंडी' हा असा आहे. आता सांगा ही 'हकीकत' पटकथेत पकडणं केवढं अवघड काम. ती पडद्यावर आणणंही केवढं अवघड काम! अन् असला ह्या हट्टी धोंडी नाटकी आक्रस्ताळेपणा न करता जिवंत उभा करायचा हे केवढं अवघड काम. नव्हे, सर्वांत अवघड काम. पण पटकथा लेखन आणि दिग्दर्शन चोख जमलंय. सर्वांत कमाल केली आहे धोंडी साकार करताना चंद्रकात यांनी.

त्यांनी धोंडीची भूमिका इतक्या सामर्थ्याने वठविली आहे की, खरोखर असं वाटतं की, हे बळ आजतरी दुसऱ्या कोणत्याही मराठी कलावंताच्या अंगी नाही. चंद्रकांत हे नाव गेलीतीस वर्षे पडद्यावर ताजं राहिलं कसं, याचं उत्तर ह्या 'पवनाकाठच्या धोंडी'मध्ये मिळेल. चंद्रकांत यांनी पहिली भूमिका केली 'सावकारी पाश' मध्ये शेतकऱ्याची. हा धोंडीही शेतकरीच आहे. 'सावकारी पाश' पासून 'धोंडी'पर्यंतची त्यांची सारीच चाल सतत यशस्वी एल्गाराची आहे. भूमिका कोणतीही असो; चंद्रकांत ती प्राण ओतून करतात. त्यांच्याइतक्या विविध भूमिका दुसऱ्या कुणीही केलेल्या नाहीत. हा एकमेव अभिनेता आहे. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, ग्रामीण, लष्करी आणि जंगलीसुद्धा चित्रपटांत त्यांनी मुख्य भूमिका रंगविल्या आहेत. 'जय मल्हार' मधला पाटील आणि 'रामराज्या'तला राम, 'सावकारी पाश' मधला गरीब शेतकरी आणि 'संथ वाहते कृष्णामाई' मधला देशमुख, 'छत्रपती शिवाजी' मधील शिवाजीराजे आणि 'नवरंग' मधील संस्थानी राजा—आणि अशा असंख्य भूमिका—एकमेकांपासून किती भिन्न! पण प्रत्येक भूमिका त्यांनी अगदी कोरून काढली आहे. हे सामान्य आणि सोपं नाही. ह्या विविध मूर्ती स्वतः साकार करवण्यासाठी त्यांनी छन्नी हातोड्याचे किती घाव झेलेले असतील? चिंतन मनन केवढं केलं असेल? दीड दिवसात 'नट सम्राट' होणाऱ्या अर्वाचीन मंडळींनी चंद्रकांत यांच्या छन्नी हातोड्याचा एखादा घाव झेलून बघावा.

पवनाकाठच्या धोंडीमध्ये चंद्रकांत यांना देण्यात आलेलं रंगरूप (मेकअप) आजवरच्या त्यांच्या भूमिकाहून भिन्न आहे. भरदार कल्ले हे त्यातील वैशिष्ट्य. धोंडीच्याच जीवनाची ही कहाणी असल्यामुळे त्यांनाच मुख्यतः चित्रपटात काम आहे. अन् अगदी प्रामाणिकपणे बोलायचं म्हणजे इतर साऱ्या पात्रांना त्यांनी खाऊन टाकलंय. अनेक बारकावे त्यांनी अप्रतिम अभिनयाने दाखविले आहेत. कोंडीचे न पटणारे हट्ट पुरे करायची जेव्हा जेव्हा वेळ येते, तेव्हा तेव्हा धोंडीची होणारी कष्टी मनःस्थिती चंद्रकांत यांनी आपल्या चेहऱ्यावर व डोळ्यात कमालीच्या कौशल्याने दाखविली आहे. खानदानी जिद्द तर त्यांच्या स्वरांत आणि साध्या हालचालीतही सही सही दिसते. शेवटच्या नांगरणीच्या वेळचं त्यांचं काम मराठी चित्रपटांच्या इतिहासात चिरंजीव ठरेल. धोंडीच्या त्यांच्या भूमिकेला तोडच

नाही, त्यांच्या कामासाठी हा चित्रपट प्रत्येकाने बघावाच. सबंध चित्रात प्रमुख एकटा धोंडीच आहे. धोंडीची पत्नी व कोंडी यांचा क्रम त्यानंतर कोंडीच्या बायकोला फार महत्त्व नाही. वसंतराव शिंदे तर चवीपुरतेच आहेत. 'जय मल्हार' नंतर चंद्रकांत आणि सौ. सुमतीबाई गुप्ते पुन्हा इथं पति-पत्नीच्या भूमिकेत एकत्र दिसतील. सौ. सुमतीबाईंच्या भूमिकेबद्दल बोलणे न लगे. त्यांनी आणि सूर्यकांत यांनी आपली कामं उत्तम केली आहेत. सूर्यकांत यांनी लाडका दीर, चिडका पहेलवान आणि नवखा गवळी झक्क उभा केला आहे. वयाच्या दृष्टीने कोंडीच्या लग्नाला हवालदारांनी इतका उशीर का केला कोण जाणे ! अविवेकी, अल्लड पण भाऊभावजयीवर अपरंपार प्रेम करणारा, रुसणारा, हट्ट करणारा, सहज कोणालाही भुलणारा, 'नादाला' सहज बळी पडणारा, चटकन पस्तावणारा, दादावर चिडणारा, पण दादाला देवाठायी मानणारा कोंडी, सूर्यकांत यांनी वास्तव रंगात रंगविला आहे. चंद्रकांत यांच्यानंतर सर्वात जास्त जबाबदारी होती. सौ. सुमतिबाई व सूर्यकांत यांच्यावरच दोघांनीहि ती उत्तम पार पाडली आहे. हट्टी नवरा, अल्लड दीर यांच्या मायेच्या कात्रीत सापडलेली वहिनी सौ. सुमतिबाईंनी चांगलींच अंगी आणली आहे. जयश्री गडकर यांनी सरूचं काम उत्तम केलं आहे. पण त्यांना वाव कमी आहे. तीच गोष्ट वसंतराव शिंदे यांची. मूळ कादंबरीतच सरू दुबळी आहे. चुकणाऱ्या नवऱ्याला ती हटकू वा रोखू शकत नाही. गोड दिसायचं, गोड हसायचं अन् गोड बोलायचं एवढंच तिला काम आहे.

संगीत श्री. हृदयनाथ मंगेशकरांचे आहे. ते गोड आहे. श्री. हृदयनाथ, लता व व उषा ह्या तिघा भावंडांनी दिलेले ताल आणि सूर मधुर आहेत. नाचणाऱ्या बाईच्या तोंडची दोन्ही गाणी छान आहेत. वहिनीने म्हटलेलं सकाळचं गीत वातावरण फुलविणारं आहे. श्री. वसंतराव शिंदे यांचे छायाचित्रण स्पष्ट व नेत्रसुख देणारे आहे. बैलांच्या शर्यतीचे, नांगरटीचे व बाईच्या नाचाचे प्रसंग श्री. शिंदे यांचे कौशल्य दाखविणारे आहेत.

तुंगीगडाचे व गडावरून दिसणारे पवन मावळाचे प्रत्यक्ष देखावे चित्रपटात का घेतले नाहीत ? त्यात अवघड काय होते ? धोंडीचे 'ऐतिहासिक' हवालदारीत रमणारे मन व्यक्त करणाऱ्या आणखी काही गोष्टी यायला हव्या होत्या. सरूला व वसंत शिंदेंना अधिक वाव हवा होता.

अगदी निराळ्याच अवघड धाटणीचा एक अस्सल खानदानी मराठी चित्रपट अतिशय प्रभावीपणे पडद्यावर आणल्याबद्दल श्री महालक्ष्मी चित्र संस्थेच्या सर्व तंत्रज्ञांचं, मंत्रज्ञांचं आणि कलावंतांचं हार्दिक अभिनंदन. चंद्रकांत यांचं तर स्पेशल अभिनंदन. 'पवनाकाठचा धोंडी' बघावयास कुणी मराठी रसिक विसरला तर तो एका थोर कलावंताच्या अप्रतिम अभिनयदर्शनास मुकेल. ○

१२ श्रीशंकर निवास
शिवाजी उद्यान मार्ग क्र. ३, मुंबई २८

श्रीराम

श्री. संपादक
'माणूस' यांसी
म. न. वि. वि.

आपल्या 'माणूस'च्या दि. १५ ऑगस्ट १९६७च्या अंकापासून प्रसिद्ध करता यावी यासाठी 'दादरा नगर हवेली' संग्रामावरील एक छोटीशी लेखमाला योग्य वेळेत मी आपल्याकडे पाठविण्याचे मान्य केले होते परंतु अशा तऱ्हेच्या लिखाणात असणाऱ्या अनेक अडचणींची मला प्रथम कल्पना आली नाही व ती आली त्या वेळेस, योग्य वेळेस, तशी लेखमाला पाठविणे अशक्य आहे हे कळून आले. आपली अतिशय अडचण होईल हे मला समजते. आपण क्षमा करावी. या लेखमालेला आवश्यक असणारी बहुतेक माहिती मी या वेळपर्यंत एकत्रित करू शकलो आहे. उरलेली माहितीही आठ–दहा दिवसांत मिळेल असे वाटते. त्यामुळे ही लेखमाला आपणाला सप्टेंबरच्या मध्याच्या सुमारास निश्चितपणे सुरू करता येईल. दिलेला शब्द पाळू न शकल्याविषयी मी आपली व आपल्या वाचकांची मनःपूर्वक क्षमा मागतो.


आपला स्नेहांकित
सतीश फडके

MANOOS ( Weekly ) : 60 Paise : Regd. oN. MH–649

स्वास्तिक

गमबूट

इंडस्ट्रियल व ट्रेडं क्वालिटी
मोठ्या माणसासाठी साईज ५ ते ११
लहान मुलासाठी साईज १० ते १
मध्यें मिळतात.



PARKERSON

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि, पुणे 3.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**